# गौड ब्राह्मण

● वर्ष ८१, मुंबई ● अंक ०१ ● जुलै – ऑगस्ट – सप्टेंबर २०१९ ● पाने ६८ ● किंमत २० रुपये

## यशवंत व्हा.. ! गुणवंत व्हा..! कीर्तीवंत व्हा...!


चिन्मयी रामकृष्ण प्रभुआजगावकर
(एसएससी–९७%)


विघ्नित किरण सामंत
(एसएससी–९९%)


अभिषेक आनंद देसाई
(आयसीएसई–९६.१७%)


रुपल निलेश परुळेकर
(आयसीएसई–९६.०२%)


पार्थ समीर कोचरेकर
(आयसीएसई–९५%)

इटलीतील 'आयसीटीपी' च्या संचालकपदी ज्ञातीचे सुपुत्र अतीश दाभोलकर यांची नियुक्ती



## हार्दिक अभिनंदन


सुमेध कौस्तुभ खानोलकर
(एचएससी–९४.६२%)


ईशा देवेंद्र पाटील
(एचएससी–९१.३८%)


श्वेता सतीश सामंत
(एचएससी–९०.६२%)


श्रीया प्रकाश सामंत
(एचएससी–८९.५४%)


प्रतिक्षा श्रीकांत परुळेकर
(एचएससी–८९.२३)

# यशवंत व्हा ! गुणवंत व्हा !! कीर्तीवंत व्हा !!!


दु र्गा मोहित आडेलकर
(एसएससी–९४.६०%)


हर्ष आनंद सामंत
(आयसीएसई–९४.३३%)


तन्वी यशवंत परुळेकर
(एसएससी–९४.२०%)


अनंथा रामचंद्र नायक
(एसएससी–९४.००%)


शलाका महेश प्रभु
(एसएससी–९४.००%)


मृणाल सुधाकर ठाकूर
(एसएससी–९३.८०%)


मृण्मयी रविंद्र वालावलकर
(एसएससी–९३.४०%)


सलिल प्रसाद प्रभू बांबर्डेकर
(एसएससी–९३.२०%)


स्वप्निल संदीप देसाई
(एसएससी–९३.१६%)


तेजस सदानंद सामंत
(एसएससी–९२.६०%)


प्रणव गोपाळ दाभोलकर
(एसएससी–९२.४२%)


आदित्य प्रशांत झारापकर
(एसएससी–९२.२०%)


राजश्री संजय खानोलकर
(एसएससी–९२%)


मनीष महेश बावकर
(एसएससी–९१.८०%)


त्रिगुणा विनायक देसाई
(एसएससी–९१.६०%)


वरुण चंद्रशेखर प्रभू
(एसएससी–९१%)


सुजन केतन प्रभुखानोलकर
(एसएससी–९०.८०%)


चिन्मयी भूषण प्रभूदेसाई
(एसएससी–९०%)


सायली शशिकांत त्रिंबकर
(एसएससी–९०%)


संकेत विजय परुळेकर
(एसएससी–९०%)

॥ उत्तिष्ठ यशो लभस्व ॥

गौड ब्राह्मण

**स्थापना : १९३९**

**: संपादक :**
उमाकांत गणपत महाजन

**: संपादन साहाय्यक मंडळ :**
पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक
जगजीवन श्रीकांत प्रभु
योगेश खानोलकर
वीणा विश्वनाथ दाभोलकर

**: मुखपृष्ठ संकल्पना :**
मनीष दाभोलकर

**: संपादकीय पत्रव्यवहार :**
**गौड ब्राह्मण सभा**



३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास,
१४७ ब, जगन्नाथ शंकरशेट मार्ग,
गिरगाव, मुंबई-४०० ००४.
दूरध्वनी: ०२२-२३८५ ००१५
मो.: ९६८९७८१७५०
Email : gbs.girgaon@gmail.com
ugmahajan@rediffmail.com



या त्रैमासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक तसेच संस्था सहमत असतीलच असे नाही.

- संपादक



# ✻ गौड ब्राह्मण ✻

वर्ष ८१ वे ❖ जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर-२०१९ ❖ अंक १


## अंतरंग


- **संपादकीय** : उमाकांत गणपत महाजन
- **शिक्षण महर्षी भाऊसाहेब परुळेकर** : सौ. गीता परुळेकर
- **विरार भूषण – वामनराव त्र्यंबक सामंत** : सौ. गीता परुळेकर
- **मी सुखी–** : सौ. शुभदा पाटकर
- **मनभावन हदगा (भोंडला)** : सौ. नीलिमा श. प्रभू
- **दोन आठवणी–** : निरुता भाटवडेकर
- **मैत्रीचे अतूट बंध–** : कु. भाग्यश्री प्रभूतेंडोलकर
- **गणपती–** : सौ. शुभदा पाटकर
- **स्त्रीभ्रूणहत्त्या–एक ज्वलंत समस्या** : सौ. शुभदा पाटकर
- **SUCCESS STORIES डॉ. माधव प्रभू** : मनीष दाभोलकर
- **कोकण गौरव–** : गजानन (बाळ) पाटकर
- **योगसाधना** : सौ. शुभदा पाटकर
- **प्रिय आई** : सौ. अंजली श्याम सामंत
- **इटलीतील आयसीटीपीच्या संचालकपदी अतीश दाभोलकर यांची नियुक्ती**
- **सुप्रसिद्ध हॉलीवूड ॲनिमेशन दिग्दर्शक राहुल दाभोलकर यांचा अमेरिकेवरून मुलांना सल्ला** : मनीष दाभोलकर
- **असे एक रक्षाबंधन** : सौ. दर्शना प्रभूतेंडोलकर
- **मरावे परी कीर्ती रुपे उरावे** : मनीष दत्तात्रय पाटील
- **सांज–** : आशिष श्री. ठाकूर
- **वसईतील विद्यार्थ्यांचे आदरणी सर कै. रमाकांत भिकाजी बांबर्डेकर** : गीता पाटकर
- **साद प्रतिसाद, हार्दिक अभिनंद, दु:खद निधन व वधू–वर सूची**



**गौडब्राह्मण सभा यांच्या मालकीचे हे त्रैमासिक संपादक, मुद्रक व प्रकाशक उमाकांत गणपत महाजन यांनी प्रतिक ऑफसेट, १८०–सी गायवाडी, गिरगाव, मुंबई–४०० ००४ येथे छापून ३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, १४७ ब, जगन्नाथ शंकरशेट मार्ग, मुंबई ४०० ००४. येथे प्रसिद्ध केले.**

# गौड ब्राह्मण सभा

गिरगाव, मुंबई-४०० ००४.

ज्ञातीतील दानशूर व्यक्तींनी संस्थेला दिलेल्या भरघोस देणग्यांमधून, त्यांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार गौड ब्राह्मण सभेने विविध कायमनिधी फंड गठीत केले असून या कायमनिधी फंडांच्या व्याजातून ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरीब, गरजू स्त्री/पुरुष, यांना आर्थिक मदत, विद्यार्थी/विद्यार्थिनींना शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती तसेच ज्ञातीतील कर्करोग, हृदयविकार, किडणीविकार, मतिमंद आदी व्याधीग्रस्त रुग्णांना औषधोपचार/शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत दिली जाते.

सभेच्या कायम निधी फंडाकरिता रु. २५,०००/- किंवा त्याहून अधिक देणगी देणाऱ्या ज्ञातीतील दानशूरांची नावे गौड ब्राह्मण सभेच्या त्रैमासिकात कायम स्वरुपात छापली जातात.

गौड ब्राह्मण सभेच्या कायम निधी फंडाकरिता ज्ञातीतील दानशूरांनी दिलेल्या देणग्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

## आश्रयदाते

**स्व. लक्ष्मीबाई बा. पाटील**, विले पार्ले
**स्व. विष्णु मंगेश पाटील**, विले पार्ले } ₹ ८०,४८,०००/-

**सौ. स्वाती सुरेश परुळेकर**
(पिताश्री स्व. गणपत स. आजगावकर,
मातोश्री स्व. प्रभावती ग. आजगावकर,
भगिनी स्व. मालती अरविंद नाईक ह्यांच्या स्मरणार्थ) } ₹ ५,००,०००/-

**स्व. विष्णू मंगेश पाटील**, विले पार्ले ₹ २,५०,०००/-
(स्व. गौरी व स्व. मंगेश पाटील यांच्या स्मरणार्थ)

**स्व. विष्णू मंगेश पाटील**, विले पार्ले ₹ २,५०,०००/-
(स्व. लीला व स्व. दामोदर सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. दीपक दिगंबर सामंत**, अंधेरी (पूर्व) ₹ २,००,०००/-
(मावशी स्व. कु. चित्ररेखा (चित्रा) चिंतामण प्रभुदेसाई हिच्या स्मरणार्थ)

**स्व. एकनाथ केशव ठाकूर** ₹ १,००,०००/-

**स्व. गजानन विष्णू देसाई** ₹ १,००,०००/-

**श्री आत्माराम शांताराम ठाकूर** (बोरिवली) ₹ १,००,०००/-
(पत्नी- स्व.सौ. विणा आत्माराम ठाकूर स्मरणार्थ)

**स्व. छाया पद्माकर परुळेकर** ₹ ५०,०००/-

**स्व. लक्ष्मी दिनकर खानोलकर** ₹ ३५,०००/-

**स्व. वंदना आनंद खानोलकर** ₹ २५,०००/-

**स्व. नलिनी शां. पंतवालावलकर** ₹ २५,०००/-

**स्व. मुकुंद गजानन देसाई** ₹ २५,०००/-

**स्व. अनंत लक्ष्मण प्रभु** ₹ २५,०००/-

**स्व. नीला भालचंद्र नाईक** ₹ २५,०००/-

**स्व. बापू नीळकंठ देसाई** ₹ २५,०००/-

**स्व. भालचंद्र अनंत नाईक** ₹ २५,०००/-

**स्व. जगन्नाथ भगवंत महाजन** ₹ २५,०००/-

## आधारस्तंभ

**श्री. अरविंद लक्ष्मण पाटील पाटकर** (पनवेल) ₹ ५,७५,०००/-
(स्व. लक्ष्मण अनंत पाटील पाटकर व स्व. अन्नपूर्णा लक्ष्मण पाटील पाटकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**डॉ. सुरेश विठ्ठल परुळेकर** ₹ ५,००,०००/-
(आजोबा स्व. रामचंद्र विठ्ठल परुळेकर,
आजोबा स्व. मधुसुदन पुरुषोत्तम वाघ,
पिताश्री स्व. विठ्ठल रामचंद्र परुळेकर,
मातोश्री स्व. सुदा विठ्ठल परुळेकर,
स्व. काका डॉ. काशिनाथ रामचंद्र परुळेकर ह्यांच्या स्मरणार्थ).

**श्री. सूर्यकांत ज्ञानदेव आजगावकर** (पालघर) ₹ १,५०,०००/-
(स्व. आई/स्व. वडील व स्व. काका पुरुषोत्तम तुकाराम आजगांवकर यांच्या स्मरणार्थ)

**सौ. शुभलक्ष्मी सूर्यकांत आजगावकर** (पालघर) ₹ १,५०,०००/-
(स्व. आई/स्व.वडील व भाऊ स्व. मोहनदास पुरुषोत्तम प्रभु खानोलकर यांच्या स्मरणार्थ)

**डॉ. रवींद्र बाबूराव तिरोडकर** ₹ १,५०,०००/-

**डॉ. विलास रामकृष्ण देसाई** ₹ १,२५,०००/-

**श्री. श्रीपाद बाळकृष्ण पाटील** ₹ १,२५,०००/-

**श्रीमती प्रेमलता गजानन प्रभु** ₹ १,१८,०००/-
(स्व. गजानन शंकर प्रभु व स्व. शंकर गणेश प्रभु ह्यांच्या स्मरणार्थ)

**सौ. मृणालिनी वसंत नाईक आणि कुटुंबीय** ₹ १,११,०००/-

**श्रीमती निलू (निरंजन) गव्हाणकर** ₹ १,१०,००२/-
(स्व. गणेश विष्णू गव्हाणकर, स्व. सुशीलाबाई गणेश गव्हाणकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**सौ. स्नेहलता सुरेंद्र सामंत कोपराडकर व** ₹ १,०२,०००/-
**श्री. सुरेंद्र दत्तात्रय सामंत कोपराडकर** (वसई)
(पिताश्री स्व. श्री. नारायण सखाराम देशपांडे व स्व. श्रीमती कुमुदिनी नारायण देशपांडे, सोलापूर ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. हृषीकेश काशीनाथ प्रभु** ₹ १,००,०००/-
(स्व. देवराम दा. सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. देवदत्त आत्माराम खानोलकर** ₹ ७५,००२/-

**श्रीमती आरती दिनेश नायक** ₹ ७५,०००/-

**श्रीमती सुशीला दत्तात्रय सामंत** ₹ ७०,०००/-

**श्री. महेंद्र पांडुरंग तेंडुलकर** ₹ ५०,००१/-

# संपादकीय झाले मोकळे आकाश !

## सर्वप्रथम आपणा सर्वांना ७३व्या भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

दरवर्षीप्रमाणे यंदाही शैक्षणिक आघाडीवर समाजातील विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी स्पृहणीय यश संपादन केले असून अनेकांनी शेकडा ९० टक्के व त्याहून अधिक गुण विविध परीक्षांत मिळवलेले आहेत अशा सर्व गुणवान विद्यार्थ्यांचे कौतुक करणारा हा ''गौड ब्राह्मण'' त्रैमासिकाचा अंक प्रसिद्ध करीत असताना आम्हाला फार अभिमान वाटत आहे.

तुम्ही सर्वांनी एवढे मार्क मिळविले आहेत म्हणजेच तुम्ही सर्वजण नक्कीच "Superspecial" किंवा "Superbrain" ''दैवी शक्ती'' याच्या पलीकडे जाऊन तुम्ही अपार मेहनत घेतलेली आहे हे नक्कीच! काही पायऱ्या यशस्वीपणे पादाक्रांत केल्या आहेत. आता पुढची पायरी! पण ती करताना दृष्टीकोन बदलण्याची गरज आहे.

हे संपादकीय लिहित असताना काही लक्षणिय घटना देशात घडल्या आहेत त्याकडे आम्ही आपले खास लक्ष वेधू इच्छितो-

सात दशकांपासून जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारे ऐतिहासिक व भारताच्या राजकीय, सामाजिक तसेच आर्थिक भवितव्यावर दूरागामी परिणाम घडवणारे ३७० हे कलम रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेत काश्मीरला इतर राज्यांच्या रांगेत आणून बसवले. ३७० हे कलम रद्द झाल्याने काश्मीर खऱ्या अर्थाने भारताचे झाले आहे. या निर्णयाद्वारे जम्मू-काश्मीरमधील स्वतंत्र राज्यघटना, स्वतंत्र ध्वज, संपत्ती वाटपातील वेगळे नियम, मालमत्ता खरेदीवरील बंदी अशा तरतूदी रद्द ठरणार आहेत त्यामुळे आता प्रत्येक भारतीय नागरीकावर पूर्वी केव्हाही नव्हती एवढी जबाबदारी वाढलेली आहे. देशाला ऐक्याची आणि संघटीत प्रयत्नांची आज खरी गरज आहे.

सध्या भारताचे राजकारण अत्यंत जलदगतीने बदलत आहे. भारताला वैभावाच्या शिखराकडे नेण्यासाठी आपले राज्यकर्ते जिवापाड परिश्रम करीत आहेत. अशा वेळी आपण सरकारला पाठिंबा देऊन उत्साह व स्फूर्ती निर्माण करणे हे आपणा सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. वैभवाच्या शिखराकडे आगेकूच करणाऱ्या देशाच्या संसाराला पोखरण्याचे दुष्ट कार्य करणाऱ्या लोकांना वेळीच ठेचून काढणे योग्य आहे आणि ही जबाबदारी सरकारपेक्षा भारतीय जनतेची जास्त प्रामुख्याने आहे, सरकार ही केवळ आपली प्रातिनिधिक संस्था आहे. या संस्थेला सहकार्य देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.

चालु काळात आपल्यावर फार मोठी जबाबदारी आहे. आम्हाला असे वाटते की सर्व राजकीय पक्षांनी आता एक झाले पाहिजे. आपल्यातील मतभेद दूर ठेवून देशापुढील समस्या सोडविण्याच्या दृष्टीने हे सारे पंथभेद, मतभेद बाजूला ठेवले पाहिजेत. देशाचे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी व तो एक संघ राहण्यासाठी आपण सर्वांनी एक दिलाने पुढे आले पाहिजे. देशाचा बरा-वाईट भविष्यकाळ केवळ सरकार पक्षाचा नसून तो आपण सर्व भारतवासीयांचा आहे.

देशाचा भविष्य काळ कसा आहे हे आम्ही सांगू शकत नाही, परंतु एवढे मात्र आम्ही आत्मनिष्ठेने सांगू इच्छितो की आम्ही जे चांगले करू त्याचे फळही चांगलेच मिळेल, वाईट फळ आमच्या पदरात टाकण्याचे सामर्थ्य कोणातही नाही.

देशासाठी कोणत्याही परिस्थितीस तोंड देण्यास सज्ज राहणे हे आपले परम कर्तव्य आहे. आपापसातील दुही व फुटीरवृत्ती बाजूस सारून मायभूमीच्या रक्षणासाठी आणि विकासासाठी पडतील ते कष्ट करण्याची ह्या स्वातंत्र्य दिनी आपली सर्वांची एक महान जबाबदारी ओळखून त्याप्रमाणे प्रतिज्ञाबद्ध होणे अगत्याचे आहे.

काही वर्षापूर्वी "Times of India" या वृत्तपत्राचे पहिले पान २०५० साली कस असेल? अशा आशयाचा मजकूर छापला होता त्यातील तीन गोष्टी विचार करण्यासारख्या होत्या.

१) चौपाटीच्या वाळूवर "Virtual" ताजमहल उभा केला!
२) मरीन ड्राईव्हवर पेट्रोल ऐवजी पाणी हे इंधन वापरून गाडी धावली.
३) ''चला मंगळावर'' अशी जाहिरात, "Veena Univese" या कंपनीने छापली.

त्यावेळी हे वाचून कोणालाही हसू आले असते. पण लक्षात घ्या, आज हे शक्य झाले आहे. गेल्या काही वर्षात विज्ञानाची प्रगती अंत्यत वेगात झाली आहे. उदा. काही वर्षापूर्वी पुण्याला ट्रंककॉल करावा लागत होता. आज भारताच्या काना-कोपऱ्यातून जगात कोणाशीही बोलायची सोय मोबाईल फोनवरून शक्य झाली आहे. पूर्वी अमेरिकेहून पत्राचे उत्तर येण्यास १५-१५ दिवस लागत असत, पण आता अर्ध्या सेंकंदात e-mail वर उत्तर येते. भारतानेसुद्धा चंद्रयानसारखे उपग्रह अवकाशात पाठवून आपणही ह्या तंत्रज्ञान युगात एक पाऊल पुढे आहोत हे जगाला दाखवून दिले आहे.

ह्या अशा प्रचंड वेगाने होणाऱ्या शास्त्रीय प्रगतीचा भार पेलण्याची क्षमता तुमच्यामध्ये आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर नुकतीच इटलीमधील ''सैद्धान्तिक भौतिक संशोधन केंद्राचे'' संचालक म्हणून डॉ अतीश दाभोलकर ह्या आपल्या ज्ञाती-बांधवाची झालेली नियुक्ती. याचाच कित्ता गिरवत तुम्हीही असे भव्य-दिव्य करून दाखवा.

पुन्हा एकदा सर्व विद्यार्थ्यांचे खुप-खुप कौतुक! तुमचे पुढील आयुष्य आधिकाधिक यशस्वी होवो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

संपादक
**उमाकांत गणपत महाजन**
**९६८९७८१७५०**

## आधारस्तंभ

श्री. जगजीवन श्रीकांत प्रभू केळुसकर ₹ ५०,०००/-
श्री. महादेव भास्कर सामंत ₹ ५०,०००/-
श्री. विजय विठ्ठल परुळेकर ₹ ५०,०००/-
श्रीमती वंदना केदार पाटील ₹ ५०,०००/-
श्रीमती विभावरी अरविंद पाटील-पाटकर ₹ ५०,०००/-
श्रीमती विजयालक्ष्मी द्वारकानाथ दाभोलकर ₹ ५०,०००/-
(स्व. द्वारकानाथ साबाजी दाभोलकर ह्यांच्या स्मरणार्थ)
टोपीवाला चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई ₹ ५०,०००/-
सौ. बीना विष्णु प्रभु व श्री. विष्णू विनायक प्रभु } ₹ ५०,०००/-
(स्व. परशुराम आत्माराम वायंगणकर ह्यांच्या स्मरणार्थ)
श्री. शामराव शांताराम पाटील श्रीमती उषा शामराव पाटील } ₹ ५०,०००/-
श्रीमती मीरा रघुनाथ सामंत ₹ ५०,०००/-
श्री. रामदास बी. प्रभु-कोचरेकर ₹ ३५,०००/-
(स्व. काका कोचरेकर पारितोषिक फंडात भर)
श्रीमती स्नेहलता ग. तिरोडकर ₹ २५,२२२/-
(स्व.गजानन (दादा) रघुनाथ तिरोडकर यांच्या स्मरणार्थ)
श्री. उदयराज स. सामंत नेवाळकर ₹ २५,०००/-
श्री. सुधाकर वासुदेव वालावलकर ₹ २५,०००/-
श्री. राजीव आनंदराव गव्हाणकर ₹ २५,०००/-
श्री. शशीकांत पीतांबर देसाई ₹ २५,०००/-
श्री. अच्युत वामन तेंडुलकर ₹ २५,०००/-
श्री. अरुण रघुनाथ सामंत ₹ २५,०००/-
(स्व. रघुनाथ विष्णू सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)
श्रीमती पुष्पा रामचंद्र सामंत ₹ २५,०००/-
(स्व. रामचंद्र का. सामंत व स्व. कमल रामचंद्र सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)
श्रीमती सुहासिनी दत्ताराम गाळवणकर ₹ २५,०००/-
(स्व. सुमती मधुसूदन तेंडुलकर ह्यांच्या स्मरणार्थ)
श्री. शिवराम वासुदेव तेंडोलकर, सौ. विजया शिवराम तेंडोलकर } ₹ २५,०००/-
श्री. अरविंद आत्माराम खानोलकर ₹ २५,०००/-
श्री. प्रभु-पाटकर कुटुंबीय, मुलुंड (स्व. सतिशचंद्र सहदेव प्रभु-पाटकर यांचे स्मरणार्थ) ₹ २५,०००/-
श्री. भूषण रोहित झारापकर ₹ २५,०००/-
श्री. काशीनाथ नारायण कोचरेकर, वसई ₹ २५,०००/-
(स्व. नारायण विनायक कोचरेकर व स्व. मनोरमा नारायण कोचरेकर यांच्या स्मरणार्थ)
श्री. सुधाकर भास्कर गवाणकर, (कणकवली) ₹ २५,०००/-
(स्व. सौ. सुधा सुधाकर गवाणकर हिच्या स्मरणार्थ)
सौ. नीला राजाराम गाळवणकर ₹ २५,०००/-
श्री. राधाकृष्ण शांताराम पाटील ₹ २५,०००/-
(स्व. शांताराम बाळाजी पाटील व स्व. राधाबाई शांताराम पाटील ह्यांच्या स्मरणार्थ)
सौ. भारती सुधाकर नाईक (अर्नाळा) ₹ २५,०००/-
(स्व. विश्वनाथ राजाराम सामंत व स्व. सुमती विश्वनाथ सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)
श्रीमती शरयु तेंडोलकर ₹ २५,०००/-
(स्व. प्रा. पंढरीनाथ गोपाळ तेंडोलकर ह्यांच्या स्मरणार्थ)
श्रीमती जयंती भालचंद्र पाटकर (डोंबिवली) ₹ २५,०००/-
(स्व. भालचंद्र नारायण पाटकर ह्यांच्या स्मरणार्थ)
श्रीमती सुनीता शांताराम तेंडोलकर ₹ २५,०००/-
(स्व. शांताराम दत्तात्रय तेंडोलकर यांचे स्मरणार्थ)
श्री. रोहित रजनीकांत नाईक (डोंबिवली) ₹ २५,०००/-
श्री. सुनील दिगंबर सामंत ₹ २५,०००/-
(सॉलिसीटर स्व. वासुदेव भिकाजी सामंत, ह्यांच्या स्मरणार्थ)
सौ. स्वाती अमोल तेंडोलकर ₹ २५,०००/-
(स्व. रमाकांत धोंडोपंत देसाई व स्व सुहासिनी रमाकांत देसाई यांच्या स्मरणार्थ)
श्रीमती सावित्री जगन्नाथ देसाई (वालावल) ₹ २५,०००/-
(स्व. जगन्नाथ दामोदर देसाई उर्फ काका, बांबुळकर यांचे स्मरणार्थ)
श्रीमती निशा अरुण सामंत ₹ २५,०००/-
(स्व. पती अरुण बळीराम सामंत यांच्या स्मरणार्थ)
श्री. अरुण रामचंद्र आंबेसकर ₹ २५,०००/-
(आजी स्व. ताराबाई शांताराम आंबेसकर यांच्या स्मरणार्थ)

# हार्दिक अभिनंदन

## ज्येष्ठलेखिका- वीणा गवाणकरांचा गौरव

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या दादर स्वायत्त विभागातर्फे ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके साहित्य पुरस्कार देण्यात येतो. यंदा या पुरस्कारासाठी ज्येष्ठ लेखिका वीणा गवाणकर यांची 'चरित्र' या साहित्यप्रकारासाठी निवड झाली आहे. २५ हजार रु. आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. उषा मेहता, नीरजा यांच्या समितीने ही निवड केली आहे.

# शिक्षण महर्षी भाऊसाहेब परूळेकर

जन्म : ७.७.१८८६ मृत्यूः १४.१०.१९६१



रामभाऊ परुळेकर

बालमोहन विद्यामंदिरच्या दादासाहेब रेगे यांनी तळेगाव येथे 'रामभाऊ परूळेकर विद्या निकेतन' शाळा काढून ज्यांची स्मृती चिरंतन जागृत ठेवली त्या 'शिक्षण महर्षी' म्हणून श्रेष्ठत्व प्राप्त केलेल्या रामभाऊ परूळेकर यांच्या आयुष्याची जडणघडण आपण आज पाहणार आहोत.

कोकणातील परूळे गावी अत्यंत गरीब घराण्यात जन्मलेल्या रामभाऊंचे प्राथमिक शिक्षण परूळे-वेंगुर्ले येथे, तर माध्यमिक शिक्षण मालवणच्या भंडारी हायस्कूलमध्ये झाले. त्यांनी १९०८ साली पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र या ऐच्छिक विषयांत पदवी संपादन केली. पण शिक्षणाची लालसा असल्याने एवढ्यावरच न थांबता १९१२ साली 'रसायनशास्त्र' या विषयातील एम. ए. पदवी धारण केली आणि मालवणच्या टोपीवाला हायस्कूलमध्ये रामभाऊ 'मुख्याध्यापक' पदी रूजू झाले. परंतु नोकरी मिळाली, आता सुखनैव आयुष्य जगावे हा विचार त्यांच्या मनाला कधीच शिवला नाही. लक्ष्मीपेक्षाही सरस्वतीने त्यांच्या हृदयात स्थान मांडलं होतं म्हणूनच १९१६ साली त्यांनी मुंबईच्या सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजमधून एस.टी.सी. परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला. ज्याच्या रोमारोमात सरस्वतीचा वास असतो त्याच्याजवळ लक्ष्मी आपणहून चालत येते असं म्हणतात. हाच अनुभव रामभाऊंच्या जीवनात आला. आर्थिक परिस्थिती नसतानाही परदेशात जाऊन शिकण्याची संधी त्यांना उपलब्ध झाली.

शिक्षणाचं असिधारा व्रत घेतलेला हा लाखमोलाचा हिरा दानशूर व शिक्षणप्रेमी दात्याच्या नजरेतून सुटला नाही. त्यांनी रामभाऊंना महिना ४०० रु. शिष्यवृत्ती देऊन उच्च शिक्षणासाठी १९२२ साली लंडनला पाठवलं. अर्थात त्याकाळातील हा दाता म्हणजे अनंत शिवाजी देसाई टोपीवाले हे मी सांगण्याची गरजच नाही. पण नव्या पिढीला टोपीवाले देसाई यांची अचूक पारख आणि दातृत्व ही गुणवैशिष्ट्ये समजावीत म्हणून मी हा उल्लेख करीत आहे. मिळालेल्या संधीचं रामभाऊंनी सोनं केलं. लंडनची टी.डी. व लीड्स्ची एम्.एड्. पदवी प्राप्त करून रामभाऊ १९२४ च्या फेब्रुवारीत स्वगृही परतले. त्यांच्या The Problem of Education in Bombay Presidency (With special reference to higher education) या प्रबंधामुळे एक 'प्रथितयश शिक्षणतज्ज्ञ' म्हणून त्यांना प्रसिद्धी मिळाली.

पैसा आणि प्रसिद्धीच्या बिछान्यावर लोळत पडणं ही वृत्तीच नसल्याने रामभाऊंनी शहर सोडून पुन्हा मालवणचं टोपीवाला हायस्कूल गाठलं. परंतु त्यांची विव्दत्ता, त्यांचा शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, परदेशातील अनुभव या सर्वाचा उपयोग एखाद्या शाळेपुरता मर्यादित न राहता, आपल्या शिक्षण पद्धतीस व्हावा, पर्यायाने राष्ट्र हितासाठी व्हावा म्हणून मुंबई महानगर पालिकेच्या 'शिक्षण समितीचे सचिव' पदी त्यांची नियुक्ती झाली.

'शिक्षण समितीचे सचिव' म्हणून दोन तपे कार्यभार सांभाळीत असताना रामभाऊंनी अनेक महत्त्वाच्या योजना आखून त्या प्रत्यक्षात आणल्या. अत्यंत चिकाटीने व अभ्यासू वृत्तीने 'लिटरसी इन इंडिया' या नावाचं माहितीपूर्ण पुस्तक इंग्रजी भाषेत लिहून ते दानशूर श्रीमंत नारायणराव टोपीवाले यांना भेट दिलं. प्रौढशिक्षण साक्षरता प्रसारासारख्या सामान्य जनतेसाठी उपयुक्त ठरणाऱ्या चळवळींना प्रोत्साहन दिलं. महाराष्ट्राच्या शिक्षणाविषयी रामभाऊंचा अभ्यास फार सखोल होता. स्वराज्याचं सुराज्य होण्यासाठी सर्वसामान्य जनता शिक्षित झालीच पाहिजे या संकल्पनेवर रामभाऊंनी 'मास एज्युकेशन इन इंडिया (१९३९), लिटरसी इन इंडिया इन प्री ब्रिटीश डेज् (१९४०) हे भारतीय शैक्षणिक समस्या सोडवणारे ग्रंथ लिहिले. तसेच १९४५ पासून मुंबई प्रांतातील शैक्षिणिक विषयातील महाराष्ट्र सरकारची हस्तलिखिते प्रसिद्ध करण्यास सुरूवात केली. विशेष बाब म्हणजे हे ग्रंथ व हस्तलिखिते श्री. नारायणराव टोपीवाला मेमोरियल एज्युकेशनल रीसर्च सीरीज म्हणून प्रकाशित



## स्वर्गीय श्री. एकनाथ केशव ठाकूर स्म. कर्करोग वैद्यकीय उपचार फंड :

गौड ब्राह्मण सभेतर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या ''**गौडब्राह्मण**'' या त्रैमासिकाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे (२०१४) औचित्य साधून, ४४ वर्षे कर्करोगाशी एकाकी झुंज देत ज्यांनी आपल्या समाजबांधवांना बरेच काही दिले असे स्व. श्री. एकनाथ केशव ठाकूर ह्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सभेने ''**स्व. श्री. एकनाथ केशव ठाकूर स्म. कर्करोग वैद्यकीयउपचार फंडा**'' ची स्थापना केली आहे. या मागची मूळ संकल्पना सभेचे खजिनदार श्री. मनीष गुरुदास दाभोलकर यांची आहे. त्यांनी १०० लाख रुपये निधी संकलन करण्याची घोषणा केली. तसेच रु.१ लाख ची देणगी १०० दानशुर व्यक्तींनी द्यावी असे आवाहन करत त्यांनी स्वत: या फंडाकरिता रु. १ लाख (एक लाख) रु. देणगी देऊन शुभारंभ केला होता. ह्या योजनेला दानशूरांकडून उत्तम प्रतिसाद लाभला आहे. **रु. २५,०००/- किंवा त्याहून अधिक देणगी देणाऱ्या दानशूरांची नावे कायम स्वरूपात त्रैमासिकात छापली जातात.** या फंडाच्या रकमेच्या व्याजातून ज्ञातीतील कर्करोग्रस्तांना औषधोपचारासाठी सभेतर्फे आर्थिक मदत दिली जाते. ज्ञातीतील दानशूरांनी ह्या उपक्रमासाठी सढळ हस्ते देणग्या द्याव्यात ही विनंती.

### एक लाख एक रकमी देणगी देणाऱ्या देणगीदारांची नावे :

**श्री. गोविंद महादेवराव सामंत (वाद्रे)** ₹ ३,००,०००/-
(वडील कै. महादेवराव विठ्ठल सामंत व आई कै. सौ. सिताबाई महादेव सामंत आणि बंधू कै. भास्कर महादेवराव सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. दीपक दिगंबर सामंत (अंधेरी पूर्व)** ₹ २,००,०००/-
(मामा स्व.श्री. रवींद्र चिंतामण प्रभु देसाई ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. रविंद्र बाबुराव तिरोडकर (अंधेरी)** ₹ १,००,००१/-

**डॉ. जगदीश देवराव सामंत** (करुणामहर्षी,कर्मयोगी) ₹ १,००,०००/-

**श्री. शशी प्रभू** (सुप्रसिद्ध स्थापत्यकार) ₹ १,००,०००/-

**श्री. मनीष गुरुदास दाभोलकर** (अर्थतज्ञ) ₹ १,००,०००/-

**श्री. जयंत रामचंद्र पाटील** (संचालक लुपिन) ₹ १,००,०००/-

**श्री. विकास (राजाभाऊ) पाटकर आणि कुटुंबीय** (उद्योगपती) ₹ १,००,०००/-

**श्री. यशवंत मोरेश्वर देवस्थळी** (माजी अध्यक्ष L&T) ₹ १,००,०००/-

**श्री. मोरेश्वर राजाराम आजगावकर** (लेखापरीक्षक) ₹ १,००,०००/-

**श्रीमती सुषमा सुरेश महाजन** ₹ १,००,०००/-
ह्यांच्या पति स्व. सुरेश राजाराम महाजन मातोश्री स्व. लीला अनंत खानोलकर, पिताश्री स्व. अनंत परशुराम खानोलकर ह्यांच्या स्मरणार्थ

**श्रीमती जयश्री तुकाराम वालावलकर** ₹ १,००,०००/-
(स्व. तुकाराम कान्होबा वालावलकर यांचे स्मरणार्थ)

**श्रीमती सुचेता एस. देसाई** (डोंबीवली) ₹ १,००,०००/-
(आई स्व. स्नेहलता बाबाजी सरनाईक वडिल कै. बाबाजी राजाराम सरनाईक यांच्या स्मरणार्थ)

**अनामिक** ₹ १,००,०००/-

### रुपये २५,००० व त्यापेक्षा जास्त पण १ लाखापेक्षा कमी देणगी देणाऱ्या देणगीदारांची नावे

**डॉ. चंद्रकांत वसंतराव नाईक** ₹ ७५,०००/-
(स्व. श्यामला चंद्रकांत नाईक यांच्या स्मरणार्थ)

**श्री. शिवराम वासुदेव तेंडोलकर व सौ. विजया शिवराम तेंडोलकर** ₹ ७५,०००/

**श्रीमती पल्लवी कृष्णाजी प्रभू** ₹ ७५,०००/
(वडील स्व. आत्माराम वासुदेव परुळेकर, आई स्व. निर्मला आत्माराम परुळेकर व भाऊ स्व. मधुसूदन आत्माराम परुळेकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्रीनिवास श्रीकृष्ण प्रभू केळूसकर** ₹ ५१,०००/-

**श्री. सुरेंद्र दत्तात्र्य सामंत कोपराडकर**
(ज्येष्ठ बंधू स्व. श्री. जयंत दत्तात्रय सामंत कोपराडकर रा. वसई यांच्या स्मरणार्थ) ₹ ५१,०००/-

**M.V. Samant Charitable Trust** ₹ ५०,००१/-

**श्री. मोहन बी. सामंत** ₹ ५०,०००/-

**श्री. विजय सदानंद वालावलकर** ₹ ५०,०००/-

**सौ.प्रिती महेश ठाकूर दादर** ₹ ५०,०००/-
(आई स्व.सौ. सुधा सुधाकर धोंड हिच्या स्मरणार्थ)

**डॉ. रवींद्र बाबुराव तिरोडकर** ₹ ५०,०००/-
(आजोबा (मातामह) स्व. श्री. राजाराम रघुनाथ कोंडकर सामंत, मालवण ह्यांचे स्मरणार्थ)

**श्री. अशोक सुधाकर दाभोलकर** (मातोश्री स्व. प्रेमा सुधाकर दाभोलकर ह्यांचे स्मरणार्थ) ₹ ५०,०००/-

**श्री. दीपक पद्माकर परूळेकर** (सांताक्रुझ) ₹ ५०,०००/-
(आई स्व. छाया पद्माकर परुळेकर हिचे स्मरणार्थ)

**श्रीमती उषा शामराव पाटील** ₹ ५०,०००/-
(स्व. शामराव शांताराम पाटील स्मरणार्थ)

**श्रीमती स्नैहलता गजानन तिरोडकर** ₹ ५०,०००/-
(स्व. गजानन (दादा) तिरोडकर यांचे स्मरणार्थ)

**श्रीमती कुमुद जनार्दन तेंडुलकर (नेरूळ)** ₹ ४०,०००/-
(स्व. जनार्दन भास्कर तेंडूलकर यांच्या स्मरणार्थ),

**श्री. रोहित रजनीकांत नाईक** ₹ ४०,०००/-

**श्री. मधुसुदन शंकर तिरोडकर ठाणे** ₹३०,०००/-
(स्व.शंकर आपाजी खानोलकर व स्व. उमाबाई (मावशी), वडील स्व. शंकर वामन तिरोडकर ह्यांच्या स्मरणार्थ)
स्व. विठ्ठल व स्व. रुक्मिणी दाभोलकर ह्यांच्या स्मरणार्थ

केले.

रामभाऊंनी १९४१ साली मुंबई म्युनिसिपल स्कूल्स कमिटीवरून बाजूस होऊन पुणे आणि कोल्हापूरच्या कॉलेजमध्ये प्रिन्सिपॉल म्हणून १९४८ सालापर्यंत काम पाहिले आणि १९४८ साली मुंबईत येऊन ते स्थिरावले. मुंबईच्या प्राथमिक शिक्षण व्यवस्थेवर एक रिपोर्ट लिहून मुंबई म्युनि. शिक्षण व्यवस्थेस मार्गदर्शन केलं. माध्यमिक शिक्षकांची वेतनश्रेणी ठरविण्यासाठी 'घाटे परूळेकर' नावाची जी दोनच सदस्यांची समिती बनविण्यात आली होती, त्यातले परूळेकर म्हणजे हेच ते रामभाऊ परूळेकर या कमिटीच्या अनेक योजना प्रत्यक्षात राबवल्या गेल्या. सरकारने रत्नागिरी जिल्ह्याच्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी दिली असता रामभाऊंनी ती लिलया पार पाडली. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन' ही संशोधन संस्था काढून शिक्षणाची सेवा करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी प्राप्त करून दिली. त्यांचा नावलौकिक पाहून काश्मिरचे माजी मुख्यमंत्री म.प. वा शेख अब्दुला तसेच भारताचे जागतिक किर्तीचे चाणक्य चक्रवर्ती राजगोपालचारी यांनी चेन्नईचे मुख्यमंत्री असताना चेन्नईच्या शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करण्यासाठी भाऊसाहेबांच्या अध्यक्षतेखाली समित्या नेमल्या होत्या.

त्याकाळी शिक्षकांना अत्यल्प वेतन दिले जाई. त्यामुळे उत्तम पदवीधर या क्षेत्राकडे वळत नसत. पण भाऊसाहेबांच्या मार्गदर्शनामुळे मुंबई सरकारने शिक्षकांच्या वेतन श्रेणीत मोठा बदल केला. त्याचं फलित म्हणजे मुंबईचा घसरत जाणारा शैक्षणिक दर्जा सुधारण्यास भाऊसाहेबांची मोलाची मदत झाली. जास्तीत जास्त मुले लिहावाचायला शिकावीत यासाठी तालुका पातळीवर दुबार शिक्षण योजना अंमलात आणावी ही महत्त्वपूर्ण सूचना रामभाऊंचीच होती.

रामभाऊ केवळ पदव्या घेऊन शिक्षणाचार्य बनले नव्हते तर स्वतः कायम एक विद्यार्थी म्हणून जगत होते. म्हणून तर पद, पैसा, मोठेपणा यापेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे त्यांना विद्यार्थ्यांविषयी कणव होती. त्यांची दृष्टी नेहमीच विद्यार्थ्यांचं भलं कसं होईल याचा शोध घेत असे. पुढील उदाहरणंवरून हाडाचा शिक्षक म्हणजे काय असतं ते वाचकांच्या लक्षात येईलच. रामभाऊंनी मुंबई म्युनिसिपालटीचे सेक्रेटरी म्हणून १९२८ ते १९४१ पर्यंत पदभार सांभाळला होता. या काळात सुरूवातीच्या ५७ वर्षांत चौथीची परीक्षा शिक्षणखाते घेत असे. त्यात सरकारी ऑफिसर परीक्षक म्हणून असत. मुलांना नापास करण्याकडे सरकारी अधिकाऱ्यांचा कल जास्त असे. म्हणून ते शुद्धलेखनाकडे बारकाईने पाहत असत. तसेच गणित विषयाच्या पेपरात मुलांना न पेलवणारी मोठमोठ्या व्यवहाराची कठीण उदाहरणे घालीत ज्यामुळे चौथीत गेलेल्या मुलाला शून्य गुण मिळत. पण रामभाऊंनी याबाबतचा सखोल अभ्यास करून परीक्षा पद्धतीत मोठा बदल घडवून आणला. शिक्षणाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी फार वेगळी होती. रामभाऊंनी प्राथमिकच्या प्रश्नपत्रिका काढण्याचा अधिकार 'स्कूल कमिटीला' मिळवून दिला. स्वतः एक नमुना प्रश्नपत्रिका काढून मुलांना ३० गुण कसे मिळतील हे दाखवून दिले. त्यामुळे मुलांच्या समोरील परीक्षेचा बागुलबुवा दूर झाला व निकालात लक्षणीय बदल घडून येऊ लागला. रामभाऊ स्वतःचं बालपण कधीही विसरले नाहीत. बालसुलभ वृत्तीतील व्रात्यपणा लक्षात घेऊनच ते मुलांकडे पाहत असत. म्हणून तर टोपीवाला हायस्कूलमध्ये झाडाच्या कैऱ्या तोडणाऱ्या वरच्या वर्गातल्या मुलाला त्यांनी हेडमास्तरांच्या देखत दगड मारल्याने आसपासच्या घरांवर होणारे परिणाम समजावून दिले. त्याला गुन्हेगार मानून कठोर शिक्षा केली नाही.

पित्याच्या नात्याने रामभाऊ मुलांकडे कसे पाहत याचं आणखीन हे एक उदाहरण. गोष्ट आहे १९३२ सालची. माटुंग्याच्या रेफर्मेटरी शाळेच्या मुलांची परीक्षा दादरच्या शाळेत चालू होती. एका मुलाच्या पायाजवळ भाषा विषयाचं गाईड केंद्र संचालकाच्या नजरेस पडलं. त्या अधिकाऱ्याने मागचापुढचा तपास न करताच त्या मुलास गुन्हेगारांच्या शाळेतील मुलगा म्हणून मारहाण केली होती. मुलांच्या शिक्षकाने या मुलांना सरकारतर्फेच पुस्तके मिळतात. हे गाईड या मुलाचे नाही हे सांगण्याचा प्रयत्न केला पण छे! तो अधिकारी वर्दीच्या तोऱ्यात होता.

## रुपये २५,००० व त्यापेक्षा जास्त पण १ लाखापेक्षा कमी देणगी देणाऱ्या देणगीदारांची नावे

**स्व. सत्यभामा आत्माराम सामंत** ₹ २८.०००/–
**आणि स्व. आत्माराम रावजी सामंत**
**उर्फ भाऊ नमस्कर ह्यांचे स्मरणार्थ**

**श्री. बाबाजी राजाराम सरनाईक**
**(स्व. सौ. स्नेहलता बाबाजी सरनाईक**
ह्यांच्या स्मरणार्थ) ₹ २५,००१/–

**सरिता गवाणकर** ₹ २५,०००/–

**श्री. संजीव ए. दाभोलकर** ₹ २५,०००/–
(स्व.सौ.कुमुद व स्व.एकनाथ दाभोलकर स्मरणार्थ)

**श्री. दिगंबर पुजारी,** नरसोबावाडी ₹ २५,०००/–

**श्री. अरुण सुधाकर गोसावी** ₹ २५,०००.–
(स्व. कमलताई सुधाकर गोसावी स्मरणार्थ)

**सौ. अनिता नीतीन गायतोंडे** ₹ २५,०००/–
(पीताश्री कै. श्री. अरविंद रामकृष्ण सामंत नेवाळकर स्मरणार्थ)

**श्रीमती सुनीता शांताराम तेंडोलकर** ₹ २५,०००/–
(स्व. शांताराम दत्तात्रय तेंडोलकर यांच्या स्मरणार्थ)

**श्री. नरेंद्र श्री. श्रीमल (चैनई)** ₹ २५,०००/–

**नोबेल फार्मा** ₹ २५,०००/–

**लूपीन फार्मा–पी. ए. पाटील** ₹ २५,०००/–

**सौ. संध्या सुरेश प्रभू** ₹ २५,०००/–
(स्व. वत्सला भि. प्रभू हिच्या स्मरणार्थ)

**सौ. लता परमानंद देसाई** ₹ २५,०००/–
**व श्री. परमानंद देसाई**

**श्री. देवदत्त आत्माराम खानोलकर** ₹ २५,०००/–

**श्री. व्ही. जी. सामंत** ₹ २५,०००/–

**श्री. राधाकृष्ण शांताराम पाटील** ₹ २५,०००/–
(स्व. सौ. वसुंधरा राधाकृष्ण पाटील
ह्यांच्या स्मरणार्थ)

**डॉ. सरिता श्रीपाद झारापकर** ₹ २५,०००/–
(स्व.प्राचार्य श्रीपाद रामचंद्र झारापकर
ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्रीमती मोहना मोहन वालावलकर** ₹ २५,०००/–
**श्री. मोहन रमाकांत वालावलकर**

**Ms. SANKET LOGTESYS PVT. LTD.** ₹ २५,०००/–

**सौ. सुषमा सुभाष सामंत (अंधेरी)** ₹ २५,०००/–

**श्री. आप्पाजी गजानन सामंत–** ₹ २५,०००/–
(चुलते स्व. बाळकृष्ण आप्पाजी सामंत स्मरणार्थ)

**डॉ. सुरेश भास्कर आजगांवकर** ₹ २५,०००/–

**सौ. अनिता नीतीन गायतोंडे** ₹ २५,०००/–

**श्री. सुधाकर लक्ष्मण धोंड, (सायन)** ₹ २५,०००/–
(पत्नी कै.सौ. सुधा सुधाकर धोंड हिच्या स्मरणार्थ)

**श्री. निहार खानोलकर** ₹ २५,०००/

**सौ. श्रद्धा राहूल सामंत व**
**सौ. वीणा विष्णू प्रभू** ₹ २५,०००/–

**डॉ. जयश्री नाईक नातू** ₹ २५,०००/–

**सौ. शिल्पा जयंत रामदास व**
**श्री. विष्णू व्ही प्रभु** ₹ २५,०००/–

**श्रीमती सरोज खानोलकर (यंग)** ₹ २५,०००/–

**श्री. विद्याधर प्रभाकर वैद्य** ₹ २५,०००/–

**श्रीमती शुभांगी तुकाराम सामंत** ₹ २५,०००/–
(स्व. तुकाराम वामन सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. अविनाश रघुनाथ सामंत (माहिम)** ₹ २५,०००/–
(स्व. सुनंदा रघुनाथ सामंत व
स्व. रघुनाथ राजाराम सामंत यांच्या स्मरणार्थ)

**श्रीमती सरिता रमाकांत गवाणकर (गोरेगाव)** ₹ २५,०००/–

**श्रीमती पुष्पा दत्तात्रय दाभोळकर (गिरगाव)** ₹ २५,०००/–

**श्री. विठ्ठल आत्माराम सामंत** ₹ २५,०००/–
(स्व.सौ. शुभा विठ्ठल सामंत हिसे स्मरणार्थ)

**श्रीमती नीला भालचंद्र नाईक** ₹ २५,०००/–

**श्री. अरविंद आत्माराम खानोलकर** ₹ २५,०००/–

**श्री. राजेंद्र भिकाजी सामंत व सौ. वर्षा राजेंद्र सामंत** ₹ २५,०००/–
(स्व. विजया बा. सामंत, स्व. भिकाजी ल. सामंत, स्व. हरिभाई व. सामंत, स्व. सुधा द. ठाकूर व स्व. दत्तात्रय व. ठाकूर ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. सदानंद राजाराम सामंत** ₹ २५,०००/–

❑ ❑ ❑

With Best Compliments From

TLD.
ESTD : 1916

**P. S. Samant**
Cell : 99250 83201

**M/s. Tukaram Laxman Desai**

**Wholesellers & Retailers-Metal Wares**

93-95, Kansara Chawl,
Kalbadevi Road, Mumbai - 400 002.
Tel. : (Shop) : 2242 8634
(Resi.) : 2388 5217.

नशिबाने त्याचवेळी शाळा तपासनीस म्हणून रामभाऊंनी शाळेत पाऊल टाकलं. सर्व प्रकार त्यांच्या चाणाक्ष नजरेतून सुटला नाही. रामभाऊंनी त्या अधिकाऱ्यास योग्य ती समज तर दिलीच पण त्याच्याही पुढे जाऊन त्या मुलाची स्पेशल परीक्षा घेतली. त्याचं नुकसान होऊ दिलं नाही. असे होते रामभाऊ. पुढ्यात येणाऱ्या प्रत्येक मुलाच्या बालमनाचं पुस्तक वाचणारा एक पितृतुल्य शिक्षक. अशी किती उदाहरणे देऊ?

रामभाऊंना त्यांच्या हुद्यावरून मोटार देण्यात आली होती. भाऊंपेक्षा मित्रपरिवाराला या मोटारीचा उपयोग जास्त होत असे. विशेष गोष्ट म्हणजे त्यांनी आपल्या ड्रायव्हरला त्याच्या मुलाबाळांना महालक्ष्मी दर्शनास नेण्यासाठी स्वतःची मोटार स्वखुशीने दिली होती. यावरून त्यांच्या विशाल हृदयाची कल्पना आपण करू शकतो. जेवढी अभ्यासाबाबत त्यांना तळमळ होती तेवढीच ओढ क्रीडा प्रकाराबाबतही होती. क्रिकेट तर त्यांचा आवडता खेळ होता. क्रिकेटचे सामने सुरू झाले की, तासनतास ते रेडिओला कान लावून बसत असत.

भाऊसाहेबांचा विद्यावृद्धी समाज, निराश्रित सहाय्यकारी फंड, गौडबाह्मण सभा या संस्थांशी घनिष्ठ संबंध होता. टोपीवाला चॅरिटी ट्रस्टचे ते विश्वस्त होते. आचार्य अत्रे भाऊसाहेबांना गुरूस्थानी मानीत असत. भाऊसाहेबांनी अत्रेंना बी.टी.च्या परिक्षेत मार्गदर्शन केलं होतं. भाऊसाहेबांनी निवृत्ती नंतर बालमोहन विद्यामंदिरचे प्रमूख 'मानद सल्लागार' म्हणून १९४६ पासून अखेरच्या श्वासापर्यंत जबाबदारी पेलली.

रामभाऊंच्या मित्रपरिवाराबद्दल लिहायचं म्हटलं तर अंक भरून जाईल. ते जिथे जिथे गेले, तिथे तिथे त्यांनी मित्रपरिवार गोळा केला. याचं कारण म्हणजे त्यांच्यापाशी असलेली गुणग्राहकता. बालमित्र दत्तात्रय सामंत, कॉलेजमित्र रावसाहेब स. शिरगावकर, विलायतेत असतानाचे डॉ. वसंतराव खानोलकर व एस. आर. देशपांडे, शैक्षणिक क्षेत्रातील जे. जे. नाईक, डी.के. कुळकर्णी, आचार्य मो. वा. दोंदे, टी. के. एन. मेनन, के.टी. मंत्री, डॉ. एस. एस. भांडारकर, प्रिं सी.आर. तावडे, एस.एस. नाईक अशी नावे तरी किती घेणार? जो सान्निध्यात आला त्याला मित्र बनवण्याची कला रामभाऊंपाशी होती. कोट्याधीश विद्याप्रेमी अनंत शिवाजी देसाई टोपीवाले, त्यांचे चिरंजीव श्रीमंत नारायणराव आणि नातू मोतीरामशेठ (रामभाऊंचा विद्यार्थी). टोपीवाले घराण्यातील तीन पिढ्यांनी रामभाऊंवर अपार प्रेम केलं. रामभाऊंना सत्कार्यासाठी लाखो रूपयांच्या देणग्या दिल्या ज्यामुळे त्यांना आपलं कार्य अधिक जोमाने करता आलं. आचार्य प्र.के. अत्रे, विनोदवीर पु.ल. देशपांडे, राजकारणी स. का. पाटील, इंडियन एज्युकेशन सोसायटीचे मुख्या. पाटकर सर अशा विविध क्षेत्रातील महनीय व्यक्तिंच्या सहवासात रामभाऊ वावरले होते. शिक्षणक्षेत्रातील 'पितामह' या नात्याने व आदराने ही मंडळी रामभाऊंशी वागत असे.

असे हे भाऊसाहेब परूळेकर वरवर कठोर वाटले तरी मनाने अतिशय कोमल होते. प्रसंगी पदरमोड करून दुसऱ्याला अडचणीत मदत करणारे. घेणारा घेतो आणि काम झाल्यावर विसरूनही जातो. असे अनेकजण त्यांना भेटले पण त्याने न फेडलेल्या कर्जाची भाऊसाहेबांनी कुठेही वाच्यता केली नाही.

रामभाऊ आणि त्यांचे बंधू महादेवराव (बाबुराव) या दोघांचाही कुटुंबकबिला फार मोठा असूनही दोन्ही कुटुंबातील मुले, लेकीसुना, नातवंडे विविध खात्यात उच्चपदावर विराजमान झाली याच्या मागचे सूत्र म्हणजे रामभाऊंचे सक्रिय मार्गदर्शन हेच होय. परूळेकर कुटुंबाचा विस्तार पाहण्याचं भाग्य रामरावांना लाभलं हीच त्यांची मोठी पुण्याई होती.

रामभाऊंचं बालपण कोकणच्या निसर्ग सान्निध्यात गेलं तर शालेय जीवन संपल्यानंतरचं आयुष्य शहरात गेलं. परदेशाचाही अनुभव त्यांच्या गाठीशी होता पण स्वदेशाशी नाळ जुळलेली असल्याने परदेशाचं भूत त्यांच्या वाऱ्यालाही फिरकलं नाही. त्यांचं कुटुंब दादरमध्ये पोर्तुगीज चर्चजवळ असलं तरी रामभाऊंचा मात्र छबिलदास शाळेतच जास्तीत जास्त वेळ जात असे. सकाळी साडेपाच ते रात्री दहा हा त्यांचा दिवस. यात सर्वसामान्य माणसासारखं दैनिक व्यवहाराबरोबरच लेखन, वाचन, लोकांच्या गाठीभेटी, मित्रपरिवाराशी

## गौड ब्राह्मण सभा
## स्व. लक्ष्मीबाई दि. खानोलकर, स्व. दिनकर खानोलकर सभागृह कोष :



लक्ष्मीबाई खानोलकर

आपल्या ज्ञातीतील एक दानशूर महिला स्व. लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर (गोरेगाव) यांनी आपल्या मृत्यूपत्राद्वारे गोरेगाव (पूर्व) येथील नीलाश्री सोसायटीतील आपली सदनिका गौड ब्राह्मण सभेला दान केली आहे. त्यांनी आपल्या मृत्यूपत्रात व्यक्त केलेल्या इच्छेनुसार गौड ब्राह्मण सभेने त्यांच्या व त्यांच्या पतीच्या स्मृतिप्रीत्यर्थ ''**स्व. लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर, स्व. दिनकर खानोलकर सभागृह कोष**'' फंडाची स्थापना केली असून भविष्यात या फंडाच्या रकमेतून भव्य सभागृह उभारण्यात येणार आहे. जागा, जमीनजुमला, निवासी घर दान करणारे किंवा **रु.५,००,०००/-(रुपयेपाच लाख)** व त्याहून अधिक रक्कम देणाऱ्या दात्यांचे फोटो त्यांची नावे सभागृहात लावण्यात येतील तसेच **रु. १,००,०००/- (रुपये एक लाख)** व त्याहून अधिक रक्कम देणाऱ्या दात्यांची नावे देखील सभागृहात लावण्यात येतील. या सर्व दानशूरांची नावे कायम स्वरूपात संस्थेच्या गौड ब्राह्मण त्रैमासिकात छापण्यात येतील. ज्ञातीतील दानशूरांनी संस्थेच्या ह्या प्रकल्पाला सढळ हस्ते देणग्या द्याव्यात ही विनंती.

## आतापर्यंत संस्थेला प्राप्त झालेल्या देणग यांचा तपशील

- **स्व. लक्ष्मीबाईदिनकर खानोलकर व स्व. दिनकर खानोलकर** यांनी सभेला दान स्वरूपात दिलेल्या सदनिकेचे बाजारमूल्य — रु. ९२,००,०००.००
- **स्व. लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर व स्व. दिनकर खानोलकर**गोरेगाव (पूर्व) ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ — रु. ५,४३,७९८.५९
- **सौ. वंदना गुरुदास दाभोलकर,**गोरेगाव (पूर्व), (वडील स्व. सदाशिव नारायण प्रभुपाटकर (मूळगाव-हुंबरट, ता. कणकवली) ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ — रु. १,०५,००१.००
- **श्री. सुरेंद्र दत्तात्रय सामंत कोपराडकर व सौ. स्नेहलता सुरेंद्र सामंत कोपराडकर,** वसई (वडील स्व. दत्तात्रय त्रिंबक सामंत कोपराडकर आणि आई स्व. वत्सला दत्तात्रय सामंत कोपराडकर ह्यांच्या स्मरणार्थ. — रु. १,०२,०००.००
- **श्रीमती शरयू पंढरीनाथ तेंडोलकर** (कांदिवली) — रु. ५०,०००.००

### अधिक माहितीसाठी संपर्क :

| **उमाकांत महाजन** | **मनीष दाभोलकर** | **रत्नाकर तेंडोलकर** | **सुभाष वाघ** |
|---|---|---|---|
| (कार्याध्यक्ष) | (खजिनदार) | (चिटणीस) | (चिटणीस) |
| ९६८९७८१७५० | ९८२१२५८०४७ | ९८१९१५९१४६ | ९९२०७५२४७९ |

**आपली देणगी ''गौड ब्राह्मण सभा'' या नावाने आपण पुढील खात्यात जमा करू शकता.**

| Bank Name | Branch | Account No. | IFSC Code No. |
|---|---|---|---|
| SARASWAT CO-OP. BANK LTD. | GIRGAON | 002200100027556 | SRCB0000002 |

NEFT **किंवा खात्यात पैसे जमा केल्यास कृपया संस्थेस**
e-mail- gbs.girgaon@gmail.com **अथवा दूध्वनी (०२२) २३८५००१५ अथवा पत्राद्वारे कळवावे.**

गप्पा असा दिवसभराचा भरगच्च कार्यक्रम असे. बालमोहन शाळेशी त्यांचा एवढा घरोबा होता की, बालमोहन शाळा म्हणजे जणू त्यांचा दुसरा संसारच!

त्यांना कर्जात राहणं बिलकूल रूचत नसे म्हणून तर त्यांनी परदेशवारीसाठी टोपीवाले यांच्याकडून घेतलेलं कर्ज परत केलं होतं. मोतीरामशेठ पैसे परत घेईनात तेव्हां रामभाऊंनी ती रक्कम मोतीरामशेठ यांना, त्यांचे वडील नारायणराव यांच्या स्मरणार्थ राजापूर हायस्कूलला देण्यास भाग पाडलं. त्यांनी स्वतःच्या शिक्षणासाठी परदेश दौरा केला होता तर शैक्षणिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी म्हणून भारतदौराही केला होता. कराची, दिल्ली, काश्मीर, मद्रास, अजिंठा, वेरूळ, म्हैसूर अशा बऱ्याच ठिकाणांना रामभाऊंनी ट्रेनने अथवा विमानाने प्रवास करून भेट दिली होती. देशाच्या उन्नतीसाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे त्यांच्या जीवनाचं सूत्र होतं. कामात कितीही व्यस्त असले तरी त्यांना नातलगांचाही ओढा होताच. म्हणून तर उतारवयात मालवणला जाऊन महिनाभर राहून भावंडे, नातलग, शालेय मित्रपरिवार यांच्या सहवासाचं समाधानही मिळवलं होतं.

भाऊसाहेबांनी भूषविलेली महत्त्वाची पदे १. संयुक्त परीक्षा मंडळावर नेमणूक (१९२५) २. मुं.म्युनि.कॉर्पो.च्या स्कूल्स कमिटीचे सेक्रेटरी (१९२८) ३. प्रौढ साक्षरता मंडळाचे सभासद ते अध्यक्ष (१९३७) ४. टिळक कॉलेज ऑफ एज्यु. (पुणे) चे व्हाइस प्रेसिडेंट (१९४१) ५. महाराणी ताराबाई टीचर्स ट्रेनिंग कॉलेज (कोल्हापूर) चे प्रिन्सिपल (१९४३) ६. बालमोहन विद्यामंदिरचे सल्लागार (१९४६ ते १९६१ पर्यंत.) ७. घाटे-परूळेकर मंडळावर सभासद (१९४८) ८. एस.एस.सी. परीक्षा बोर्डावर सभासद (१९५१) ९. मद्रास प्राथ. शिक्षण मंडळावर मद्रास सरकारतर्फे अध्यक्ष म्हणून नेमणूक (१९५४)

मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या अध्यक्षतेखाली रामभाऊंचा ७० वा वाढदिवस (७ जुलै १९५६) साजरा करण्यात आला तेव्हां मित्रवर्गाने रामभाऊंवर बनवलेला गौरव ग्रंथ त्यांना अर्पण केला होता. रामभाऊंचं नशीब एवढं थोर की, त्यांच्या पंचाहत्तरीच्या सोहळ्यास त्यांचे प्राथमिक शाळेतील पहिले गुरू दत्तात्रय यशवंत ऊर्फ बाबा रेगे (वय वर्ष ९०) हे व्यासपीठावर रामभाऊंच्या बाजूस विराजमान होते. असं परम भाग्य कोणाला लाभलंय?

या थोर शिक्षणतज्ज्ञाला १९६१ साली (वय वर्ष ७५) हृदय विकाराचा झटका आला व त्यांचं निधन झालं. भाऊसाहेब गेल्याची दुःखद बातमी त्यांच्या मित्राने, आचार्य अत्रे यांनी 'रामभाऊ परूळेकर गेले' अशा गौरवपूर्ण ठळक अक्षरात लिहून सुंदर अग्रलेख लिहिला होता. त्यांना अंतीम निरोप देताना अत्रे म्हणाले होते.

रामभाऊंसारखा प्रचंड विव्दत्तेचा असामान्य माणूस उत्तर किंवा दक्षिण प्रांतात जन्माला आला असता तर शिक्षण क्षेत्रातील एक महान अधिकारी म्हणून नावलौकिक मिळवून गेला असता.

आपल्या ज्ञातीच्या या अजातशत्रू शिक्षण महर्षीस आम्हां ज्ञाती बांधवांतर्फे मानाचा मुजरा.

**सौ. गीता परुळेकर, बोरिवली**
मो. : ९१७२३२५०३१


# सर्व ज्ञाती बांधवाना विशेष आव्हान

श्री लक्ष्मीनारायण देवस्थान वालावल येथे देवस्थानाला लागून भक्ताना रहाण्यासाठी चांगली सोय ट्रस्ट मार्फत केली आहे. सर्व ज्ञाती बांधवानी व भक्तांनी ह्या गोष्टीचा लाभ घेण्यासाठी खालील व्यक्तीशी संपर्क साधावा.

संपर्क :- **श्री. खानोलकर**
०९४२०३७९६३०/९४०३२९८७०८
www.slntnest.org किंवा
**श्रीलक्ष्मीनारायणट्रस्ट वालावल**

With Best Compliments From

NSB PROPERTIES

B-8 Bageshri, Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai - 400 025.
Phones : 24463599, 24441360 Fax : 24448192
E-mail : nsbproperties@yahoo.com




NSB Properties is a constituent of the 40 years old NSB Group having interest in the fields of Training, Finance and Real Estate Development. NSB Properties is committed to develop landmark projects on a firm bedrock of Construction Quality and Customer Delight.

NSB Properties has completed several residential projects (including redevelopment) in Mumbai (Vile Parle, Goregaon, Dadar), Pune and Goa.

Do get in touch with us if you wish to re-develop your property.

# विरार भूषण, वामनराव त्र्यंबक सामंत

**जन्म: १२ .०६. १९२३ मृत्यु : २५.१०.२०१२**



वामनराव सामंत

यशवंत, जयवंत, कीर्तीवंत मंडळी ही त्या त्या ज्ञातीची चिरकाल भूषणे असतात. गेल्याच अंकात उदाहरणादाखल म्हणून आपण विविध क्षेत्रातील काही मान्यवर मंडळींची यादी पाहिली. अर्थात ती यादी निश्चितच अपूर्ण आहे. यशोशिखरावर विराजमान झालेल्या प्रत्येक ज्ञातीबांधवाचं बालपण, तारूण्य किती दगदगीचं, धकाधकीचं गेलं हे वाचताना आपल्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहत नाही. एवढंच नव्हे तर हयात नसलेली, कधीही न पाहिलेली ती व्यक्ती आपल्या मनात घर करून बसते. त्या व्यक्तिंबद्दल आदरभाव निर्माण होतो. आपल्या ज्ञातीसाठी, समाजासाठी त्या महनीय व्यक्तिंनी दिलेलं योगदान पुढील पिढीला ज्ञात व्हावं या हेतूनेच संपादक मंडळाने अशा थोरांची जडणघडण प्रकाशित करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. आज आपण परिचय करून घेणार आहोत तो 'विरारचं भूषण, विरारचा आधारवड, एक कर्मयोगी, कुशल मार्गदर्शक' अशा विविध विशेषणांनी समाजाने गौरविलेल्या वामनराव त्र्यंबक सामंत यांच्या जीवनपटाचा.

वामनराव सामंत ऊर्फ अप्पा हे नाव घेताच डोळ्यांसमोर उभं राहतं ते विरारचं संजीवनी रूग्णालय. अप्पांच्या अथक प्रयत्नाने १५ फेब्रुवारी १९५९ रोजी 'संजीवनी' नावाच्या एका छोट्याशा रूग्णालयाचा विरारमध्ये जन्म झाला. लवकरच रजत महोत्सवाकडे वाटचाल करणारं हे रूग्णालय आजही अप्पांच्या तत्वांचं, ध्येयधोरणांचं पालन करीत कार्यरत आहे. दिवसेंदिवस महागाई वाढली, काळ बदलला पण या रूग्णालयाने अप्पांच्या तत्त्वांना कधीच बगल दिलेली नाही. सरकारी मदतीशिवाय जोमाने धावणारं, वटवृक्षाप्रमाणे बहरलेलं, अत्याधुनिक सुखसोयींनी सज्ज झालेलं आणि विशेष म्हणजे वंचितांना कमीतकमी खर्चात सर्व प्रकारची आरोग्यसेवा देणारं असं दूरवर ख्याती पसरलेलं हे एकमेव रूग्णालय आहे. वसई विरार पासून पालघर, डहाणूपर्यंतच्या रूग्णांचं एक हक्काचं आशास्थान.

स्वतः डॉक्टरी पेशात नसतानाही आत्मविश्वासाने रूग्णसेवेसारख्या महागड्या समाजसेवेचा रस्ता धरणारे अप्पा सामंत हे मूळचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुणगे गावचे. जवळ जवळ शंभर वर्षापूर्वी त्र्यंबक आणि महादेव सामंत या दोन नातवंडांना घेऊन सिताबाई नारायण महाजन यांनी पोटापाण्यासाठी मुंबईत येण्याचं धाडस केलं. मुंबईतील अनंत शिवाजी देसाई टोपीवाले यांच्या ओळखीने आजी विरारला पोहचल्या. अर्नाळ्यातील गौड ब्राह्मण समाजाने त्यांना आश्रय दिला. या दोन्ही बंधुंनी अर्नाळ्यात शिक्षक म्हणून कामाचा प्रारंभ केला. पुढे ओळखीदेळखी वाढत गेल्या आणि त्यांनी मारवाड्यांच्या संपर्कामुळे धान्याचा व्यापार सुरू केला.

त्र्यंबक सामंत यांच्या वामन आणि मनोहर या दोन मुलांपैकी आगाशीच्या के.जी. हायस्कूलमध्ये शालान्त परीक्षेत पहिला तर बोर्डातून तिसरा क्रमांक प्राप्त करून, थोर साहित्यिक न. चि. केळकर यांच्या हस्ते पहिल्या क्रमांकाचं बक्षिस घेऊन आपल्या नावाला वलयांकित करणारा विद्यार्थी म्हणजेच वामन सामंत. या भरघोस यशामुळे शाळा, समाज, गाव सगळेच नावारूपाला आले होते. खरं म्हणजे वैद्यकीय क्षेत्रात जाऊन गोरगरिबांची सेवा करणं हा वामनचा विचार होता पण वडिलांनी व्यापारात लक्ष घालावं लागेल असा हट्ट धरल्यामुळे हा नुकतीच मिसरूड फुटणारा युवक पुढील शिक्षणासाठी मुंबईच्या रूईया कॉलेजमध्ये गेला. कॉलेजमध्ये अनेक नेत्यांची भाषणे त्याच्या कानावर पडू लागली. पण भारतीय लोकशाही ही खऱ्या अर्थाने जनतेला महत्त्व देणारी लोकशाही नसून ती मते मिळवून निवडून आलेल्या प्रतिनिधींची लोकशाही असते हा जयप्रकाश नारायण यांचा विचार या तरूणाला मनोमन भावला. जोडीला होतं पा. वा. गाडगीळांचं लोकमान्य वृत्तपत्राचं वाचन. स्वातंत्र्य लढ्याने सारा देश पेटून उठला होता. अफाट वाचन, देशभक्तीपर ऐकलेली परखड भाषणे आणि भारावून गेलेलं वातावरण. हे तरूण सळसळतं रक्त मोठ्या जोषाने १९४२ च्या चळवळीत उतरून सक्रिय

*With Best Compliments From*

# M/s Gromotech Agrochem Pvt Ltd

E-40, MIDC, Islampur



# Shri Anang Babaji Mainkar

Vrindavan, Nakshatra Park,
Kolhapur.

झालं. आणि 'सावकारी पाश' हे नाटक लिहून जनजागृतीसाठी खेडोपाडी जाऊन त्याचे प्रयोग करण्यात गुंतलं.

अशातच गणेशपुरी येथे वामनची नित्यानंद स्वामींशी भेट झाली. स्वातंत्र्य लढ्यात उतरण्यापेक्षा शिक्षण पूर्ण करून अधिक चांगल्याप्रकारे देशसेवा करता येईल, आईवडिलांची सेवा हीच देशसेवा असा सल्ला स्वामिजींनी दिला आणि वामन पुन्हा शिक्षणाकडे वळला. एक इंग्रजी विषय वगळता बाकी सर्व विषय संस्कृत भाषेत लिहून त्यानं संस्कृत भाषेवरचं प्रभुत्व सिद्ध केलं. १९४५ साली बी.ए. ऑनर्स पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण करून नित्यानंद स्वामिजींनी दिलेला पाठ पूर्ण केला. मधल्या काळात म्हणजे १९४४ साली स्वामी विवेकानंदांचे शिष्य विरजानंद यांचेकडून वामनला मंत्रदिक्षा मिळाली. शिवाय बापूजींच्या नागपूरच्या सेवाग्राम आश्रमात काही दिवस राहून ग्रामिणसेवा कार्यकर्त्याचा त्याने अनुभव घेतला. कॉलेज जीवनात रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद यांच्या साहित्याचं वाचन केल्यामुळे शिक्षणाचं महत्त्व लक्षात आलं व विल्सन कॉलेजमध्ये जाऊन मुंबई विद्यापीठाची महिना ५० रु. स्कॉलरशीप घेऊन १९४७ साली एम.ए. पदवी धारण केली. पण एवढ्यावरच वामन थांबला नाही. साहित्य वाचनाचा प्रभाव एवढा जबरदस्त होता की, राजकारण अथवा समाजसेवा करायची तर शिक्षण हाच एक मार्ग आहे हे जाणून दोन वर्षे अभ्यास करून १९५१ साली एल.एल.बी. पदवी प्राप्त केली. भारतातील नावाजलेले निवृत्त न्यायाधीश यशवंत चंद्रचूड यांच्या हाताखाली कायद्याचा अभ्यास करण्याची सुवर्णसंधी वामनला लाभली. वामनचं मराठी, इंग्रजी आणि संस्कृत भाषेवर प्राबल्य तर होतंच पण राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषेत 'कोविद' पदवी सुद्धा या तरूणाने प्राप्त केली. जातीवंत बुद्धिमान मुले शिक्षणाबाबत कोणत्याही क्षेत्रात गेली तरी ती पारंगत होतात हेच खरं.

अशाप्रकारे सरस्वतीचा वरदहस्त लाभलेल्या वामनने आता मात्र 'शिक्षण' ह्या टप्प्याला पूर्णविराम देऊन खऱ्या अर्थाने आयुष्याला सुरूवात केली. खादी अंगावर चढवून वकिली करणारा वामन दिवाणी व एक गुन्हेगारी केस लढण्यात यशस्वी झाला पण वकिली करताना अंगावर चढवलेली खादी त्याचे मन अस्वस्थ करू लागली. वकिली हा पोटभरण्याचा पेशा असेल तर आपण खादी अंगावर चढवून आपल्या विवेक बुद्धीशी प्रतारणा करीत असल्याची भावना मनात येऊ लागली आणि वामनने वर्ष दोन वर्षातच वकिली पेशाला कायमचा राम राम ठोकला. याच दरम्याने काँग्रेस पक्षात प्रवेश केला. पण तिथली बजबजपुरी पाहिली आणि राजकारण हा आपला पिंड नाही हे वेळीच ओळखून अफाट बुद्धिमता व चातुर्य अंगी असूनही राजकारणाकडे कायमची पाठ फिरवली.

वामन शिक्षणात रममाण झालेला असताना इकडे विरार गावी केवळ पोटासाठी आजी बरोबर मुंबईत आलेले वामनचे वडील आणि काका यांनी कष्टाने व सचोटीने अहोरात्र मेहनत करून मारवाड्यांच्या मदतीने व्यापारात उडी घेतली होती. व्यापारातून शंभर एकर जमीन खरेदी केली होती. खरं म्हणजे द्विपदवीधर मुलाने वडिलोपार्जीत व्यापारात लक्ष घालणं हा सरळसोट मार्ग कोणाही युवकाने नक्कीच स्विकारला असता पण वामनाचा पिंड वेगळा होता. आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्यासाठी व्हावा हा विचारच त्याच्या मनाला कधी शिवला नाही. उलटपक्षी सानेगुरूजी, स्वामी विवेकानंद, आचार्य विनोबा भावे, म. गांधीजी, रामकृष्ण परमहंस अशा थोरामोठ्यांच्या साहित्य आणि काहींचा लाभलेला सहवास यामुळे वामनला प्रेरणा मिळाली. सरपंच म्हणून निवड होण्यापूर्वी पायदळी तुडवलेल्या रस्त्यांनी वामनला समाजातील दारिद्र्याची ओळख करून दिली. आणि त्याने आपली नाव समाजकार्याकडे वळवली.

खरं म्हटलं तर राजकारण, समाजकारण, कलाकौशल्य, क्रीडा, व्यापार उद्योग, रूग्णसेवा, शिक्षणकार्य असं कोणतंही क्षेत्र असलं तरी त्या क्षेत्रात नावलौकिक मिळवायचा असेल, कळस गाठायचा असेल तर तारूण्यात पदार्पण करीत असताना डोळ्यांसमोर निश्चित रूपात ध्येय असणं, त्यासाठी प्रचंड मेहनत घेण्याची मानसिकता असणं, डोक्यावर बर्फ आणि जीभेवर साखर ठेवून नेहमीच सकारात्मक दिशेने वाटचाल करणं, ज्येष्ठ व समवयस्क मंडळींशी विचारांचं आदानप्रदान करीत राहणं आणि मुख्य म्हणजे मानापमानाची पर्वा न करता नेटाने काम चालू ठेवण्याची जिद्द बाळगणं हे गुण काही अंशी अंगात

*With Best Compliments From*

**Tel. : 022 4255 1414**
**Telefax : 2624 8589/65**

# MAHARASHTRA SOCIETIES WELFARE ASSOCIATION

(Regd. No. : Mumbai/1054/2002/GBBSD)

**-: H. O. :-**

A-2/302, Laram Centre, Opp. Railway Station,
Near Bus Depot, Andheri (W), Mumbai - 400 058

E-mail : mswa.hsg@gmail.com
Website : www.mswahousing.org
www.deemedconveyance.com

उपजतच असावे लागतात. आणि त्याला शिक्षणाची जोड असेल तर मग दूधात साखरच! नेमकी हीच गोष्ट वामनच्या बाबतीत घडली. त्याला योग्य वयात दिशा देणारी आदर्श मंडळी लाभली ज्यांना गुरूस्थानी मानून वामन चालत राहिला. डोळ्यांवर झापडं लावून मी व माझा अभ्यास अशी सीमारेषा वामनने आखली नाही.

शिक्षण चालू असतानाच वामनची नजर चौफेर फिरत होती. आसपासचं वातावरण त्याला खुणावत होतं. १९४९ ते १९६१ अशी सलग बारा वर्षे विरार ग्रामपंचायतीचं 'सरपंच' पद भूषविलं. लोकशाहीच्या मुद्यावर लढा देऊन विरार ग्रामपंचायतीला 'आदर्श ग्रामपंचायती'चा पुरस्कार मिळवून दिला. पदाचा व शिक्षणाचा योग्य वापर करून स्वतः कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास केलेला असल्याने वीजेचं म्हत्व जाणून विरार व परिसरात वीज आणण्यासाठी घेतलेले परिश्रम, खेड्यापाड्यात भंगीमुक्ती चळवळीत घेतलेला सहभाग, कूपनलिकेद्वारे केलेली पाणी व्यवस्था, स्मशानभूमी व्यवस्था, ग्रामीण भागात वीज पुरवठा अशा अनेक योजना आखून त्या प्रत्यक्षात कार्यान्वित केल्या. त्यामुळे गोरगरीब जनतेला वामन आपलासा वाटू लागला. समाजाला विश्वासार्ह व्यक्ती लाभली. याच विश्वासामुळे कालपर्यंतचा वामन समाजाच्या दृष्टीने 'वामनराव' तर अगदी नजीकच्या लोकांचा अप्पा न राहता 'अप्पासाहेब' या नावाने मान्यता पावला. समाजकार्याची आंतरिक ओढ असेल तर शिक्षण घेऊन समाजकार्य करणारा किती उच्च पदावर त्याला समाज नेते, त्याला देवत्त्व प्राप्त करून देते हे सांगणारा वामनराव हा एक नमुना आहे. कारण अशी माणसे अर्ध्या हळकुंडाने पिवळी होणारी नसतात. त्यांच्या कार्यामागे निश्चित स्वरूपाचं विचारांचं अधिष्ठाण असतं.

डोळस दृष्टीमुळे वामनराव आता समाजकार्यात अधिकाधिक व्यस्त होऊ लागले. उपरिर्निदिष्ट संजीवनी रूग्णालय हा अप्पांच्या समाजकार्याचा एक भक्कम पाया ठरला. स्वतःच्या दुकानाच्या जागेत अप्पांनी हे रूग्णालय सुरू केलं होतं. पुढे गरजेनुसार स्वतःच्या दोन इमारतीही त्यांनी रूग्णालयाला दिल्या. अशाप्रकारे त्याग भावनेतूनच अप्पांच्या समाजसेवेचा जन्म झाला होता. सरकारी मदत न घेता लोकाश्रयाच्या मदतीने आणि सहकारी तत्वावर चालणारं असूनही माफक दरात रूग्णाला सर्वतोपरि सेवा देणारं हे रूग्णालय म्हणजे लाखो गरीब व गरजू लोकांसाठी संजीवनी ठरली. त्याचबरोबर १९५९ साली केलेल्या अण्णासाहेब विद्यामंदिर शाळेच्या उभारणीने अप्पांना समाजाच्या हृदयात स्थान मिळवून दिलं. त्यानंतर अप्पांनी कामाचा सपाटाच लावला. पालघर, सफाळा येथे अनाथ मुलांसाठी जानकी राम न्यास, विरारच्या अनाथ मुलींचे शारदामाता विद्याश्रम, लोकांना कार्यरत करण्यासाठी उभारलेलं निवृत्त मित्र मंडळ, अर्नाळा समुद्रकिनाऱ्यावर कोळीबांधवांसाठी त्यांच्याच गावात उभारलेलं स्वामी विवेकानंद हॉस्पिटल, वसईत जनता बँक उभारून लघुउद्योजकांना बँकेतून कर्ज मिळवून देणं, विरार ते आगाशी पर्यंत शाळा स्थापन करून शिक्षणाची सोय करणं अशा अनेक जनहिताय सुविधा वामनरावांनी उपलब्ध करून दिल्या.


दीनदुबळ्यांची सेवा हे त्यांच्या जीवनाचं सार होतं. त्यामुळे समाजसेवा करीत असताना बालवयात कडक सोवळे मानणारी आत्या आणि कुलाचार काटेकोरपणे पाळणारी आजी यांनी केलेल्या अध्यात्मिक संस्कारांची जपणूक वामनरावांनी केली. खास उल्लेखनीय गोष्ट म्हणजे स्पृश्यअस्पृश्यचा पगडा समाजमनावर जबरदस्त असूनही त्याकाळात वामनरावांनी सणासुदीच्या दिवशी हळदीकुंकवासाठी पाच दलित महिलांना घरी बोलावण्याचं धाडस केलं. त्यांच्या मातोश्रीने मनात कोणतंही किल्मिष न आणता त्या सुवासिनींची खणानारळाने ओटी भरली होती. असे धार्मिक संस्कार आणि कुलाचार वामनरावांच्या मनावर बालवयापासूनच ठसले होते. ते मनाने एवढे निर्भिड होते की, सवर्ण दलित असा सहभोजनाचा कार्यक्रम त्यांनी पार पाडला होता. भारतीय संस्कृतीतील धार्मिकतेचं महत्त्व लक्षात घेऊन पुढील पिढीला धार्मिकतेतून नवे संस्कार लाभावेत, अंधश्रद्धा दूर व्हावी या विचाराने अप्पांनी विरारच्या शंभर वर्षापूर्वीच्या विठ्ठल मंदिराची पुर्नबांधणी केली. विठ्ठलनाथ संस्थान या संस्थेची स्थापना केली. बालसंस्कार केंद्र स्थापन केले. चैत्र पाडव्याला दरवर्षी भिक्षा फेरीचे आयोजन करून संग्रहित वस्तूंचे वाटप जव्हार, मोखाडा येथील आदिवासी पाड्यांना देण्याची प्रथा पाडली. या परिसरातील गोरगरीब विद्यार्थ्यांना दरवर्षी हजारो वह्यांचं वाटप सुरू केलं. सर्व कामात ते जातीने

With Best Compliments From



**Founder - Late Shri Dattatreya Ramchandra Samant**

# M/s. SHRIRAM WAREHOUSING AGENCY



14/16, Arches, Below Mahalaxmi Bridge,
Race Course Side, Dr. E. Moses Road,
Mahalaxmi, Mumbai - 400 034.
**Phone : 23549584**

सहभागी होत असत.

एकत्र कुटुंबातील सर्व मुलांना व्यायाम, शिस्त यांचे धडे देताना वामनरावांनी कधी सूचना दिली नाही की, जरब दाखवली नाही. कुटुंबातील पुतणे भाचे कंपनीला बाहेर घेऊन जाताना टॅक्सीसाठी मुलांची चुळबूळ सुरू झाली की, ''पायाने चालत जाण्याची संधी सोडू नका'' असं मार्मिक बोलून ते मुलांना समज देत असत. घरात गोकुळ नांदत असल्याने दंगामस्तीला उधाण येई. अशावेळी अप्पा काही रंजक गोष्टी सांगून मुलांची कानउघडणी करीत. त्या काळानुसार हातात वेताची छडी अथवा पट्टी घेणं, दम देणं अथवा मुलांना उठाबशा काढायला लावणं वगैरे प्रचलित शिक्षेचा रस्ता अप्पांनी कधीच धरला नाही. मुलांमध्ये मूल होऊन ते वागत असत. त्यांनी प्रत्येक नातवंडावर चार ओळींची कविता सुद्धा केली होती. अप्पा अत्यंत स्वावलंबी वृत्तीने वागले. स्वतःची कामं स्वतःच करणं हा त्यांचा शिरस्ता होता. एका दगडात दोन पक्षी मारण्याची कला त्यांनी साध्य केली होती. म्हणजे स्वयंशिस्तीमुळे गृहिणीला हातभार लावणं व घरातल्या चिल्ल्यापिल्ल्यांवर नकळतपणे संस्कार करणं अशा दोन्ही गोष्टी अप्पा साध्य करीत असत.

कामाचा विस्तार वाढत गेला तसतसं एक निर्मोही, निष्कलंक चारित्र्याचा प्रेरणादायी समाजसेवक म्हणून अप्पांना मान्यता मिळत गेली आणि अप्पा वसई विरार परिसराचे अनभिषिक्त राजे बनले. त्यांनी तोंडातून काढलेला शब्द झेलणारा लोकसमुदाय अप्पांभोवती जमू लागला. पण आपण जाणतोच की, समाजकार्य ही काही ठरवून करता येणारी गोष्ट नाही. शिक्षण, व्यापार व्यवसाय हे आपण ठरवून करतो. पण समाजसेवेसाठी कितीही चांगल्या सज्जनांची साथ लाभलेली असली तरी हृदयातून आलेली उर्मी कार्यप्रवृत्त करत असते. त्यासाठी मनातून कणव असावी लागते. विरक्ती, भक्ती, करूणा यांच्या दिशेने जाणारी विचारसरणी कोणावर लादता येत नाही. अंर्तमनाने ग्वाही दिल्याशिवाय त्यात उतरता येत नाही. आणि त्यातूनही दीनदुबळ्यांची सेवा हे तर फारच कठीण व्रत असतं. आपलं शिक्षण, संसार, कुटुंबप्रमुखाच्या जबाबदाऱ्या, नोकरीव्यवसायाबरोबर आलेली बंधनं हे सर्व यथायोग्य पार केल्यावर आता समाजसेवा करूया असा विचार करून ही वेगळी वाट धरणारे महाभाग पावसाळ्यात उगवणाऱ्या छत्रीप्रमाणे अचानक उगवतात आणि अल्प काळातच हाती घेतलेल्या कामापासून दूरही होतात. 'तेरड्याचा रंग तीन दिवस' सारखीच त्यांची एन्ट्री व एक्झिट असते. पण एकत्र कुटुंबात राहून आई आणि मोठे अप्पा (चुलत भाऊ अनंत महादेव सामंत) सर्व कौटुंबिक जाबाबदाऱ्या पार पाडत असताना अतिशय शांतपणे कोणतीही ढवळाढवळ न करता आपलं समाजसेवेचं काम जीव ओतून करणारे वामनराव म्हणजे ज्ञातीला लाभलेलं एक दुर्लभ रत्न. म्हणूनच कुष्ठरोग्यांच्या जखमांवर मलमपट्टी करणारे बाबा आमटे आणि गोरगरिबांना दहा रूपयात औषधे मिळावीत म्हणून आयुर्वेदिक उपचार केंद्र सुरू करणारे वामनराव हे मला समाजसेवेतील सख्खे बंधूच भासतात.'अवघाचि संसार सुखाचा करीन' ही संतवाणी शब्दशः जगलेले हे वामनराव सामंत.

अप्पांनी तत्वासाठी राजकारण सोडलं, कार्य करीत असताना अनेकांशी त्यांचे मतभेद झाले, अनेक विरोधक उभे राहिले. त्यांच्यावर टोकाचे आरोपही करण्यात आले. एकदा तर संजीवनीचे डॉक्टर्स संपावर जाणार होते. पण 'माझी झोळी उघडी आहे' असं म्हणत अप्पा कोर्टात हजर झाले होते. विशेष म्हणजे केस जिंकून आल्यावर ज्या डॉ.ने केस केली होती त्याच डॉ. ला वामनरावांनी पहिल पेढा दिला होता. असे अप्पा मोठ्या मनाचे होते. मनात कोणाबद्दलही किंचितही अढी न ठेवणारे. 'कर नाही त्याला डर कशाचा?' या उक्तीनुसार निर्भयतेने आत्मियतेने हाती घेतलेलं काम करीत राहिले. स्वतःच्या शिक्षणाचा अथवा प्रतिष्ठेचा कधीही गैरवापर केला नाही. स्वतःच्या विवाहित मुलीसाठी दवाखान्यात जायची वेळ आली तर तिथेही रांगेतून दहा रूपये भरूनच ते केस पेपर काढीत असत. आपल्या संजीवनीचं नाव पुढे करून त्यांनी त्याचा फायदा उठवला नाही. जीवनातील सर्व घटना तर्काला धरून होत नसतात. भवितव्य घडविणारी एक अज्ञात शक्ती म्हणजे आपण स्वतःच असतो. आत्मविश्वास आणि सद्सद्विवेक बुद्धी जागृत ठेवली तर कोणतंही काम अवघड नसतं यावर अप्पांचा दांडगा विश्वास होता. आपली मातृभाषा आपणच जपायला हवी असं त्यांना वाटे. इंग्रजीचा त्यांनी कधी दुःस्वास केला नाही पण प्रेम केलं ते मराठी भाषेवर. अप्पा

*With Best Compliments From*



**CUSTOM HOUSE AGENT NO. 11-221**

# S. N. Mainkar & Sons

Founded by :

**Late Shri S. N. Mainkar**
**in 1947**

**Office :**
D-901, Raikar Chamber,
Near Nilkanth Garden
& Jain Temple,
Govandi Station Road,
Govandi (E), Mumbai-88.



**Regd. Office :**
2nd Floor, "VTDEOCON"
Calicut Street, Mumbai 400 001.

Tel. : 65093227 / 65094408
Email : datsan@vsnl.com / prashant@snmainkar.com
Mobile : D. R. Mainkar - 9820078791

म्हणत की, ''निरहंकारी वृत्तीने कार्य हातात घेतलं तर समाज आपणच साथीला उभा राहतो व काम सोपं होतं. माणसाने सत्कार्य करीत जावं, प्रसंगी स्वाभिमानही सोडण्याची तयारी ठेवावी, हिरीरीने संस्था उभ्या करत असताना उत्तराधिकारीही तयार करण्याची वृत्ती असावी, योजना कागदावर उतरवण्यापेक्षा त्या प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याकडे अधिक लक्ष असावं'' असं अप्पांचं ठाम मत होतं. ही सर्व मते त्यांनी लोकांवर लादली नाहीत तर प्रत्याक्षात उतरवून आपल्या मागून याच योजना याच पद्धतीने चालू राहतील यासाठी वेळीच मोळी बांधण्याकडे जातीनं लक्ष घातलं. स्वतःच्या हाताखाली नव्या दमाचे कार्यकर्ते तयार केले. खरं पाहायला गेलं तर माणूस जसजसा मोठा होत जातो, समाजात स्थान मिळू लागतं तसतसं स्वतःभोवती एक कोष विणत जातो. त्याला आपल्या हाताखालचा कोणी वरचढ झालेला सहन होत नाही. पण अप्पांचे विचार अगदी उलट होते. प्रत्येक कार्यकर्त्याला ते पुढे नेण्याचा प्रयत्न करीत. त्याचं श्रेय त्याला देत.

विठ्ठल मंदिरात भगवद्‌गीता अध्ययन समयी वामनराव स्वतः प्रवचन करीत असत. प्रसंगी नवोदितांना प्रवचन करण्यास भाग पाडत. योग्य मार्गदर्शन करीत व आपल्या गैरहजेरीत लोकांकडून मिळालेल्या अभिप्रायावरून प्रवचनकाराला खास कौतुकाची थाप देण्यास ते विसरत नसत. कोणतीही संस्था उभारून वामनराव थांबले नाहीत तर त्या संस्थेचं कार्य आपल्यापश्चात कसं चालू राहील याचाही त्यांनी सुयोग्य विचार केला. तशा दृष्टीने प्रयत्नशील राहिले. प्रत्येकाच्या अंगच्या सुप्त गुणांची अचूक ओळख त्यांना होत असे. म्हणूनच कार्यकर्त्याने स्वतःच्या कर्तृत्वानं मोठं व्हावं ही त्यांची मनोमन इच्छा असे व तसे ते प्रयत्नशील असत. खरोखरच वामनराव एक रत्नपारखी व कुशल संयोजक होते. म्हणूनच संसार आणि समाजकार्य या दोन्ही आघाड्या यशस्वीरित्या पेलत असताना त्यांच्या नावाला जो मान होता, एक स्थान प्राप्त झालं होतं तेच स्थान आज त्यांच्या पश्चातही संजीवनी रूग्णालयाच्या नावाने टिकलं आहे आणि चिरकाल टिकणार आहे. अप्पांच्या सहवासात तयार झालेली पुढची पिढी अप्पांची जीवननिष्ठा हेच व्रत मानून कार्य करीत आहे हीच अप्पांच्या कार्याची समाजाने दिलेली पोचपावती आहे.

वामनराव जसे शिस्तीचे भोक्ते होते तसेच ते मनाने खंबीरही होते. आणीबाणीच्या काळात धरपकड जोरात सुरू असताना वामनरावांनी सरकारला भीक न घालता घरात बैठका घेतल्या. आणीबाणी विरूद्ध जनजागृती केली. इंग्रजांचा जुलूम त्यांनी पाहिला होता. कारावासही भोगला होता. उच्च शिक्षण होतं, वडिलांनी कमवलेली भली मोठी जमीन हातात होती, पण त्यांच्या वागण्यात जराही 'ग' चा लवलेश नव्हता. 'विद्या विनयेन शोभते' या वचनानुसार वामनरावांचा व्यवहार शालिनतेचा होता.

त्याची राहणी इतकी साधी होती की, कोणीही सहज त्यांच्याजवळ पोहचू शकत असे. समाजकार्यात ते खादीवरच राहिले हा झाला खूप पुढचा भाग. पण खास बाब म्हणजे फेलोशिप मिळाल्यावर कॉलेजला शिकवण्यास ते प्रथमच वर्गात जायला निघाले ते सुद्धा खादीतच. विल्सनचे प्रिंन्सिपॉल हा पोषाख पाहून अचंबित झाले होते. कॉलेजचे विद्यार्थी टर उडवतील असं दडपण त्यांच्या मनावर आलं होतं. पण प्रत्यक्षात काय घडलं? 'तो आला आणि त्यानं जिंकलं' अशी स्थिती कॉलेजची झाली. पहिल्या दहा मिनिटात पोषाखावरून आपसात हास्य करणारे विद्यार्थी अप्पांचं इंग्रजीवरचं प्रभूत्व पाहून चिडीचूप झाले. टाचणी पडली तरी आवाज येईल अशी शांतता पाहून प्रिन्सिपल वर्गात नुसते डोकावले नाहीत तर प्रत्यक्ष लेक्चरला बसले व त्यानंतर अनेकवेळा त्यांनी अप्पांचं लेक्चर स्वतः ऐकलं होतं.

वामनरावांचा व्यवहार म्हणताना एक गोष्ट नमूद केल्याशिवाय मी पुढे जाऊच शकत नाही. ती बाब म्हणजे वामनराव पै न् पै चा हिशोब लेखी ठेवणारे होते. समाजकार्य करताना आर्थिक बाजू जितकी चोख तितका समाजाचा विश्वास जास्त. लोकप्रियता जास्त. दाते भरपूर असतात पण त्यांनाही आपलं द्रव्य रग्गड आहे म्हणून खिरापतीसारखं वाटायचं नसतं. तर आपण दिलेलं दान सत्पात्री व्हावं अशी त्यांची इच्छा असते. वामनरावांच्या चोख व्यवहारामुळे दात्यांना खात्री होती की, माझं दान योग्य व पवित्र कार्याच्या उपयोगात येणार. अशा या अष्टपैलू गुणांमुळेच वामनराव 'जगन्मित्र' बनले.

With Best Compliments From

# ANATEK SERVICES PVT. LTD.

8, Valmiki Apartment, C.S.T. Road,
Kalina, Mumbai 400 098.
Tel.: 2610 9608 / 4285, 2615 5475 / 76
Fax : 2610 4121
E-mail : anasales@rediffmail.com / anatek@vsnl.com

**वामनरावांनी भूषविलेली पदे**

१) भारत छोडो आंदोलनात १९४५ साली सहभाग २) सेवाग्राम अश्रमात १९४५ साली कार्यकर्ता ३) सन १९४५ ते १९४७ दक्षिण फेलो नुसार विल्सन कॉलेजमध्ये अध्यापक कार्य ४) सन १९४९ ते १९६१ विरार ग्रामपंचायतीचे सरपंच. ५) सन १९६०-६१ जिल्हा पंचायतीचे उपाध्यक्ष. ६) १९५९ ते १९६२ दी ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे पहिले संचालक मंडळाचे अध्यक्ष. ७) १९५९ ते १९६२ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व धुळे जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर पदसिद्ध नियुक्ती. ८) मुंबई विभाग नियुक्ती मंडळाचे चार वर्षे सदस्य.

**वामनरावांना मिळालेले मानसन्मन**

१. समाजमित्र पुरस्कार विरार नगरपरिषदेने केलेला कार्याचा गौरव
२. सेवा संतविवेक व्यासपीठ या संस्थेने षण्मुखानंद हॉलमध्ये १९८७ साली केलेला गौरव.
३. एकाहत्तरी सोहळा- १९९४ साली वसई तालुक्याने समारंभपूर्वक दिलेली ५६,८०० ची थैली.
४. समाजसेवक श्रीज्ञानेश्वर साधनाश्रम तिर्थकोंडा, बेळगाव तर्फे थोर समाजसेवक म्हणून गौरव.
५. थोर समाजसेवक पदमश्री भाऊसाहेब वर्तक फाऊंडेशन तर्फे १९९८ चा निरपेक्ष आरोग्यसेवा व विविध समाजसेवेच्या कार्याबद्दल पत्रकार रूही माधव गडकरी यांच्या हस्ते पुरस्कार.
६. ध्येयवादी समाजसेवक वसईतील ध्येयवादी परिसर संस्थेतर्फे १९९९ साली गौरव.
७. सिरॉक इंडिया राष्ट्रीय पुरस्कार सोशियों इकॉनॉमिक ॲन्ड रिसर्च ऑर्गनायझिंग कमिटी ऑफ इंडिया (सिरॉक इंडिया) मार्फत १९९९ साली पुरस्कार.
८. दादर येथे मनःशांती केंद्र (लोणावळा) मार्फत गौरव समारंभ.

**विशेष उल्लेखनीय बाब-** वामनरावांनी वेळोवेळी सत्कार समारंभात मिळालेलं द्रव्य स्वतः उभारलेल्या सर्व संस्थांना देणगी म्हणून दिलं. वामनराव सुखात कधी अडकले नाहीत की, कठीण प्रसंगानी डगमगले नाहीत. कोणत्याही प्रकारच्या मानसन्मानाची अपेक्षा न ठेवता वामनरावांनी निरपेक्ष भावनेने समाजकार्यांचं घेतलेलं असिधारा व्रत शेवटच्या श्वासापर्यंत पाळलं.

महनीय व्यक्तिंशी संपर्क- समाजसेवेच्या या अतुलनीय अखंड सेवेत कार्यरत असताना वामनरावांची पुढील महनीय व्यक्तिंशी गाठभेट झाली. मुंबई राज्याचे मुख्यमंत्री माननीय यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते १५ फेब्रुवारी १९५९ रोजी संजीवनी रूग्णालयाचे उद्घाटन करण्यात आलं होतं. रूग्णालयाची ख्याती जसजशी पसरत गेली तसतशी त्या काळातील महत्वाच्या राजकारणी लोकांनी मुद्दाम सवड काढून संजीवनी रूग्णालयाला वेळोवेळी भेट दिली व वामनराव आणि त्यांचे सहकारी यांचं तोंड भरून कौतुक केलं होतं. आवर्जून नाव घ्यावं अशी मंडळी म्हणजे माजी पंतप्रधान मान. मोरारजी देसाई, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मान. शरदचन्द्रजी पवार, आरोग्यमंत्री प्रमिलाबाई टोपले आणि लालकृष्ण अडवाणी. शालेय जीवनात साहित्यिक न.चि. केळकर, राजकारणात असताना विरारला आलेले साने गुरूजी.

एकंदरीत पाहता सेवा, साधी राहणी, सत्याची कास, सत्संग आणि साधना या पंचतत्वांची शिदोरी घेऊन आयुष्यभर वाटचाल केलेल्या वामनराव सामंत यांना दलितांचा कैवारी, कुशल संघटक, विरारचा जाणता राजा, सामाजिक कार्याचा वटवृक्ष अशा कितीही उपाधी लावल्या तरी त्या कमीच पडतील. असं अव्दितीय कार्य करून गेलेले वामनराव म्हणजे आपल्या ज्ञातीचं भूषण आहे. 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले' या वचनानुसार आम्हाला ज्ञात असलेल्या या संताला आम्हां ज्ञातीबांधवांचा शतशः दंडवत! तसंच वामनरावांना कार्यात मोलचं सहकार्य केलेल्या अनेक ज्ञातअज्ञात हातांनाही आमचा प्रणाम! वामनरावांनी उभारलेल्या सर्व संस्थांचा अधिकाधिक विकास होवो, त्यांच्या कार्यकर्त्यांना अधिक प्रेरणा व बळ लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**सौ. गीता परूळेकर**
बोरिवली.
संपर्क मोबा.०९९७२३२५०३१

*With Best Compliments From*



**Founder - Late R. H. Samant**

# M/s. R. H. Samant & Sons Pvt. Ltd.

***Dealers of :***

*Industrial & Blasting Sand Glass & Foundry Grade Silica Sand, Cement, Minerals, Construction Chemicals.*

**Authorised Distributors of :**

**M/s. AMBUJA CEMENT LTD.**

**M/s. KRISHNA CONCHEM PRODUCTS PVT. LTD.**

D/4, Brick Bunder, Hay Bunder Road, Mumbai - 400 033.
Tel.: 2372 3778 , 2371 5196 ● Fax : 91-022-2375 6334
E-mail : rhsamant@rediffmail.com

## विनोदी कथा

# मी सुखी


शुभदा पाटकर

बेल वाजली की मला वैताग येतो. लोक अगदी कोणत्याही वेळेला येतात. त्यांची तरी काय चूक. सकाळी मी नुकतीच उठलेले असते, दुपारी माझी 'आडव' व्हायची वेळ झालेली असते, संध्याकाळी मी मरगळलेली असते, रात्री झोपायची वेळ असते. नणंदबाई म्हणतात मग आम्ही यायच तरी कधी? ह्यांच्या पायाला भिंगरी लागलेली असते आणि माझ्या पाठीला गादी.

या नणंदेला कोणी उत्साही, कामसू, चटपटीत, टापटीप म्हणून पदक किंवा चक्र देणार आहे का? बरोब्बर यांच्या उलट मी आहे. मी काही करत नाही, तुम्ही काही करू नका. मी सुखी, माझ्या भोवतालचेही सुखी. त्या सतत कामं करतात, दमतात, त्रासतात, दुसऱ्यांना वेठीस धरतात. त्याही दु: खी, त्यांच्या भोवतालचेही दु:खी.

दरवाजा उघडला तर त्याच दत्त म्हणून हजर. आल्या, आल्या त्यांना सोफ्यावर ओला टॉवेल आणि दारात बंडूचे बूट एक उताणा आणि एक पालथा पडलेले दिसतात. त्यांच्या विस्फारलेल्या डोळ्यात मला मजकूर वाचता येतो. खरं तर सोफा रेग्झीनचा आहे. ओल्या टॉवेल ने त्याला काही होणार नाही. बुटांच म्हणाल तर बंडूचे ते सरळच घालणार आहे. पाहुण्यांना दडपण आणणारं टिपटॉप घर हवंच कशाला?

मी करणार नाही, हे माहिती असल्याने त्या आधीच सांगतात, वहिनी चहा नको. मग घरभर फिरून इथे, तिथे बोटं फिरवत राहतात. आणि धुळीचं मोजमाप करतात. बंडूचे मित्र आले, सोफ्यावर बसले की त्यांच्या कपड्यांनी सोफा साफ होईल. जेवणाच्या बाईंमुळे ओटा साफ होईल. कचरा-लादी करणारी आली की बाकीचे घर स्वच्छ होईल. आता बेडवर पांघरुण तशीच अस्ताव्यस्त पसरलेली आहेत खरी; पण रात्री परत लागणार तर आता घड्या कशाला घालायच्या?

काही बायका घर लावण्यात, साफ ठेवण्यात किती वेळ आणि शक्ती घालवतात? काही जणी, सारखं कपड्याचं कपाट लावत असतात. आमच्या नणंदबाई जेव्हा फोनवरून घरी सांगतात, अहो, कपाटात दुसऱ्या कप्प्यात उजवी कडून तिसरी साडी तेव्हा मी बेशुद्ध पडायची बाकी असते. आमचं तसं नाही. कपडे दांडी वरून अंगावर, नाहीतर इस्त्रीला, नाही तर वॉशिंग मशीन मध्ये, नाही तर लाँड्री बॅग मध्ये असे नाचत असतात. कपाटात रुमालाचं टोक धरून ओढाव तर ओढणी सापडते आणि ओढणी समजून टोक ओढाव तर ती बरेच दिवस न सापडणारी साडी असते. ही जादू तुमच्या कडे असते का?

माझ्याकडे जेवण करणाऱ्या बाई चार दिवस आल्या नाहीत तर सव्वीस दिवस आल्या म्हणून मी आनंद मानते. मग काय हॉटेलचं, मॅगी, पिझ्झा, कोणाला आवडणार नाही?. तुम्ही कधी तरी हॉटेलचं खाणार (ब्रर्थडेला) मग तिथे गेल्यावर मजा किरकिरी करणाऱ्यां बायका मी पाहिल्यात. एवढ्या पैशात मी दहा वेळचं बनवेन म्हणणाऱ्या.

सणवार असला की आमच्याकडे असतात गिटस् चे गुलाबजाम किंवा चितळ्यांच श्रीखंड (चितळ्यांप्रमाणे गिटार हे आडनाव आहे का?) पसारा नाही, कष्टसुद्धा नाहीत. नाहीतर तुम्ही पुरणपोळ्या, मोदकाचा घाट घालता, दमदम दमता आणि मग चिडचिड करून घरातल्यांना हैराण करून सोडता. का असं वागता?

घरीच तर असतेस, कामाला बायका कशाला? असा प्रश्न विचारणाऱ्यांना 'अर्थशास्त्र' कळत नाही. पैसा खेळता राहिला पाहिजे. तळागाळातील सर्वांना मिळाला पाहिजे.

आम्ही दुसऱ्या कोणाकडे जाऊन आलो की आम्हाला स्वच्छता, टापटीप ह्याची लागण लागते; पण ती दोन, चारच दिवस टिकते. मी सर्वात आधी मूळ पदावर येते. आमच घर परत एकदा आनंदी आणि सुखी होतं.

वन्स, तुम्हाला जर माझ्या सारखं होता येत नाही; तर मी तरी तुमच्या सारखी का होऊ?

**शुभदा पाटकर,**
डोंबिवली.
मो. : ९८७०६७०१५३

# कुडाळदेशकर गौड ब्राह्मण को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

२८, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास, जे. एस्. रोड, गिरगांव मुंबई ४०० ००४.

**स्थापना : १९२९ (नोंदणी क्र. ६५० ऑफ १९२९ दि. ३०-०७-१९२९)**

E-mail : kdgb.society@gmail.com

## सुलभ कर्ज योजना

### ❖ तारणावरील कर्ज ❖

मागणीच्या दिवशीच कर्ज वितरण
तारण वस्तू : सोने-दागिने, संस्थेच्या मुदत ठेव पावत्या इ. वर (७५%) पोस्टाची बचत पत्रे / किसान विकास पत्रे यावर (९०%)
तारणावर कर्ज फक्त सोमवार आणि बुधवार दिले जाईल.

### ❖ कर्ज व्याजाचा प्रचलित दर ❖

जामीनकीवरील कर्ज दरसाल १०%
तारणावरील कर्ज दरसाल ९.५०%

### ❖ बचत ठेव ❖

**व्याजाचा दर :** द.सा.द.शे. ४%

### ❖ कर्ज मर्यादा ❖

तारणावरील कर्ज रु. ३.०० लाख, शिवाय जामीनकीवरील कर्ज : उद्योजकांसाठी रु. २.५० लाख,
इतर सभासदांसाठी रु. २.०० लाख

### ❖ मुदत ठेव योजना ❖

ठेव मुदत : ६ ते १२ महिने - ५.००%
१३ ते २४ महिने - ५.५०%
२५ ते ३७ महिने - ६.५०%

**● कार्यकारी मंडळ सन २०१५-२० ●**

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. रजनिकांत वासुदेव प्रभु** | अध्यक्ष | **श्री. पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक** | सदस्य |
| **श्री. प्रफुल्ल जयवंत खानोलकर** | चिटणीस | **श्री. शैलेश शशीकांत सामंत** | सदस्य |
| **श्री. सुरेंद्रनाथ बाळकृष्ण ठाकूर** | सदस्य | **श्री. रत्नाकर प्रभाकर तेंडोलकर** | सदस्य |
| **सौ. अंजली अजित मातोंडकर** | सदस्या | **सौ. लता जयदीप सरनाईक** | सदस्या |
| **श्री. सतीश गजानन सामंत** | सहकार तज्ञ संचालक | **श्री. प्रभाकर बाळकृष्ण सामंत** | सहकार तज्ञ संचालक |

**साप्ताहिक सुट्टी : रविवार, सोम. ते शुक्र. स.८.३० ते ११.३० सायं. ४.०० ते ७.००**
**शनिवार अर्धा दिवस संध्याकाळी ४ ते ७ कार्यालय चालु राहिल.**

गोरेगाव कक्ष- मंगळवार व शनिवार या दिवशी ४.०० ते ७.०० या वेळत चालु राहिल.

दूरध्वनी क्रमांक - मुख्य कार्यालय : २३८६ ०२९०
गोरेगाव कक्ष : २९२७ ५७७४ डोंबिवली कक्ष : ०२५१ २४५३८७६

**(ठेवी व कर्जासाठीच्या नियमांत वेळोवेळी आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील)**

**कृपया सभासदांनी आपले KYC अद्ययावत करावे.**

# मनभावन हदगा (भोंडला)

पितृपक्ष संपताच नवरात्र व हस्त नक्षत्र हातात हात घालून येतात आणि मग महाराष्ट्र- गुजराथ-राजस्थानात गरब्याच्या टिपऱ्यांचा तालबद्ध आवाज घुमतो तर कर्नाटकातील घराघरातून हदग्याच्या-भोंडल्याच्या गाण्याचे सूर मंत्रमुग्ध करतात. स्वत:च बालपण मनात रुंजी घालतं व नकळत ओठावर स्मित उमटतं. मला अजूनही आठवत आहे कोळ्याच्या वाडीत आमच्या शेजारी मधुकर पुराणक म्हणून एक कुटुंब होतं त्यांची एकुलती एक मुलगी मीनाकडे भोंडल्यला सगळ्या मुली जमायच्या. खूप धमाल यायची (तिच्या आईचं माहेर कर्नाटकातलं)

हस्त नक्षत्रात पाटावर हत्ती रेखून त्याची पूजा करून भोवती मुली हातात हात गुंफून फेर धरतात. फेराच्या मध्यभागी हत्तीचं चित्र. म्हणजेच ज्या सुखासाठी सारा आटापिटा/धावपळ करतो त्या गजान्त ऐश्वर्याचं चित्र मधोमध ठेवायचं व पावलं दमू नयेत म्हणून ओठावरती गाणी. त्या गाण्यांमधूनच आपापली सुखदु:ख आपल्या आप्त मैत्रिणींना सूचकपणे ऐकवायची हा निव्वळ खेळ नव्हे हा तर आयुष्याचा जन्ममरणाचा फेरा. फक्त साधु संतच हा अटळ फेरा चुकवू शकतात पण स्त्रिया त्यात अडकलेल्या.

माहेरची ओढ हा अनेक गाण्यांचा मूळ स्वर. घटकाभर मनोरंजन पण वर्मावर बोट ठेवणारे प्रश्न नकोत एवढीच त्या गाण्यांना किंमत. पूर्वीच्या स्त्रियांनी खूप दु:खं सोसली. त्यांच्या आयुष्याचं सहज 'रडगाणं' झालं असतं पण ते त्यांनी होऊ दिलं नाही. आपल्या वेदनांची सुद्धा सुरेख गाणी तयार केली. उदा.

**ऐलमा पै लमागणेशदेवा**
**माझा खेळ मांडून दे करीन तुझी सेवा**

पूर्वीच्या काळी स्त्रीच्या दृष्टीने सासर-माहेर म्हणजे ऐलतीर व पैलतीरच होते आणि या २ तीरांमध्ये संसारसागर होता. भोंडल्याच्या ऐलतीरावर माहेर हुंदडणाऱ्या लेकी/गौराया जमत तशाच सासरच्या पैलतीरावर नांदणाऱ्या सुनाही असत म्हणून म्हणायचं एलमा- पैलमा.

**'हस्त घालीन हस्ताला देव बसवीन देव्हारा**
**देव्हाऱ्याच्याचौ कटीउठता बसता लाथबुकी**

हस्त नक्षत्रात हत्ती रेखून त्याची पूजा करीन म्हणजेच सार कुळाचार, रितीरिवाज नीट पाळीन. देवाना देव्हाऱ्यात' म्हणजे 'पतिदेवांना' योग्य प्रेमादर देईन. 'देव्हाऱ्यातला चौकटीत' बसली नाहीस (म्हणजे लोकापवाद) तर उठता बसता लाथा मिळतील. या २ ओळीत अवघ्या स्त्रीजीवनाचं सार आहे. मंगळसूत्राच्या दोन वाट्या म्हणजे सासर-माहेरचे/तनामनाचे प्रतीक.

**'गंगा यमुनाची बारीक वाळू**
**ये रे ये रे चिलारी बाळा'**

गंगा-यमुनाचं अफाट रुप नंतर दिसतं आधी पायाला लागते ती बारीक वाळू तीच मऊमऊ पाहिजे तरच आपलं चिलारी बाळ सुखी होईल

**कमळाच्या पाठीमागे लपली राणी**
**अग अग राणी इथे कुठे पाणी ?**

लहानपणी कधी एकदा मोठ्ठं होऊ असं वाटत असतानाच खाडकन बालपण संपतं. आई एक दुष्ट बाई वाटते व मैत्रीण जवळची वाटते अशा अर्धवट अवस्थेत बाबांशी गट्टी जमते. आईविरुद्ध अस्मादीक व बाबा असे तट घरात पडतात. हृद्याातील राणीनं कमळामागे धावण्याचं हेच वय. (कमळ म्हणजे स्वप्न) कमळापाठी धावणाऱ्या लेकीला कसं जपावं हे तुम्हाला ठरवायचं आहे. हा फेर अवघड आहे त्यामुळे मुलं चुकत असली तरी 'अग अग राणी इथे कुठे पाणी' हा प्रश्न निर्वाणीने विचारायलाच पाहिजे.

आजच्या तरुण पिढीचा आत्मविश्वास आमच्यात नव्हता. आमच्या पिढीला निवडीला वाव नव्हता पण पुढची पिढी लख्ख सूर्य बघते आहे. त्यांच्यासमोर खूप पर्याय आहेत. नव्या प्रकाशात अनेक गोष्टी त्यांच्यासमोर हात जोडून उभ्या आहेत आणि हीच वेळ त्यांना आपल्या संस्कृतीची मूल्यं समजावून सांगण्याची आहे. त्यातूनच त्यांना अनेक गर्भरेशमी गोष्टी सापडतील.

आजच्या मुलांना इसापनीती/पंचतंत्र अशा गाष्टी जास्त काळ रमवू शकत नाहीत पण खुळचट कॉमिक्स व टी.व्ही. त्यांच्या मनाची पकड घेतात त्यामुळे मुलं ऐकत नाहीत. अशी ओरड करण्यापेक्षा आई बाबांनी स्वत:च आदर्श निर्माण करून मुलांची निरागसता वाचवली पाहिजे नाहीतर 'बुंदसे गयी... असं म्हणण्याची वेळ येते या उपायाशिवाय हादग्याचा फेर संपणार नाही.

आमच्या पिढीत मुलांना समंजस समजण्याऐवजी पोरकट समजण्याचा प्रघात होता. मुलांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असतं हा विचार फारसा प्रचलीत नव्हता एवढं सामाजिक पर्यावरण गुदमरलेलं होतं. पण... आता मुलांच्या मानस शास्त्राला मुलांच्या मनाला व मतालाही किंमत दिली जाते. हा सर्व कालाचा महिमा म्हणायचा दुसरं काय? कालाय तस्मै नम: हेच खरं

**सौ. नीलिमा श. प्रभू**
बेळगांव
फोन : ८९७१९६१३६९

# दोन आठवणी



निरूता भाटवडेकर

**आठवणींची सर**

पाऊस दरवर्षी पडण्याचं काम करतो. पण मर्मबंधातील आठवण ही एखादीच असते.

ही आठवण जुनी म्हणजे ९१ सालची, तारीख ८ जून. 'मुंबई' ची 'तुंबई' ही ओळख खरं तरं तेव्हा नव्हती. पाऊस पडायला लागल्यावर मला पहिल्यांदा आवडतो तो झाडांचा हिरवागर रंग. धुळीने माखलेली पाने पहिला पाऊस स्वच्छ करून हा रंग झाडांना बहाल करतो.

पदवीनंतरच्या शिक्षणाअंतर्गत माझं सेंटॉर हॉटेलमध्ये ट्रेनिंग (प्रशिक्षण) चालू होतं. सकाळी नेहमीसारखीच मी बरोबर ७ वाजता हॉटेलमध्ये पोचले. काम चालू झाले पावसाची रिपरिप मागे पडून त्याने दुपारनंतर रौद्र रूप धारण केलं. मी हॉटेलच्या बँक्वेट (Banquets) विभागात माझ्या सहकाऱ्यांबरोबर काम करत होते. ह्या सर्व पुरुष सहकाऱ्यांनी, ''तुला पोहायला येतं का?' असं विचारून मला चिडवायला सुरूवात केली. मला पाण्याची भिती वाटते. माझ्याबरोबरची दुसरी ट्रेनी अल्पा वसानी, जी अंधेरीला राहायची ती काम संपवून निघून गेली, पण जाताना तिने मला, ''तू कशी जाणार?'' माझ्या घरी चल...'' असं काहीही विचारलं नाही.

दुसरीकडे माझ्या पुरुष सहकाऱ्यांचं मला घाबरवणं चालूच होतं. त्या कोसळणाऱ्या पावसात मला निघण्याचाही धीर होईना. ह्याचा फायदा घेत प्रत्येक जण मला त्याच्या वाटणीची कामे ही सांगायला लागला! मनातून मी, ''घरी कशी जाऊ...?'' ह्या विचाराने चिंताग्रस्त हॉटेलची स्टाफ रूम तळघरात होती. माझी पर्स तिकडच्या कपाटात होती. ती घ्यायला गेले तर स्टाफरूम अंधारात बुडालेली. अखेर माझा धीर सुटला. मी घरी फोन केला. (घरचे मला संपर्क करू शकत नव्हते.) माझे वडील ताबडतोब घरून (शिवाजी पार्क) सेंटॉरला (एअरपोर्ट) आता तिथे सहारा स्टार आहे.) यायला निघाले. माहीमपर्यंत त्यांना कमरेइतक्या पाण्यातून कसरत करत यावं लागलं. माहीमला त्यांना एकांनी ज्यांना एअरपोर्टवरच जायचं होतं. त्यांनी लिफ्ट दिली व हायवेवरून मला घ्यायला हॉटेलपर्यंत आले. पुन्हा घरी जाताना आम्ही एअरपोर्टवरच गेलो तिथून आम्हाला स्टाफ बस ही दुदैवाने मिळाली. (बाबा-प्रकाश भाटवडेकर हे एअर-इंडिया मध्ये होते.) त्याच दिवशी माझी आवडती अभिनेत्री डिंपल कापाडिया हिचा वाढदिवस. एवढ्या घोळात त्या कदाचित घरीच असतील ह्या विचाराने आधीच काढून ठेवलेल्या त्यांच्या घरच्या नंबरवर फोन करून शुभेच्छाही दिल्या. नंतर यथावकाश त्यांना दोनदा भेटता आलं.

संकटसमयी खरं इतरांनी दिलासा द्यायला हवा, ते राहिलं दूरचं उलट टवाळकीचं जास्त केली गेली. पण ह्या प्रसंगाने मला शिकवण दिली. कधीही कोणी अडचणीत असेल तर मला होईल तितकी मदत मी करत असते. एक सुभाषित ह्या प्रसंगालाच साजेसे आहे.

**शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।**
**साधवो न हि सर्वत्र चन्दनं न वने वने ।।**

(प्रत्येक पर्वतावर माणके नसतात. प्रत्येक हत्तीच्या गंडस्थळात मोती नसतो. प्रत्येक वनात चंदनाचे झाड असतेच असे नाही. त्याचप्रमाणेच सज्जन माणसे सर्वत्र असतात असे नाही.)

**परीक्षा**

**''क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत !**
**क्षणत्यागे कुतो विद्या कणत्यागे कुतो धनम् ।।**

(क्षणाक्षणाचा उपयोग करून विद्या प्राप्त करावी व एकएक कण साठवून संपत्ती जमा करावी. पण क्षण (वेळ) वाया दवडल्यास विद्या कशी मिळेल आणि कण कण वाया जाऊ दिल्यास संपत्ती कशी साठेल)

वरील संस्कृत सुभाषित आम्ही लहानपणी आमच्या आजोबांकडून कायम ऐकायचो. वेळ व विद्या ह्याचे गणित त्यामुळे लहानपणीच डोक्यात घट्ट बसले !

फेब्रुवारी-मार्च महिना आला की, परीक्षांचा 'काळ' आल्याचं जाणवते व जून महिन्याचा माहोल हा काहिसा तणाव घेऊन येतो. 'आत्महत्या' हा शब्द ह्याच महिन्यात अलिकडे ऐकू येऊ लागलेला शब्द.

सुदैवाने आम्हाला परीक्षा ही कधीच 'सत्व' परीक्षा वाटली नाही. आमच्या काळी 'क्लास' संस्कृति नव्हतीच. माझे आजोबा रोज सकाळी आठ वाजता माझा गणिताचा अभ्यास घ्यायला व अभ्यास द्यायला येत. अभ्यास हसत-खेळत चाले. माझी आई-विज्ञानाचा व बाबा भूगोल-इतिहासाचा अभ्यास घेत. आई वैज्ञानिक आहे.

रसायनशास्त्राचे प्रयोग दाखवायला व करायला ती आम्हा बहिणींना तिच्या प्रयोगशाळेत घेऊन जायची. त्यामुळे विज्ञानाचा पाया मजबूत झाला.

माझ्या बहिणीची अभ्यास करण्याची पद्धत अफलातून होती. ती शाळेतून आल्यावर आईची साडी नेसत असे. ह्यामुळे तिला स्वत:ला शिक्षकच झाल्यासारखे वाटे. घराच्या भिंती ह्या फळ्याचे रूप धारण करीत. गणिताची प्रमेये, इतिहासाच्या सनावळी ह्या भिंतीरूपी फळ्यावर अवतरत व जाता-येता बघितल्या जात आणि पाठही होत असतं. अभ्यास हा कधीच बसून करायचा नसतो. परीक्षेआधी घड्याळ लावून सराव प्रश्नपत्रिका आम्ही सोडवत असू. त्याचा मुख्य परीक्षेत उपयोग होई. घरून इतके मार्क्स मिळव, किंवा ह्याचं शाखेत जा, असं कधीच सांगितलं जायचं नाही. संध्याकाळी खाली अंगणात खेळायला जात असू.

कॉलेज जीवनात आमच्या शेजारी राहणाऱ्या रोहिणी सरदेसाई ह्या मला लॉजिक व फिलॉसॉफी शिकवायच्या. शिवाजी पार्कला फेऱ्या मारत मारत आम्ही उजळणी करायचो.

पेपर देऊन आल्यावर त्याबाबत कधीच चर्चा केली नाही. थोडं झोपून पुन्हा नवीन पेपरच्या तयारीला लागायचो. माझ्या बारावीच्या वेळची एक हृद्य आठवण आहे. माझ्या मावशीला दोन वर्षापूर्वी कर्करोगाचे निदान झाले होते. दुर्दैवाने माझ्या परीक्षेदरम्यान तिला जसलोक रुग्णालयात दाखल करावे लागले होते. तिची आशा डॉक्टरांनी सोडली होती. आम्ही सर्वच मी परीक्षेला बसावं की नाही? ह्या विवंचनेत होतो. पण माझ्या मावशीने अती दक्षता विभागातून मला चिठ्ठी पाठवली, व मी परीक्षेला बसले. नंतरही परीक्षा चालू असता, तिच्या परीक्षेसाठी बेस्ट ऑफ लकच्या चिठ्या येत. माझी बारावीची परीक्षा निर्विघ्नपणे पार पडली व त्यानंतर चारच दिवसांनी ती सर्वांना सोडून गेली.

शैक्षणिक जीवनातील परीक्षा सोप्या वाटतात, पण अशा कितीतरी अवघड परीक्षा आपल्याला आयुष्यात द्याव्या लागतात!

**निरुता भाटवडेकर**

६, ''तक्षशीला'', पाठारे मार्ग, शिवाजी पार्क,
दादार, मुंबई-४०० ०२८. भ्रमणध्वनी : ९८२०६ २२७०२

# मैत्रीचे अतूट बंध



**भाग्यश्री प्रभूतेंडोलकर**

मैत्रीचे सूर गवसले कधी,
उमजलेच नाही मजला.
मैत्रीचे बंध गुंफले कधी,
उमजलेच नाही मजला.

ते विक्षिप्त वागणे,
कधी खिन्न करी मनाला.
ते नि:शब्द राहणे,
कधी व्याकूळ करी मनाला.

पण हृदयाचा कौल न मिळे मनाला
रूसवा फुगवा क्षणिक असतो सारा,
स्मित हास्याची एक फूंकर
पुन्हा रिझवी हळव्या मनाला.

विश्वासाची, प्रेमाची झालर ह्या मैत्रीला,
सोनेरी क्षणांच्या आठवणींची
सोबत ह्या आयुष्याला.

दृष्ट न लागो ह्या अतूट नात्याला,
हेच मागणे त्या विधात्याला !

**– भाग्यश्री प्रभूतेंडोलकर**

## *हार्दिक अभिनंदन*

**कुमारी कृपा कमलाकांत प्रभु (खानोली)**



कुमारी कृपा कमलाकांत प्रभु हिने मुंबई विद्यापीठाच्या C.A. Instituti of Charter Accountants of India हि पदवी पहिल्याच प्रयत्नात ५१.८८ टक्के गुणासह उत्तीर्ण केली आहे. तिचा इयत्ता १०वी मध्ये ९७ टक्क्यासह तालुक्यात तिसरा नंबर आला असून १२वीत ९२.४५ टक्यासह जिल्ह्यात प्रथम क्रमांक व मुंबई विद्यापीठाच्या बी.कॉम परिक्षेत प्रथम वर्गात उत्तीर्ण झाली आहे. तिने पुढील अभ्यासक्रमासाठी एम. कॉम. मध्ये प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. कमलाकांत श्री. प्रभु हे बचतगट प्रशिक्षक आहे. तिची आई सौ. कविता कमलाकांत प्रभु ह्या गृहिणी आहेत.

# गणपती

पार्वतीचे बाळ, त्याचे हत्तीचे तोंड,
कान त्याचे मोठे आणि लांब त्याची सोंड,
सोंडेने खातो एकवीस मोदक,
एवढा मोठा देह पण वाहन मुषक.



एका हातात लाडू घेतो नि
दुसऱ्या हाताने आशीर्वाद देतो,
तिसऱ्या हातात शस्त्र;
तर चौथ्या हातात पुष्प.
पीतांबर नि शेला दिसतो तुला छान,
प्रसन्न मुद्रा; पण एक दात लहान.

ढोल नि ताशे, डिजेचा कहर,
चिमणी उडाली भूरऽऽऽ
जरा जपून दांडा धर.
कसली गाणी नि कसले नाच
नुसता बसून बघतोस काय?
भक्तांना तुझ्या अक्कलच नाय.

टिळकांनी लावला हात कपाळाला,
गणपती म्हणतो, याचा अर्थ नाही कळाला.
जनजागृती व्हावी असे फार होते मनात,
म्हणून तुला आणले देवा, घरातून मंडपात.

पूरग्रस्तांना द्यायला खिशात नाही दमडी,
किती जनता झोपतेय रस्त्यावर उघडी.
तरी लालबागच्या राजासमोर रात्रभर रांगा,
बाप्पा म्हणे, अशा भक्तांना कोणती शिक्षा सांगा?

विद्येची देवता, ओळख सांगायला वाटते लाज,
'सेलिब्रेटी' येणार म्हणे कोणी तरी आज.
गणपती येतो नि करतो प्रदुषण,
तुमचे कर्म नि मला देता दुषण.

किती वर्ष तुमचे सहन करू चाळे,
बघेन, बघेन आणि तोंड करेन काळे.
देवाधीदेवा असे नको करू,
आशीर्वाद दे आम्हां, नित्य तुज स्मरू.

**शुभदा पाटकर** डोंबिवली
मो.: ९८७०६७०१५३

स्थापना : १८९७

## गौड ब्राह्मण सभा

**गिरगाव, मुंबई – ४०० ००४.**
**(नोंदणी क्र. ए ८३२ मुंबई)**

### ✻ संस्थेचे पदाधिकारी ✻
**(सन २०१८ – २०१९)**

***अध्यक्ष***
**डॉ. विलास रामकृष्ण देसाई**

***उपाध्यक्ष***
**श्री. देवदत्त आत्माराम खानोलकर**
**श्री. सुधाकर सखाराम पाटकर**

***विश्वस्त***
**प्रा. जगदीश साबाजी वालावलकर**
**श्री. नरसिंह नारायण पंतवालावलकर**
**श्री. अच्युत वामन तेंडुलकर**

***कार्यकारी मंडळ***
**(सन २०१८-१९)**

***कार्याध्यक्ष***
**श्री. उमाकांत गणपत महाजन**

***चिटणीस***
**श्री. सुभाष दत्तात्रय वाघ**
**श्री. रत्नाकर प्रभाकर तेंडोलकर**

***खजिनदार***
**श्री. मनीष गुरुदास दाभोलकर**

***कार्यकारी मंडळ सभासद***

**श्री. पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक, श्री. मधुकर दयानंद सामंत, श्री. जगजीवन श्रीकांत प्रभु, श्री. प्रमोद वसंत देसाई, श्री. सतीश गजानन सामंत, श्री. योगेश मोहन खानोलकर, श्री. अनिकेत रवींद्र वालावलकर, वीणा विश्वनाथ दाभोलकर**

# स्त्रीभ्रूणहत्या-एक ज्वलंत समस्या.

ज्यांच्याकडे डोहाळजेवणाला गेलो, ती गर्भतेजाने झळाळत होती. सर्व तिला तोंड भरून आशीर्वाद देत होते. मुलगा होवू दे, पूत्रवती भव, मी सांगते तुला मुलगो होणार ऐकताच तिची कळी खुलत होती. मी तिला आशीर्वाद दिला आरोग्यपूर्ण बाळ होऊ दे, चांगली काळजी घे. तिला अपेक्षित असलेला आशीर्वाद न दिल्याने तिचा चेहरा पडला. खरं तर कोणाच्याही आशीर्वादाने आता गर्भाचं लिंग बदलणार नाही. प्रत्येक बाईला मुलगाच कशाला हवायं? काय असेल ही बाईची मानसिकता?

खरं तर जिला एक मुलगा आणि एक मुलगी ती राणी (दोघांचे फायदे तोटे मिळतात), जिला दोन्हीही मुलींच ती महाराणी (दोन्ही मुलींची लग्न झाली की ती मोकळी होते), जिला दोन्ही मुलगे ती मात्र नोकराणी (नातवंड सांभाळा, मुलांची इस्टेटीवरून होणारी भांडणं सोडवा); पण असं असलं तरी तिला वंशाला दिवा हवा. केवळ परंपरा म्हणून की आपल्या वाट्याला जे आलं ते तिच्या वाट्याला येऊ नये.

पुरूषांना आई हवी आहे, बायको हवी आहे, बहीण हवी आहे; पण मुलगी मात्र नको. पुरूषांना का बोल लावा स्वतः स्त्रीलाही मुलगी नको आहे. परंपरा अनुसरून समाज तिच्यावर दबाव आणतो. मुलगा झाला तरच तुला मोक्षप्राप्ती, तुला कुटुंबात, समाजात मान. आपला पुरूषप्रधान समाज असल्यामुळे आमची महाकाव्य आणि पुराणांद्वारे अशा गोष्टी मोठ्या खुबीने समाजाच्या मनावर बिंबवल्या जातात. उदाहरणार्थ राम सितेवर संशय घेऊन तिचा त्याग करतो, द्रौपदी पाच पुरुषांत वाटली जाते, गांधारी धृतराष्ट्रासाठी आंधळे पण स्वीकारते, द्रौपदी चे वस्त्रहरण करणारे पुरूष, लज्जारक्षणार्थ धावणाराही पुरूषच. असे दाखले सतत ऐकले की स्त्रिला बाईपेक्षा पुरूष श्रेष्ठ वाटतो.

आपला देश शेतीप्रधान देश आहे. आपल्या शेतीचा म्हणजे जमिनीची वाटणी होवू नये, घरचेच फुकट राबणारे मजूर मिळावे तसेंच युद्ध होत असत सैनिक मिळावे, ह्या कारणासाठी सर्वांना मुलगे हवे होते. पण आता ती परिस्थिती आहे का? उलट आता शेतीची वाटणी होवू नये म्हणून मुलगे नको असं वाटलं पाहिजे.

मुलगी मोठी होईल, ते परक्यांचे धन. तिच्या शिकण्याचा, पगाराचा आम्हाला काय उपयोग? उलट हुंडा, लग्न, बाळंतपण ह्यात आमचाच पैसा खर्च होणार; त्यापेक्षा मुलगी नकोच. वास्तविक मुलगी लग्न होऊन परक्या घरी जाते, तेव्हा ती त्यांना वापरायला (श्रम, पगार, वंशवृद्धी, वृद्धांचं संगोपन) मिळते, म्हणून सासरच्यांनी मुलींच्या आईवडीलांना हुंडा द्यायला हवा.लग्नात वडील मुलींच 'कन्यादान' करतात. जावयाला सांगतात, आज पर्यंत ही माझी जबाबदारी होती, आजपासून ही तुझी जबाबदारी आहे. त्यापेक्षा मुलीलाच जबाबदार बनवायला नको का?

वास्तविक निसर्ग वंशसातत्य टिकवण्यासाठी आणि संतुलित ठेवण्यासाठी प्रयत्न करत असतो; परंतु आपल्या दुर्दैवाने त्यात ढवळाढवळ केली आहे. पूर्वी बालविवाह, सती जाणे, जन्मताच गळ्याला नख लावणे या सारख्या स्त्रियांना नष्ट करणाऱ्या प्रथा होत्या. कायद्याने बंदी आत्ताच. मुलींना तेवढं देखिल मोठ करायचे नाही. गर्भवस्थेतच मुलीचं लिंग निदान झालं की तिला नाहीसं करायचं. सोनोग्राफी करण्यामागे उद्देश होता बाळाची सुधृढता, वाढ, अपंगत्व समजावं; पण पैसे मिळवण्यासाठी डाँक्टर लिंग निदान करू लागले, मुलीचे निदान झाल्यावर गर्भावस्थेतच यमसदनी पाठवू लागले. डाँक्टरांना तरी का दोष द्यायचा? ते काही कोणाच्या घरी जाऊन ओढून आणून मुलगी असली तर गर्भपात करत नाही. आपलीच मानसिकता बदलली पाहिजे. मुलगा होण्यात पुरूषार्थ किंवा बाईचं जीवन सार्थकी लागत ही विचारसरणी कालबाह्य आणि अयोग्य आहे. सोनोग्राफी, डॉक्टर यांच्या विरोधात कितीही कायदे केले, तरी तेवढ्या पळवाटा शोधल्या जातील म्हणून आपली मानसिकता बदलणं गरजेचं आहे.

घराघरात मुलाला आणि मुलीला वेगळी वागणूक दिली जाते. मुलाचे लाड करायचे, हट्ट पुरवायचे, मुलीला कामाला लावायचे, मुलाला सर्व संधी उपलब्ध करून द्यायच्या, मुलीला त्यापासुन वंचित ठेवायचं, मुलाच्या दोषांवर पांघरुण घालायचं; हे ज्या मुलीने लहानपणापासून पाहिलं आहे, अनुभवलं आहे, तिला आपल्या वाट्याला आलं ते आपल्या मुलीला नको असं वाटणारच. हा दुजाभाव आपण थांबवू शकतो. दोघांनाही समान संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

म्हातारपणीची काठी म्हणून आईवडील मुलाला झुकतं माप देतात. पण वास्तव काही वेगळच सांगत. उलट मुलीच आईवडीलांवर माया, प्रेम करतात.

मुलींना 'माणूस' म्हणून जगण्याचा हक्क आहे. स्त्रीभ्रूणहत्या ज्या कारणासाठी होते ती दूर केली पाहिजे.

१. मुलीला शिक्षण नाही, व्यावसायिक कौशल्य नाही, जमिनीवर मालकी हक्क नाही. उदरनिर्वाहाचं कोणत साधन नाही. त्यामुळे तिला आधी वडिलांवर मग नवऱ्यावर मग मुलांवर अवलंबून रहावे लागते. तिला स्वतःच्या पायावर उभे केले पाहिजे मग वडिलांना कन्यादान करावे लागणार नाही. तिलाच जबाबदार बनवा मग कोणी कशाला तिची जबाबदारी घ्यायला हवी. ती कशाला कोणाच 'ओझं' बनेल?

२. आईवडीलांना मुलगी चारित्र्याच्या दृष्टीने 'काचेचे भांडे'

वाटते. तिचं स्त्रीत्व तिच्या जननक्षमतेशी निगडीत असतं, पण मुलानेही तेवढंच चारित्र्य संपन्न असणे गरजेचं नाही का?

३. स्त्री स्वतःला शारीरिक दृष्ट्या नाजूक, कमकुवत समजते. नऊ महिने जी आपल्या बाळाची वाढ करते ती कमकुवत असेलच कशी. तरीही वाईट प्रसंगात ती आपल्या हातापायाचा, बुद्धीचा वापर न करता एखाद्या 'कृष्णाची' वाट पाहते; यासाठी तिच्या मनावर बिंबविले पाहिजे की तू स्वतः स्वतःच संरक्षण कर. त्यादृष्टीने तिला तयार केलं पाहिजे. स्त्रीभ्रूणहत्या हा त्यावर उपाय नाही.

४. आमची संस्कृती स्त्रियांना 'देवीचे' स्थान देते. त्या दगडांच्या, धातूच्या आहे तोपर्यंत, प्रत्यक्षात मात्र गुलामाचं जिणं देतो, एक उपभोग्य वस्तू बनवतो.

५. लग्नानंतर मुलगी मुलाच्या घरी जाते; त्यामुळे तिचे आईवडील वृद्धापकळी तिच्याकडे जात नाहीत. मुली जर कमावत्या असतील तर ते दोघांचे घर असेल. आईवडीलांचीही मानसिकता बदलली पाहिजे. यासाठी स्त्रीभ्रूणहत्या  हा उपाय नाही.

आपल्याला वाटतं सुशिक्षित वर्गात असं काही नसतं; पण हा गैरसमज आहे. किती स्त्रियांना आपली कमाई स्वतःच्या मनाप्रमाणे खर्च करता येते? किती जणींना आरोग्य पूर्ण वातावरण मिळते? किती जणी बदली, बढती घेऊ शकतात? किती जणी मनात नसेल तर स्पष्टपणे नकार देऊ शकतात?

निसर्गतः स्त्री-पुरुष संख्या समान असली पाहिजे किंवा स्त्रियांची संख्या जास्त असली पाहिजे (परिस्थितीशी जुळवून घेणे, चिवटपणा) पण ती नेहमीच कमी असते. असे का? हे असे चालत राहिले तर आई, बायको मिळणार कशी?

महाभारतात एकच द्रौपदी होती. आता अनेक द्रौपदी असतील. पाच सहा पुरूषांना मिळून एक बायको.

दिल्लीतील घटनेची वारंवारता वाढेल, आपली नैसर्गिक वासना शमविण्यासाठी पुरूषांना जी स्त्री उपलब्ध आहे, तिचा उपयोग करावाच लागेल; कारण निसर्गतः आपण पशू आहोत.

आपण दूरचा विचार केला पाहिजे. निसर्गात बदल केल्यास काय परिणाम होतात ते आपण अनुभवतो आहोत. स्त्रीभ्रूणहत्या करून आपल्याच पायावर दगड पाडून घेऊ नका. जेव्हा आपण झुरळ, पालिला मारतो, त्यांना जगण्यासाठी धडपडताना पाहतो तेव्हा आपल्याला किती वाईट वाटतं? किती हा विरोधाभास? एक कळी फुलण्याआधी खुडतो तेव्हा काहीच वाटंत नाही; कारण ती स्त्री आहे म्हणून केवळ स्त्री आहे म्हणून ना!

**शुभदा पाटकर डोंबिवली**
९८७०६७०१५३


## हार्दिक शुभेच्छा !

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

## *व्ही. डी. प्रभुकेळूसकर*

**सदस्य अभिकर्ताओंके लिये अध्यक्ष क्लब**
**कोड नं. : १०८९१८**

## V. D. Prabhukeluskar
Member of the Chairman's Club for Agents
Code No. 108918

**LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA**

**Off.:** Br. 891, Swapna Siddhi, Akurli Road, Near Railway Station,
Kandivali (East), Mumbai-400 101. Tel. : 28870023

**निवास :** भवानी नगर, प्लॉट नं.१, बिल्डींग नं.२, ब्लॉक नं. ४, लोटस को-हौ. सो.,
मरोळ, मुंबई ४०० ०५९. **टेली : २९२५ ९५५५ मो. : ९८६९०३०९६५**

# Success Stories- डॉ. माधव प्रभू, बेळगाव

–मनीष दाभोलकर



डॉ. माधव प्रभू

रुग्णसेवा हाच डॉक्टरकिचा खरा धर्म सांगितला गेला आहे. डॉक्टरकी पेशा व वैयक्तिक महत्वाकांक्षा पूर्ती करणारे अनेक व्यावसायिक डॉक्टर आपण पाहिलेत. परंतु गरजू, निराधार, वंचित व सामाजिक प्रश्न सोडविणारे फार कमी डॉक्टर आपण पाहिलेत व ऐकलेत... ज्यांची आपल्यावर पहिल्या नजरेतच छाप पडावी असे रुबाबदार, राजबिंडे, उंचपुरे गोरेपान व्यक्तिमत्व म्हणजेच आपले बेळगावचे निष्णात मधुमेह, HIV, ह्रदयरोग तज्ञ डॉ. माधव बाळकृष्ण प्रभू. डॉ. माधव व आमची पहिली भेट श्रीमठ संस्थान दाभोली या पवित्र स्थानी झाली. जस जसा परीचय वाढला तस-तसे कुतूहल व जिज्ञासा अधिक जागृत होऊ लागली. डॉक्टरकीचे MBBS व MD पर्यंतचे उच्च शिक्षण.... धर्म व कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञाती विषयी असलेली प्रचंड आस्था, आपुलकी असो किवा श्री मठ संस्थान दाभोलीच्या श्रीमत प्रंद्युम्नानंद स्वामींच्या प्रकृतीस्वाथ्याची संपूर्ण जबाबदारी असो तसेच आज संपूर्ण राष्ट्राला भेडसावणारा प्रश्न म्हणजे पाणी या प्रश्नावर अभ्यास करून सामाजिक भान व बांधिलकी जपत त्यांनी ''प्यास फाऊंडेशन'' ही सामाजिक संस्था सुरू केली. कर्नाटक राज्यामध्ये अनेक पातळीवर क्रांति घडवून आणली आज त्यांचे कार्य एका उंचीवर सुरू आहे. आपण आज डॉ. माधव प्रभू यांच्या या सगळ्या जिवन प्रवासाचा परामर्ष घेणार आहोत. त्यांच्या या SUCCESS STORIES चा धागा धरून आमच्या तरुणाना नक्कीच या कथेतुन प्रेरणा, पराक्रम, कौशल्य, आर्दश, ज्ञाती प्रेम, धर्माबद्दलची निष्ठा, कर्तव्य या अशा अनेक पैलुंचे दर्शन घडेल व अनुभव मिळेल... बेळगावहून वाचकांसाठी कुंदाचा आस्वाद घेत घेतलेली खास डॉ. माधव प्रभू यांची SUCESS STORIES.

**प्र.१) आई, बाबा, भाऊ, बहीण, कुटुंब विषयी थोडक्यात माहिती.**

**उत्तर-** माझे कुटुंब लहानसे मध्यमवर्गीय कुटुंब आहे. आम्ही चार सदस्य, आई, वडील, मी आणि बहीण. आमचं वास्तव्य बेळगावातील कुडाळ देशकरांचा बालेकिल्ला असलेल्या नानावाडीत होते. आमचं घर अगदी कोकणातल्या घरासारखं ऐसपैस, घरासमोर मोठी बाग, आंबा, फणसांची झाडं शिवाय फुलांचे विविध प्रकार. माझे कुटुंब एक परिपूर्ण सकारात्मक विचाराचे आहे. माझे वडील बाळकृष्ण प्रभू खानोलकर यांचे मुळ गाव वेंगुर्ल्या जवळील खानोली, माझी आई सौ.लालन प्रभू, आईचं मुळ गाव गोव्यातील नागेशी, माझी बहिण डॉक्टर मालविका विवाहित असुन आता ती डॉक्टर सौ. मालविका कुलकर्णी म्हणून ख्यातनाम आहे, मालविका बालरोगतज्ञ असुन नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथे आपल्या डॉक्टर पती आणि सासु सासऱ्यां बरोबर स्वतःचे हॉस्पिटल चालवते. याबरोबरच तिथे असलेल्या आदिवासी कुपोषित बालकांसाठी उल्लेखनीय कार्य करते. माझी पत्नी डॉक्टर स्मिताही नेत्रतज्ञ असुन सुवर्ण पदक विजेती आहे. माझी कन्या ईरा दहा वर्षाची असुन ती पाचव्या इयत्तेत शिकते. याबरोबरच गायनही शिकते. माझे वडील फार्मसीस्ट तर आई शिक्षिका. दोघेही संवेदनाशील आणि सामाजिक भान असलेले आहेत.

**प्र.२) शालेय शिक्षण, कॉलेज शिक्षण यांच्या विषयी माहिती व एखादा लक्षात राहिलेला प्रसंग?**

**उत्तर-** माझं दहावी पर्यंतचं शिक्षण बेळगावातील नावाजलेल्या सेंट पोंल्स शाळेत झालं. ह्या शाळेला दिडशे वर्षांचा इतिहास आहे. मला घडवण्यात शाळेचा फार मोठा वाटा आहे. सर्व समावेशक होउन समाजातील प्रत्येक घटकात मिळून मिसळून रहाणे हे शाळेनीच शिकवलं. शाळेतील एक प्रसंग अगदी लक्षात राहिलेला आहे.

मी लहान असतानाच माझा एक गंमतीशीर किस्सा घडला होता. आमच्या शाळेतील एका विद्यार्थ्याचं अपहरण झालं होतं. त्या मुलाचं नाव होतं प्रसाद प्रभू. मी साडेतीन वर्षाचा होतो, माझे वडील मला शाळेत सोडायला आणि न्यायला यायचे. एकदा त्यांना यायला थोडासा ऊशीर



KLE संस्थेच्याशतक महोत्सवीसमारंभामध येसहभागी होताना

झाला, येऊन बघतात तर मी शाळेतून गायब. घरीही नव्हतो. आई बाबा खुप घाबरले. सगळीकडे शोधाशोध सुरू झाली. पोलीसात तक्रार नोंदवण्यासाठी वडील गावात आले. पाहतात तर काय, मी एकटाच जवळजवळ एक किलोमीटर चालून बाबांच्या दुकानात जाऊन शांतपणे बसलो होतो. माझी आई बरेच दिवस घाबरलेली होती.

आम्ही दोन्ही भावंड अभ्यासाबरोबरच बास्केट बॉल खेळायचो. शिवाय दोघंही एन. सी. सी. (NCC) तही होतो. आम्हां दोन्ही भावंडांची निवड २६ जानेवारीच्या परेडसाठी लागोपाठ दोन्ही वर्ष झाली. खरंतर पहिल्या तुकडी मध्ये माझ्या सगळ्या मित्रांची निवड झाली होती आणि मला बाहेर काढलं होतं. पण चारच दिवसांत काही मुलं आजारी पडल्यामुळे मला परत बोलावण्यात आलं. नंतरच्या चारही कॅम्प्समध्ये माझी निवड होत गेली आणि मी थेट दिल्लीला पोचलो. माझ्या बरोबरच्या सगळ्या मित्रात मी एकटाच दिल्लीला निवड होऊन गेलो. ह्या माझ्या निवडीमुळे मी एक महत्त्वाची गोष्ट शिकलो. ती म्हणजे न घाबरता सतत प्रयत्न केल्याने यश मिळतेच.

**प्र.३) लहानपणी कुठले स्वप्न पाहिलेत? मोठा होऊन कोण होणार या बद्दल....!**

**उत्तर–**मी लहानपणीच डॉक्टर होण्याचे स्वप्न ऊराशी बाळगले होते. दैवानेही साथ दिली आणि मला मेडीकल कॉलेज मध्ये प्रवेश मिळाला. लहानपणी खेळात सुद्धा मी डॉक्टरच असायचो. घरातील सगळ्याना औषध, ईंजेक्शन बरोबरच ऑपरेशन करणे असेच माझे खेळ असायचे. मी जर डॉक्टर नसतो झालो तर नेव्हीत गेलो असतो. मला समुद्राची खुप ओढ होती आणि अजुनही आहे. याचं कारण कदाचित समुद्राकाठी वसलेली आणि अजुनही असलेली आमची वंशावळ.

**प्र.४) सामाजिक भान याची जाण वयाच्या कितव्या वर्षी आली व कशी?**

**उत्तर–** माझे आजोबा स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांनी शिक्षाही भोगली पण कधीही पेंशन घेतली नाही. त्यांना वाटायचं देशासाठी केलेल्या कर्तव्याचा मोबदला नाही घ्यायचा. पाकिस्तान बरोबरच्या लढाईत वडिलांच्या आजीने म्हणजे माझ्या पणजीने आपले सगळे दागिने सरकारला दिले होते. त्या वेळी माझ्या आई आणि वडिलांकडचे कुटुंब एकाच वेळी जेवायचे. आम्ही दोन्ही भावंडं याच संस्कारात वाढलो. माझी आई बेळगाव महानगरपालिकेत अपक्ष नगरसेविका म्हणून निवडून आली होती. प्रामाणिक आणि धडाडीची नगरसेविका म्हणून आजही तिची ओळख आहे. या सगळ्याचाच माझ्या सामाजिक जाणिवेत आणि संवेदनाशील होण्यात फार प्रभाव आहे. मी शाळेत असल्यापासून माझ्या आईच्या सामाजिक कार्यात सहभागी असायचो. पंतप्रधान मोदींचं स्वच्छता अभियान माझ्या आईने वीस वर्षांपूर्वी बेळगावात केलं होतं. त्यावेळी माझ्या काही मित्रांबरोबर माझा खुप मोठा वाटा होता. मी शिकत असतानाच आईचं पर्यावरणासाठीचं आणि गरजु महिलांसाठी करत असलेलं काम जवळुन पाहिलं आहे. वेळोवेळी मी तीच्या या कामात तीला मदतही करायचो.

**प्र.५) मेडिकल कॉलेज शिक्षण प्रसंग काही आठवणी. काय सांगाल?**

**उत्तर–** मी बेळगावच्या जवाहरलाल नेहरू मेडीकल कॉलेज मधुन एम.बी.बी.एस. आणि एम.डी. झालो. मी डायबेटीस आणि हृदय विकार तज्ञ. मी लहानपणीच डॉक्टर होण्याचे स्वप्न ऊराशी बाळगले होते. दैवानेही साथ दिली आणि मला मेडीकल कॉलेज मध्ये प्रवेश मिळाला. माझी आई अशा संस्कारात वाढली होती की मृतांच्या घरी जाऊन आली की कशाला ही स्पर्श न करता आंघोळ करायची. आम्ही भावंडं, मी आणि माझी बहिणही मेडीकल कॉलेज मध्ये असल्यामुळे आजारी आणि मृतलोकांच्या




''गुरुदेव रानडे सेवा प्रतीष्ठान पुरस्कार'' स्वीकारताना

सान्निध्यातच असायचो. सतत काम आणि अभ्यास यामुळे जेवायलाही वेळ मिळायचा नाही. आई आमच्या बरोबर असती तर तीला स्नान-गृहातच रहावं लागलं असत (हशा)

**प्र.६) प्रथितयश डॉक्टर होण्यासाठी काय करावे लागले? त्यासाठी केलेले प्रयत्नाबद्दल आमच्या तरुणांना काय सांगाल?**

**उत्तर-** वैद्यकीय क्षेत्रात यश मिळविण्यासाठी खुप संयम आणि परिश्रम घ्यावे लागतात. माझी प्रॅक्टीस मी स्वतःच्या प्रयत्नानी सुरू केली आणि चालवली. त्यासाठी मी कोणत्याही अवैध्य गोष्टी केल्या नाहीत. डॉक्टर झाल्यावर लगेचच केएलई हॉस्पिटल मध्ये नोकरी लागलीच शिवाय माझी स्वतंत्र प्रॅक्टीसही सुरू झाली.

सुरूवातीला कराव्या लागलेल्या अथक परीश्रमामुळे शिवाय फक्त पैसाच मिळविणे हा ऊद्देश नसल्यामुळे माझा व्यवसायात लवकरच जम बसला. आजु बाजुच्या खेड्यापाड्यातून रुग्ण यायला लागले. मी गावोगावी जाऊन मोफत शिबिरंही घेतली. वीस हजार रुग्णांची मोफत तपासणी केली. दाभोली मठातही माझं शिबीर झालेलं आहे. माझ्या मुळ गावातील बांधवाना याचा लाभ व्हावा हा माझा उद्देश होता. मी गावोगावी जाऊन महिला आणि युवक मंडळीच्या सहकार्याने विविध आरोग्य समस्यांवर प्रबोधनही केले. यामुळेच माझा जनसंपर्कही वाढला आणि रुग्णांचा राबता वाढला. मला युवकाना एकच संदेश द्यावासा वाटतो, कोणत्याही कामात यश सहज मिळत नाही. त्यासाठी सतत प्रामाणिकपणे प्रयत्न करावे लागतात. सहज मिळालेलं यश



''अरालीकट्टी'' तलाव पुर्नजिवीत करून लोकार्पण करताना ज्येष्ठ समाज सेवक अण्णा हजारे व इतर मान्यवर

टीकुन रहात नाही ते शाश्वत असत नाही.

**प्र.७) तुम्ही विज्ञानाची कास धरणारे, विद्येचे उपासक मग कर्मकांडावर विश्वास ठेवता का?**

**उत्तर-** विज्ञानाचा माणूस असण्याचा अर्थ अध्यात्माशी तडजोड केलेली नाही. अंधश्रद्धा आणि श्रद्धा यात फरक आहे आणि माझ्या बाबतीत मला असा विश्वास आहे की अशी शक्ती आहे जी आपल्याला मार्गदर्शन करते आणि आपल्याला धैर्य देते आणि ते देव आणि गुरु आहेत. मी प्रार्थनेच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवतो पण कर्मकांडांना समर्थन देत नाही. मला तत्त्वज्ञान वाचणे आणि त्या सर्वांच्या सद्गुणांचा विचार करणे आवडते.

**प्र.८) डॉक्टर म्हंटल्यावर** 24 X 7 ON DUTY **असलेली व्यक्ति जिला आपले कर्तव्य नेहमीच श्रेष्ठ असते व जर हे खरे असेल तर... मग तुम्ही तुमच्या कुटुंबाला आणि सामाजिक कार्याला वेळ कसा देता?**

**उत्तर-** एका दिवसात चोवीस तास असतात, वेळेची कमतरता कधीच नसते, सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपणास काहीतरी करण्याची इच्छा असणे आवश्यक आहे. मी कॉर्पोरेट इस्पितळात नोकरी करतो, वैद्यकीय महाविद्यालयात शिकवतो शिवाय माझे खाजगी क्लिनिकही आहे. पण मी माझ्या वेळेचं नियोजन व्यवस्थित करतो. मी माझ्या सामाजिक कार्यासाठी काही वेळ अनिवार्यपणे समर्पित करतो, कधीकधी कुटूंबासाठी वेळ देण्यात तडजोड करावी लागते. सुदैवाने माझ्या पत्नीची चांगली साथ मिळते. माझी आई घर तर सांभाळतेच शिवाय आम्हांला



''सुलगा' या प्रकल्पाची पाहणी करताना सोबत इतर सहकारी

सतत प्रोत्साहनही देते.. कधीकधी रुग्ण खुप गंभीर अवस्थेत येतात अशावेळी रात्रभर काम करावे लागते. परंतु रुग्ण बरा होऊन आपल्या घरी जातो तेव्हा खूप समाधान मिळते. जेव्हा आपण आपल्या सामाजिक कार्याच्या बदल्यात कोणत्याही गोष्टीची अपेक्षा करत नाही तेव्हा आपण आपला वेळ खर्च करण्यात आनंदी होत असतो... तसेच इतरांसाठी काम केल्याने एक प्रचंड आनंद मिळतो आणि म्हणूनच आपण प्रत्येकानेच निरपेक्षवृत्तीने कार्यासाठी वेळ दिला पाहिजे.

**प्र.९) सामाजिक जाणीव व बांधिलकी जपण्यासाठी आपण नेमके काय करता व कशी जपता?**

**उत्तर-** माझा व्यवसाय सांभाळत इतरांसाठी जे शक्य असेल ते करण्याचा मी प्रयत्न करतो. समाजातील ऊपेक्षीत घटकांसाठी आपण सगळ्यानीच नेहमीच काही ना काही काम केले पाहिजे. (असं म्हणतात) देण्याची भावना प्रामाणिक असली की... येण्याचा मार्ग मोकळा होत असतो.

**देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे**

विंदा करंदीकरांच्या या ओळी देण्याच्या भावनेबद्दल बरेच काही सांगून जातात. मी नेहमीच माझ्या डॉक्टरी व्यवसायाचा ऊपयोग समाजातील सर्व घटकांसाठी व्हावा यासाठी प्रयत्नशील असतो. मी आरोग्य तपासणी शिबिरे आणि रूग्णांवर विनाशुल्क उपचार करण्यास सुरुवात केली. मी विद्या आधार या संस्थेचा संचालक आहे. जिथे आम्ही जुने पेपर विकुन येणाऱ्या पैशातुन गरीब गरजु विद्यार्थ्यांची फी भरतो. आम्ही त्यास रद्दीतुन बुद्धी असे म्हणतो. मी माझ्या आई बरोबर वेणुग्राम पर्यावरण संघातही काम केलेले आहे. अशा प्रकारे पर्यावरणाच्या कामाची सुरूवात केली. मी आईने सुरू केलेल्या लीड संस्थे बरोबर महिला सक्षमीकरणासाठीही हातभार लावला आहे. मी जल संवर्धनाच्या क्षेत्रात काम करण्यासाठी ''प्यास फाउंडेशनची'' स्थापना केली. सामाजिक कार्य कोणत्याही हेतूपुरस्कार न करता त्यातून मिळणाऱ्या आनंदासाठी केले पाहिजे.

**प्र.१०) प्यास फाउंडेशनचे कार्य अतिशय उत्कृष्ट व मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. त्याबद्दल वृत्तपत्रामधुन व अनेक माध यमातूनआम्ही एकतो. तुम्ही संस्थेचे संस्थापक अध यक्षआहात.. प्यास बद्दलची थोडक्यात माहिती, कार्य व उद्देश सांगा.**

**उत्तर-** डॉ. असल्यामुळे येणाऱ्या प्रत्येक रुग्णाच्या शारीरिक समस्या सोडवुन त्यांचं जगणं सुसह्य करणं माझं कामच आहे. ह्या माझ्या व्यवसायामुळे लोक माझ्याशी खुप बोलतात. आपल्या आजारा बरोबरच घरगुती अडचणी आणि समस्यांचा ऊल्लेख करत असतात. मी कदाचित संवेदनाशील असल्यामुळे मला याची खुप जाणिव होते. माझं रोजचं काम करता करतांच मी लोकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतो. आणि खरं सांगु का काम करणाऱ्याला वेळही आपोआपच मिळत जातो. माझ्या घरच्याना मात्र काही वेळा मी वेळ देऊ शकत नाही. पण माझी पत्नी स्वतः डॉक्टर असुन चांगली गृहिणीही आहे. ती घर आणि मुलीला ऊत्तम सांभाळते. शिवाय माझी आई आम्हा दोघांचा खुप मोठा आधार आहे. ती या सगळ्या कार्यात पाठींबा देत असते.

ईतर शहरांप्रमाणेच बेळगावात सुद्धा पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेची आणि पिण्यास योग्य असलेल्या पाण्याचा दर्जा विषयी अनेक समस्या आहेत. पाण्यासारखी मूलभूत समस्या आजही सोडविण्यासाठी सरकारी यंत्रणा कुठेतरी कमी पडते. अशावेळी शहरातील काही वंचित भागात पिण्याचे पाणी पोचवावं म्हणूनच माझ्या शाळेतील काही मित्रांना एकत्र करून आम्ही सुरूवातीला घरोघरी टँकरनी स्वच्छ पाणी द्यायला सुरूवात केली. पुढे याच

कामासाठी मी प्यास फाँऊडेशन नावाची संस्था स्थापन केली. टँकरनी पाणी पुरवठा चालूच होता पण कायम स्वरूपात ही समस्या सोडवायची असल्यास काही तरी जास्त करावे लागणार होतं. मग असं लक्षात आलं की, बेळगांवातील काही विहीरी आणि तळी शुष्क झाली आहेत. तलावातुन घाण काढून गाळ काढून त्यांची डागडुगी करुन त्यांचे सौंदर्यी करण करून जलस्त्रोत वाढविण्यासाठी आमचा प्रयत्न सुरू झाला.

आतापर्यंत बेळगाव जिल्ह्यातील अशी आठ तळी आम्ही पुनर्रजिवीत केली. पाण्याचं महत्त्व समजावून सांगण्यासाठी गावोगावी जल प्रबोधनही केले. बेळगाव जिल्ह्यात जागोजागी तीस हजार झाडे लावली. या कार्यात अनेक दानशुर व्यक्ती, संस्थानी आम्हांला मोलाची मदत केली.

**प्र.११) आपण एवढे सुंदर दिसता नाटक, चित्रपट, चंदेरी दु नियासोडून या खडतर प्रवासाकडे कशामुळे आकर्षिले गेलात?**

**उत्तर-** मला बालपणापासूनच डॉक्टरच व्हायचे होते. सिनेमा नाटक पहाणे मलाही आवडते पण त्या क्षेत्रात काम करण्याचे आकर्षण मला कधीही वाटले नाही.

**प्र.१२) डॉ. तुमच्याबद्दल संपूर्ण कु. दे. गौड ब्राह्मण समाजाला अभिमान व गर्व आहे. तुम्ही एवढ्या लहान वयात केलेली मेहनत व गाठलेली ऊंची याला तोड नाही... आपल्या तरुणाना तुम्ही काय संदेश द्याल?**

**उत्तर-** कुडाळदेशकरांचा ईतिहास वैविध्यपूर्ण आहे. शेकडो वर्षांहून अधिक काळ राज्य करणारे एकमेव ब्राह्मण राजघराणे कुडाळदेशकरांचे होते. आपण अद्वैत तत्त्वज्ञानाचे पालन केले आणि कोकणात धर्माचे रक्षण केले. आमचा अभिमानास्पद इतिहास आहे आणि आपण हा कधीही विसरू नये. आपली माणसं, आपली शाळा, आपलं गाव, आपला समाज आपल्याला घडवतो. याची परतफेड आपण कोणत्या ना कोणत्या स्वरूपात केली पाहिजे असं मला माझ्या सर्व तरुण मीत्राना सांगावेसे वाटते. समाज पुढे यायचा असेल तर एकमेकां सहाय्य करू अवघे धरु सुपंथ.

**खरोखरच ''पुत्र व्हावा ऐसा गुंडा... ज्याचा तिन्ही लोकी झेंडा'' अशा डॉ. माधव प्रभू, बेळगाव यांना उदंड, निरामय, आयुष्य लाभो... त्यांच्या हातून गोरगरिबांची आणि पीडितांची सेवा घडो... त्यांनी मांडलेले अनुभव, मेहनत, व मार्गदर्शन सर्व कु.दे.गौ. ब्राह्मण समाजाला विकास व उन्नीचया मार्गावर नेणारे आहेत. डॉ. माधव प्रभू यांना भावी उपक्रमांसाठी गौड ब्राह्मण सभा गिरगाव तर्फे हार्दिक शुभेच्छा!**

शुभम भवतू...!

**मनीष गुरुदास दाभोलकर**
गोरेगाव (पूर्व)

# कोकण गौरव

**कोकण हे सुंदर आहे मनोहर**
**जाउ हिंडण्यासी निरंतर ।१।**

**तांबडी ही माती हिरवीगार झाडी**
**माडपोफळींची दाटीवाटी ।२।**

**देवा ब्रह्मणांची रेखिव मंदिरे,**
**गुरव गाऱ्हाणे घालताती ।३।**

**सागराच्या लाटा घेऊ अंगावर**
**सूर्य जाता पाहू अस्ता लागी ।४।**

**दारोदारी झाडे आंबा फणसाची**
**आग्रह तो किती खाण्यालागी ।५।**

**सडसडीत बांधा नऊवारी साडी**
**गजरा केसावरी आबोलीचा ।६।**

**मासे ताजेताजे दारावरी येती**
**तिकल्याची ख्याती काय सांगू ।७।**

**बाळ म्हणे आता नका पाहू वाट**
**काढा हो तिकिट, कुडाळचे ।८।**

**गजानन (बाळ) पाटकर**, पुणे
मो. : ९१५८० ०५९०२

## योगसाधना

योगांची जननी। श्वास प्राणायाम।
अवघा आयाम। भारतभू ॥१॥

शांत, तन-मन। घाला पद्मासन।
करा चित्त मग्न। आवडीने ॥२॥

श्वास नि उछ्वास धरा संतुलन।
करा आकलन। योगासने ॥३॥

सुधृढ शरीर। आनंद, उत्साह।
आरोग्य, उल्हास मिळतसे ॥४॥

योगिक क्रियेने। वजन मापात।
चलन वलन। नीट होई ॥५॥

शरीर, मनात। तणाव कचरा।
आसने निचरा। होत असे ॥६॥

धकाधकी जीव शांत अनुभूती।
योगासने केल्या। मिळतसे ॥७॥

शरीर अस्वस्थ। रोगा आमंत्रण।
स्नायूंचे मर्दन। योगासने ॥८॥

जागा नको मोठी। महाग साधने।
छोटीशी आसने। योगाभ्यास ॥९ ॥

राष्ट्रीय हा ठेवा। जतन करावा।
प्रसार करावा। जगभर ॥१०॥

**शुभदा पाटकर**
डोंबिवली

## प्रिय आई

आई,
किती आधार वाटतसे गे, देता तुजला हाक
होई शब्दांची गर्दी, अन गप्पांतच सरतो तास ॥

तरी हुरहुर लागे मनास, राहिले काही बोलायाचे
आंतरात जे दडलेले, ते तुजला सांगायाचे ॥

चल उद्या बोलूया आता, म्हणूनच फोन ठेवतेस खाली
अन दुसऱ्या दिवशीही, भेटीची तिच नवाळी ॥

किती वर्षे सरली ऐसी, प्रेमाच्या या दूनियेत
चढ उतार आयुष्याचे, चालन होतो समवेत ॥

ग्रीष्माच्या दाहामध्ये, जाहलीस शीतल धारा
अन वसंतात सौख्याच्या, मनी फुलतसे मोरपिसारा ॥

ना होती कसली चिंता, ना होते कसले भय
सारे काही पेलणारी तू, होतीस अमुची माय ॥

जरी मोठे जाहलो आम्ही, तरीही लहान होतो
तव प्रेमाच्या पंखात बालपण उपभोगित होतो ॥

परि मान्य नसे नियतीला, ह्रदयाचा चुकला ठोका
सारी पाने सोडूनी गेला, अमुचा हुकूमाचा एक्का ॥


शांत तृप्त तुझा तो चेहरा, ओठावर होते स्मित
जणू सांगत होतीस आम्हा, अरे हो तर दुनियेचो रीत ॥

तू जाता सरले सारे, सरले शब्दांचे खेळ
नि: शब्द उसासे उरले, अन आठवांचा परिमळ ॥

परि ओढाळ मन हे अमुचे, वास्तवास मानीत नाही
तू येशील गे परतूनी, ही आशा सोडत नाही ॥

**सौ. अंजली श्याम सामंत**
विरार

## इटलीतील 'आयसीटीपी'च्या संचालकपदी कुडाळदेशकरांचे सुपुत्र अतीश दाभोलकर यांची नियुक्ती


अतीश दाभोलकर

कुडाळदेशकरांचे सुपुत्र भारतीय सैद्धांतिक भौतिकशास्त्रज्ञ अतीश दाभोलकर यांची इटलीतील 'आयसीटीपी'च्या (इंटरनॅशनल सेंटर फॉर थिअरॉटीकल फिजिक्स) संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

नोबेलविजेते पाकिस्तानी वैज्ञानिक अब्दुस सलाम यांनी स्थापलेल्या इटलीमधील 'सैद्धान्तिक भौतिकी संशोधन केंद्रां'चे (आयसीटीपी) संचालक म्हणून डॉ. अतीश दाभोलकर यांची नियुक्ती झाली आहे. अनेक क्षेत्रांमध्ये विलक्षण कर्तबगारी बजावलेल्या दाभोलकर कुटुंबातल्या अतीश याचे वडील श्रीपाद म्हणजे 'द्राक्षमाऊली' या नावाने ओळखले जाणारे प्रयोगशील कृषिशास्त्रज्ञ. १९६३ मध्ये जन्मलेल्या अतीश यांची मूळ पदवी आहे कानपूरच्या आयआयटीची त्यांनी नंतर प्रिन्स्टन विद्यापीठात सैद्धान्तिक भौतिकीक डॉक्टरेट केली. हार्वर्डसहित अनेक विद्यापीठांमध्ये संशोधन व अध्यापन केल्यानंतर ते १९९६ मध्ये भारतात परतले होते. मुंबईत टाटा मूलभूत संशोधन संस्थेत ते २०१० पर्यंत प्राध्यापक होते. मात्र त्यानंतर आता फ्रान्समधल्या सोरबोन विद्यापीठात ते संशोधन संचालक आहेत. 'गेल्या काही वर्षात निसर्गनियमांची अधिक परिपूर्ण आणि एकसंघ मांडणी करण्याचा प्रयत्न विज्ञान करीत आहे आणि हा अविरत चालणारा शोध आहे हे दाभोलकर यांच्या कामाचे सूत्र त्यांच्याच शब्दांत सांगता येईल. यातूनच, विद्युतचुंबकीय, आंतरक्रिया आणि अणुगर्भातील क्षीण आंतरक्रिया यांच्या अभ्यासाची शाखा विकसित झाली आहे. आयसीटीपी जसे संशोधनाचे काम करते, तसेच मूलभूत संशोधनाला प्रोत्साहन देते. त्यासाठीच, इटली सरकार, युनेस्को आणि जागतिक परमाणू ऊर्जा संस्था या तिघांनी मिळून तिची स्थापना केली आहे. तिचे नेतृत्व करताना डॉ. दाभोलकर यांना भारतासहित जगातील तरुण होतकरू वैज्ञानिकांना शोधून संशोधन प्रकल्प देता येतील. जगभरातील सहा हजारांहून अधिक वैज्ञानिक दरवर्षी आयसीटीपीत जातात. 'जगभरात वैज्ञानिक संस्कृती विकसित करणे, हे आमचे काम आहे आणि ते पुढे जाईल' अशी अपेक्षा दाभोलकरांना आहे. इतक्या सन्मानाच्या पदावर मराठी वैज्ञानिकाची नियुक्ती अभिमानास्पद तर आहेच, पण महाराष्ट्रात आणि भारतात वैज्ञानिक दृष्टी रूजण्यासाठीही या नेमणुकीने हातभार लागावा, हीच आम्हा कुडाळदेशकर ज्ञाती बांधवांची सदिच्छा!

With Best Compliments From

Shrikant S. Joshi
Jitendra N. Joshi

R


**Ramchandra Keshav & Co.**

**GOLD, SILVER, DIAMOND AND PEARL JEWELLERY**

**TIME : 10.30 A.M. To 8.00 P.M.**
**Friday Closed**

53, Mohan Bldg., 162, J.S.S. Road, Girgaum, Mumbai 400 004.
Tel.: 2388 7874 / 2388 2060

# सुप्रसिद्ध हॉलीवूड ॲनिमेशन दिग दर्शक... राहु ल दाभोलकर यांची खास अनोखी मुलाखत


राहु ल दाभोलकर

सुप्रसिद्ध हाँलीवूड अँनिमेशन दिग्दर्शक... राहुल दाभोलकर यांची खास मुलाखत ब्रेव्हर्ली हिल्स अमेरिकेतून आपण Success Stories या सदरातून वाचलीत. त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा ॲनिमेशन, चित्रकला या क्षेत्रात भवितव्य घडवू पाहाणाऱ्या व तरुणांना व्हावा या उद्देशाने गौड ब्राह्मण सभेने काही मुलांची निवड करून त्यांचा थेट संवाद SKYPEच्या माध्यमातून राहुल दाभोलकर यांच्याशी करून दिला.

मुलांनी विविध आधुनिक विषय, तंत्रज्ञान, जागतिक बाजारपेठ, विविध शिक्षण पद्धती यावर भर दिला. राहुल दाभोलकर याने अतिशय संयमाने, विचारपूर्वक, महितीपूर्ण, जबाबदारीने, सत्य आणि असत्य या मधला फरक व जगात विविध देशात असणाऱ्या या संधिविषयी ऊहापोह केला. लंडन, कॅनडा, फ्रान्स, सिंगापूर या देशांमध्ये संधि आहेत. सोशल मीडिया, नेटच्या माध्यमातून तुम्ही तुमचे काम जगापर्यंत पोहोचवा, जगात चाललेल्या कामांचा आढावा घ्या... नवीन तंत्रज्ञान व बदल यांची माहिती घ्या.... तुमचे काम जगाला दाखवा जर त्यात ताकद असेल तर जगातल्या कुठल्याही कोपऱ्यातून तुम्हाला कॉल येऊ शकतो. तुमच्या कामांचे PORTFOLIO बनवा, MILESTONE निश्चित करा. ५ वर्षांनंतर जे करायचे आहे, त्याची तयारी आतापासून सुरू करा. आई वडिलांवर अवलंबून राहू नका, स्वत:ची वाट निवडा... प्रवास सुरू करा. ॲनिमेशन किवा चित्रपट करण्यासाठी तुमच्या मध्ये सर्वेदना, भावना व एक कलाकार असलाच पाहिजे CLIGRAPHY च्या माध्यमातून जाहिरात विश्वात मोठी संधी आज भारतात उपलब्ध आहेत. जे.जे. मध्ये तू होतास काय केलस? असे विचारल्यावर तो हसला व म्हणाला नाना पाटेकर, रवी जाधव यांनी सुद्धा जे.जे. मध्ये काही केल नाही. मी लोकांची मिमीक्रि करायचो. लोकांचे परीक्षण करायचो... २००५ मध्ये वडील गेले मी प्रचंड दुखी: होतो. आता BOLLY WOOD मध्ये एका चित्रपटात दोन भावांमध्ये वडील मुलाचे नाते दाखवले आहे एके दिवशी मोठा भाऊ अचानक मरतो त्यावेळचा प्रसंग उभा करताना मला माझ्या बालपणीचा अनुभव कामी आला. मुलांनो तुम्ही ज्या पर्वात जन्मलात ते पर्व ONLINE चे आहे त्यामुळे काहीच फरक पडत नाही की तुम्ही काश्मिर मध्ये आहात की अर्नाळ्यात !



**उभे डावीकडून सचिन सामंत (विरार), देविका दाभोलकर (गोरेगाव), प्रगति प्रभूखानोलकर (कुडाळ), सान्वी परुळेकर (गोरेगाव), स्मित सामंत (आगाशी) बसलेले डावीकडून गौड ब्राह्मण सभेचे पदाधिकारी वीणा दाभोलकर, मनीष दाभोलकर, उमाकांत महाजन आणि राहुल दाभोलकर (अमेरिकेवरून) मोबाईलवर,**

राहुल दाभोलकर यांनी सर्व ज्ञातीबांधवाना शुभेच्छा दिल्या व मुंबईत आल्यावर गौड ब्राह्मण सभेच्या माध्यमातून एक कार्यशाळा घेण्याचे वचन दिले... राहुल याने अमेरिकेमधून त्याच्या व्यस्त वेळा पत्रकातून रात्री-अपरात्रि सुद्धा ९० मिनिटे अभ्यासपूर्ण गप्पा मारल्या आम्ही राहुल दाभोलकर यांचे पुन्हा एकदा जाहीर आभार मानतो... धन्यवाद!

**मनीष दाभोलकर**
संपादक मंडळ

# ''असे एक रक्षाबंधन-जीवन दात्री बहीण''



दर्शना प्रभूतेंडोलकर

आपल्या माणसांचे कधी आभार मानायचे नसतात पण तरीही त्या व्यक्तीबद्दलचा आपल्या मनात असलेला आदर व कृतज्ञता आपण निश्चितच व्यक्त करू शकतो. पाटकर कुटुंबियात आम्ही पंधरा भाचे मंडळी. सर्वांचा एकमेकांवर अत्यंत जीव. त्यातल्याच एका अशा व्यक्तीबद्दल आज मी तुम्हाला सांगणार आहे जिचे कौतुक करावे तितके कमीच. शब्दसुद्धा कमी पडतात अशावेळी. अभिमानाने ऊर भरून येतो. माझी लाडकी मामेबहीण सुजाता पाटकर (लग्नानंतरची गौरी पोरे). कै. वसंत रघुनाथ पाटकर व कै. सुलोचना वसंत पाटकर यांची कन्या सुजाता. आमची लाडकी सुजाताताई. हसतमुख, कर्तव्यदक्ष, प्रेमळ व प्रसन्न असे तिचे व्यक्तिमत्व. माहेरी व सासरी तिने आपल्या प्रेमळ स्वभावामुळे सर्वांना आपलेसे केले आहे. बँक ऑफ इंडिया, मुंबई मध्ये सतरा वर्षे ती नोकरीमध्ये कार्यरत होती. नंतर पुणे येथे पतीच्या व्यवसायानिमित्त वास्तव्यास आहे.

आपल्या कुटुंबासमवेत सुखासमाधानाने आयुष्य व्यतित करत असताना, दहा वर्षापूर्वी तिने माहेरी आपल्या किडनी ग्रस्त असलेल्या सख्ख्या भावाला, ज्ञानराज पाटकर (दोन्ही किडनी निकामी झालेल्या) आपली एक किडनी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. तिच्या निर्णयास तिचे पती शेखर व कुटुंबातील इतर सदस्यांनी पाठिंबा दिला. आपल्या शरीरातील एक अवयव आपल्या भावाला जीवनदान देणार आहे, या सदिच्छेने तिने हा महत्तवपूर्ण निर्णय घेतला व रक्षाबंधनाचा अर्थ फक्त भावाने बहिणीचे रक्षण करणे नसून बहिण सुद्धा आपल्या भावाच्यापाठी सदा त्याच्या रक्षणासाठी तत्पर असते हे स्वतःच्या आचरणाने सिद्ध केले. आम्हा सर्व बहिणींना तिचा अभिमान वाटतो. आपल्या भावाला आपली एक किडनी देऊन, तिने समाजासमोर एक नवीन आदर्श निर्माण केला आहे.



सुजाता पाटकर पौरे

सामाजिक बांधिलकीच्या नात्याने अंध विद्यार्थांसाठी ब्रेल लिपी मध्ये उपलब्ध नसलेल्या साहित्यिक, स्पर्धात्मक व शैक्षणिक अभ्यासाच्या पुस्तकांचे रेकॉर्डिंग (मोबाईलवर) करण्याचे काम ती कोणताही मोबदला न घेता गेली दीड वर्षे करीत आहे. तसेच रक्तदान शिबिरात ही स्वतः रक्तदान करून तिचे मोलाचे योगदान नेहमीच असते. हे सर्व करत असताना आपली कौटुंबिक जबाबदारी व समाजसेवा यामधील सुवर्णमध्य ती हसत हसत साधते.

अशा या माझ्या बहिणीला निरोगी व उदंड आयुष्य लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

**तिच्यासाठीएक ओळ आवर्जून लिहाविशी वाटते -**
**दिव्यत्वाचीजेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती !**

**दर्शना प्रभूतेंडोलकर,**
कावेरी/००५, ग्रीन व्हयू कॉंप्लेक्स,

**प्रपत्र - ४**

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रकाशन स्थळ | : ३० कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास, ज. शं. शेट रोड, गिरगाव, मुंबई-४. |
| (२) | प्रकाशनाचा कालावधी | : त्रैमासिक |
| (३) | मुद्रक, प्रकाशक, संपादक | : श्री. उमाकांत गणपत महाजन |
| (४) | राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| (५) | पत्ता | : मु. पो. अर्नाळा, ता. वसई, जि. पालघर, अर्नाळा ४०१३०२. |
| (६) | मालकी | : गौड ब्राह्मण सभा, ३० कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, ज. शं. शेट रोड, गिरगाव, मुंबई - ४०० ००४. |

मी उमाकांत गणपत महाजन असे जाहीर करतो की, उपरोक्त दिलेला तपशील माझ्या माहितीस व विश्वासास धरून खरा आहे.

दिनांक : ०१/०९/२०१९

# मरावे परी कीर्ती रूपे उरावे

मरावे परी कीर्ती रूपे उरावे आणि शरीररुपी ही उरावे. खरे तर कीर्तीरूपे उरावे अशीच म्हण आहे. आणि अख्खी मानव जात मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात हीच भावना ठेऊन आयुष्याचा उत्तर काळ जगत असते.

पण किती जण शरीररूपी उरावे अशी इच्छा बाळगतात आणि तशी कायदेशीर तरतूद करतात? अशा समाजात जिथे मरणोत्तर अग्नी संस्कार व इतर विधींची धर्म परंपरा आहे, अशा समाजातून येऊन पूर्ण देह दानाचा निर्णय घेणे यासाठी खरोखरच धाडस लागते. माझ्या सासूबाई सौ.शैलजा शिवराम प्रभू गवाणकर यांनी ते दाखवले.

Egyptian संस्कृतीत मृत्यू पश्चात शरीर preserve करण्याची परंपरा होती. पण त्या मागे स्वार्थ होता. या शरीर रूपी मागे राहण्यात, देह दान करण्यात पूर्ण पणे परमार्थ आहे.

आज त्यांच्या डोळ्यांनी कोणा दोन अनामिक आंधळ्या माणसांना दृष्टी मिळवून दिली आहे. आज त्यांचे संपूर्ण शरीर मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांना अभ्यासाला दिले जाणार आहे. यातील वेगवेगळ्या अवयवांचा उद्याचे हे डॉक्टर अभ्यास करणार. इतर अवयव हे पुढे कित्येक वर्ष फॉमलिन सारख्या द्रवात ठेऊन भावी डॉक्टरांना अभ्यासायला मिळणार. स्वतःच्या शरीराचे असे अनेक प्रकारे विच्छेदन होऊ देणे हा निर्णय खरोखरच अंगावर काटा आणणारा आहे. आयुष्यभर समाजासाठी झटणाऱ्या अनेकांनाही निर्णय घेणे कदाचित जड जाईल, पण सौ. शैलजा शिवराम प्रभू गवाणकर यांने तो घेतला.

त्या परुळे सिंधुदुर्ग येथे प्राथमिक शिक्षिका होत्या आयुष्यभर शाळेत मुलांना शिकवले व मृत्यू पश्चात ही आपला देह शिक्षणासाठी वापरला जाईल अशी काळजी घेतली. त्या हाडाच्या शिक्षिका होत्या ज्यांनी अक्षरशः आपली हाडे सुद्धा भावी डॉक्टरांना शिक्षणासाठी दिली. धन्यती शिक्षिका!

असा निर्णय घेणाऱ्या त्या, तो अमलात आणणारे त्यांचे पती श्री. शिवराम प्रभू (बाजीमास्तर) व त्यांची मुलं या सर्वांना त्रिवार सलाम!

असे म्हणतात की जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती. सौ. शैलजा शिवराम प्रभू गवाणकर यांच्या मुळे तर जगाच्या कल्याणा स्वदेहाची आहुती ही नवी म्हण मराठीला मिळाली आहे. या आहुती मुळे संतांच्या पंक्तीत बसण्याचा मान त्यांनी मिळवला आहे.

मरावे परी शरीर रुपी मागे उरावे ही पण नवी म्हण मराठीला मिळाली आहे. त्यांच्या या त्यागाची योग्य ती नोंद चित्र गुप्ताच्या वहीत व्हावी हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

हा लेख लिहिण्याची प्रेरणा देणारी माझी आत्या जयश्री तुकाराम वालावलकर, साळगाव हिचेही आभार.

**मनीष दत्तात्रय पाटील** ठाणे. मो.: ९३२२५९६२८३


*With Best Compliments From*

PHONDA GHAT PHARMACY

Honey ✦ Gulkand ✦ Bel-Amla Muramba
✦ Rose water ✦ Ayurvedic Medicines



PHONDAGHAT HONEY






1-2, Shanti Building, Mogul Lane,
Mahim (West), Mumbai 400 016.
Ph.: 2432 8542 Mob.: 9820070545
E-mail : phondaghat_pharmacy@hotmail.com

# सांज

जाता सावकाष पाऊलांनी
ती थांबेल का? वळून
ती जाता जाता
का? येते अंधारून .....

येथेच सावल्यांतुन विणले
दूर न्ह्यायचे नाते
ओळ पाखरांचि सांगे

गूज, क्षितीजापार सोबतिचे
अन् तगमग तगमग जिवाचि
मी दगड बनून थिजून... का यावे अंधारून .....

बदलत्या रंग छटांतुन अधिकच
हरवताना, जवळ यावे,
पुसून शरिरांच्या रेषा
बालके स्पर्ष ही विरावे,
वाळूवरल्या नक्षीवरती
काळोख लाट फिरून...

हा क्षणैक दुरावा की
क्षणैक सोबत कळेना,
अंधारी चांदण्या मग झुळती
रोजचा चंद्र कसा हा फसवा?
हे असले येणे जाणे
मोहवून खिळवून खेळवून....

**आशिष श्री. ठाकूर**
९, सुरभी अपार्टमेंट,
ताराबाई पार्क कोल्हापूर, ४१६००३.

With Best
Compliments From

**Sanjay Walawalkar**

**M. : 9820076814**
**sanjay.walawalkar@Jupiter_services.com**




**JUPITER
SERVICES**

**Associate Working Partner of**

**INDUS TOWERS LIMITED**
(A Venture of Airtel, Vodafone & Idea)

# वसईतील विद्यार्थ्यांचे आदरणीय सर कै. रमाकांत भिकाजी बांबर्डेकर



कै. रमाकांत (रमेश) भिकाजी बांबर्डेकर सर ह्यांचे अल्पशा आजाराने ३ मार्च २०१९ रोजी दु:खद निधन झाले. वसईतील विद्यार्थ्यांना क्लासेसच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांना विषय समजेपर्यंत सोप्या रितिने समजवण्याची उत्कृष्ट कला ह्यामुळे बांबर्डेकर सरांचे नाव वसईत सर्वतोमुखी आहे. त्यांच्या शिकवणीमुळे अनेक इंजिनिअर्स, डॉक्टर्स, वकिल, सायंटिस्ट त्यांनी तयार केले.

कै. रमाकांत बांबर्डेकरांची बहिण श्रीमती गीता पाटकर सागतात, आम्ही चार भावंडे, अत्यंत गरीब घरांत जन्माला आलो. गरिबी म्हणजे काय, जवळ जवळ अन्नाला कपड्याला मोताद. आजूबाजूच्यांनी दिलेल्या अन्नावर कपड्यावर जगलो एक चांगली गोष्ट आई-वडिलांनी दिली ती म्हणजे भरपूर कष्ट-मेहनत व प्रामाणिकपणा तुमच्या कडे असेल तर परिस्थीतीवर मात करून यश, सुख सहजपणे मिळवू शकता.

सुरवातिला लक्ष्मी नाही तर सरस्वती आमच्याकडे पाणी भरत होती. तीनेच लक्ष्मी आमच्याकडे खेचून आणली परमेश्वराची देणगी म्हणा आम्ही चारही भावंडे शिक्षणात हुशार ते ज्ञान देवाने भरभरून आम्हाला दिले. परंतु आमच्यात माझा धाकटा भाऊ रमाकांत (रमेश) जास्त म्हणजे खूपच ज्ञानी. चौथी-पाचवीत असतांनाच तो ११ वीची गणिते लिलया सोडवायचा. मराठी, संस्कृत इंग्रजी, गणित कोणताही विषय घ्या. सर्वांत पैकीच्या पैकी मार्क त्यावेळी शाळेंतील हुषार विद्यार्थ्यांना मिळणारी बहुतेक सर्व बक्षिसे दहावीपर्यंत त्यानेच मिळविली.

मैदानी खेळांची अतिशय आवड. क्रिकेट तर त्याचा जणू प्राण होता. संपूर्ण वसईतून एस.एस.सी. ला बोर्डातून पहिला येणार अशी त्याची ख्याती होती. ते श्रेय आपल्या शाळेला मिळावे म्हणून शाळांचे प्रतिनीधी आमच्या घरी सतत येत असत.

पण दुर्दैव! त्या अभ्यासाचा ताण म्हणा किंवा दुसरे काही. त्याला ताप यायला लागला. तो ताप टायफाईड निघाला. ही गोष्ट ११ वीचा फॉर्म भरला तेव्हाची. परिक्षा हुकली. ऑक्टोबर ला फॉर्म भरला पुन: तेच घडले. त्यामुळे छातींत पाणी झाले. त्यामुळे मोठ्या ऑपरेशनला त्याला सामोरे जावे लागले. शिक्षणाची दोन वर्षे मागे पडली. ह्याला म्हणता दैवदुर्विलास.

तो मनाने खचला पण एखाद्या फिनिक्स पक्षाप्रमाणे मनाची उभारी धरून तो पुन्हा उभा राहिला. शिक्षण पूर्ण केले. बिकॉम, एल.एल.बीचे शिक्षण घेतले. वकिलीचे शिक्षण पण पार केले. (हूशारी तीच पण कालाच्या आघाताने आत्मविश्वास हिरावून घेतला.) स्वकेंद्रीत झाला त्यामुळे कोणत्याही नोकरींत स्थिरावू शकला नाही. ट्यूशन चालू केल्या. त्यांत त्याला बऱ्यापैकी यश मिळत गेले. आज वसईतील शेकडो विद्यार्थी ''सर'' ह्या नावाने त्याला ओळखतात.

ह्याशिवाय भविष्य, अध्यात्म ह्याचा व्यासंग तर खूपच होता. त्याच्या भविष्यवाणीचे एक उदाहरण माझ्या भाचीला बरेच वर्ष अपत्य नव्हते. माझ्या बहिणीने त्याला विचारले. तिला मूल कधि होईल ते त्याने २०१४ साली. आणि तसेच झाले.

देवाचे एवढे करायचा, वाचन, उपवास, देवळातजाणे हा नेम त्याने कधिही चुकविला नाही. अथर्वशिर्ष्य, स्तोत्र सर्व मुखोद्गत होती. परंतु एककल्ली वागण्यामुळे संसार सुखाला मात्र तो पारखा झाला. लग्न काही त्याने केले नाही.

मागे झालेल्या आजारात त्याचे एक फुफ्फुस निकामी झाले होते. नंतर वयपरत्वे श्वास लागणे, सर्दी होणे, ह्या सारखी आजारपण त्याच्या मागे लागली. तरी पण तो कधी हरला नाही. सतत औषध-पाणी-डॉक्टरांकडे जाणे स्वताचे स्वत:च करायचा.

माझी सारखी बडबड असायची. वेळेवर जेव, वेळेवर झोप, औषध घे. असो. रात्री उशीरापर्यंत जप-जाप्य करीत असायचा. त्यामुळे माझी चिडचिड व्हायची. मी त्याला सारखी म्हणायची असे करू नको. तो 'हो' म्हणायचा. पण कधिही उलटून बोलला नाही. हा त्याचा गुण खुपच घेण्यासारखा होता. त्याच्यावर मी रागावले तर ''ताई तू चिडू नकोस तुला त्रास होईल.

एकदा तर म्हणाला तू माझी काळजी करू नकोस. मी कापरासारखा हवेत विरून जाईन. कोणाला समजणारपण नाही. आणि झाले पण तसेच दोन दिवस श्वासाचा त्रास झाला डॉ. कडे दादा, वहिनी, जावई घेऊन गेले परंतु श्वास हळुहळु कमी होत गेला. कुठे दुखले नाही. खुपले नाही जीना उतरवून खाली रीक्षांत ठेवले तर रस्त्यातच त्याचे प्राणोत्क्रमण झाले.

बोलल्या प्रमाणेच तो कापरासारखा हवेत विरुन गेला.

जे कष्ट, हाल अपेष्टा आपल्या वाट्याला आले ते इतरांच्या येऊ नये व जर आलेच तर त्याला काही मदत मिळावी म्हणून कै. रमाकांत भिकाजी बांबर्डेकरांनी आपल्या स्व. कमाईतील रुपये ५०,००० आपल्या ज्ञातीतील गौड ब्राह्मण सभेकडे देवून त्याच्या व्याजातून अशा लोकांना मदत व्हावी म्हणून देणगी स्वरुपात दिले.

**गीता पाटकर (बांबार्डेकर)**




एप्रिल/मे/जून २०१९ चा अंक नेहमीप्रमाणे आवडला. साऱ्या कविता, पुस्तक परीक्षण आवडले सर्व सत्कार मूर्तीना पुढील वाटचालींसाठी ज्ञातीबांधवातर्फे शुभेच्छा !

'धैर्य नावाचा सद्‌गुण हा प्रा. माधव गवाणकर यांचा लेख फार आवडला. धन्यवाद ! साहसे श्री. प्रतिवसति हे सुभाषित आठवले तसेच संघर्ष व अनुभव शब्द वाचताच मनसंगणकावर तदनुषंगीक कवितेच्या मधल्याच दोन ओळी तसेच कविता आठवली.

**अमुचा प्याला दुःखाचा । डोळे मिटूनी प्यायाचा।।**
**पिता तळाला गाळ वसे। अनुभव त्यानाव असे।।**

सदर शालेय कवितेचे कवी कोण हे कालौघात विसरले

**संघर्ष–**

**संघर्षाने जीवन फुलते**
**संघर्षाने जीवन खुलते ।।**
**संघर्षी लवचिकता लपली ।**
**तुला हवा तसा तू दे आकार।**
**संघर्षाविण अळणी जीवनी स्वप्ने होतील कशी साकार ?**

शब्दाचा खेळिया 'पुलं' हा निरूता भाटवडेकर यांचा लेख वाचून जन्यजनकपणे मन पाखरू पन्नासवर्षे मागे गेले. शालांत परीक्षा अभ्यासक्रमात अपुर्वाई मधील 'माझा लंडनचा प्रवास' हा धडा होता. लंडनमध्ये पोलीसाना बॉबी म्हणतात. स्नेह संमेलनात फिशपॉण्ड मध्ये मुख्याध्यापिका एस. ए.आर. हकीम यांना सेवासदनाचा बॉबी हा फिशपॉण्ड दिला होता. आज त्या आठवणीने स्मरणकातर झाले 'शब्दांना परीसस्पर्श हवा या त्यांच्या ललीतलेखाने माझ्याकडून पुढील रचना झाली.

**सामान्यांनी असामान्यांना दिलेली मानवंदना अनुकरण।**
**साऱ्या क्षेत्रातचि त्याचेहोतसे हो प्रकटीकरण।।**
**जीवनयज्ञी अर्पावा आपुला हविर्भाग प्रत्येकानेसातत्याने।**
**कुणी सांगावे कधी प्रकटेल 'वर ब्रूहि' यज्ञदेवता संतोषाने।।**

'तुलनेचे घरटे' हा पल्लवी वागळे सामंत यांचा लेख खूप आवडला जे कृष्णमूर्तीच तदनुषंगीक विचार येथे मांडल्यास वावगे ठरणार नाही.

**नसे ऊंची सागराला।**
**नसे खोली पर्वताला । नसे शृंग गरूडाला।**
**नसे पंख हरणाला।।**
**जाणोनि विधीच्यावै शिष्ट्याचे।**
**करी सार्थक अपुल्या जन्माचे।।**

मनीष दाभोलकर यांच्या SUCCESS STORIES झुंजारनेत्या कमलताई परूळेकर यांची माहिती वाचून त्याना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा! जीवेत् शरदः शतम्।

**सौ. स्मिता दत्तात्रय पाटील**

**–**

**श्रावण आला श्रावण आला म्हणत असतांना होईल. सणांची सुरुवात खवय्यांनीही भरपूर मांसाहार करून घ्या मग निदान महिनाभर तरी पोटाला राहू देत आरामात,**

**श्रावणी सोमवार, शुक्रवार व्रतवैकल्ये,मंगळागौर यांनी नटलेला असतो श्रावण ।**
**गुळवणी, नारळीभात, पुरणपोळया अशा गोडोबांनी सजलेलं असत जेवण।**

**नागपंचमीला असते मुलांना शाळेला सुट्टी।**
**पण वृक्षतोडीमुळे नागोबांनीही घेतली आहे सर्वांशी कट्टी।**

**वाढत्या प्रदुषणामुळे कोणालाच नाही राहीलय या गोष्टीच भान।**
**मग नागोबांच्या प्रतिकृतीवरच छोट्यांना मानाव लागत समाधान।**

**रंगीबेरंगी राख्यांनी मग चढतो दुकानांना वेगळाच साज।**
**बहीण–भावाच अनोख नात सांगणारा रक्षाबंधन हा सण येतो याच महिन्यातखास।**

**मग येते यशोदेच्या कान्ह्याच्या जन्माचीवेळ ।**
**दुसऱ्यादिवशी सर्वजण उत्साहाने खेळतात दहीहंडीचा खेळ।**

**पोळा हा असतो शेतकऱ्यांचा सण ।**
**या सर्व सणांमध्ये चैतन्यानेफुलुन जात आपलं मन ।**

**याच अमाप उत्साहात असतांना लागते भाद्रपदाची चाहुल।**
**आणि गणपतीबाप्पाच्या स्वागताच्या दिशेने आपल्या सर्वांचे पडते पहिले पाऊल।**

**सौ. चैताली गव्हाणकर –कावतकर**
(डोंबिवली)

स्थापना : १८९७ दूरध्वनी : २३८५ ००१५

# गौड ब्राह्मण सभा

## सभेची सेवा दालने

ज्ञातीतील दानशूर व्यक्तींनी संस्थेला दिलेल्या भरघोस देणग्यांमधून, त्यांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार गौड ब्राह्मण सभेने विविध कायमनिधी फंड गठीत केले असून या कायमनिधी फंडांच्या व्याजातून ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरीब, गरजू स्त्री/पुरुष, यांना आर्थिक मदत, विद्यार्थी/विद्यार्थिनींना शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती तसेच ज्ञातीतील कर्करोग, हृदयविकार, किडणीविकार, मतिमंद आदि व्याधीग्रस्त रुग्णांना औषधोपचार/शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत दिली जाते.

संस्थेच्या विविध कायमनिधी फंडांचा तपशील खालीलप्रमाणे आहे-

- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाईबाळकृष्ण पाटील स्म. कु.दे.गौ.ब्रा. विद्यार्थिनी विद्यावृद्धी कोष:** ज्ञातीतील होतकरू, गरजू गरीब मुलींच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.
- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाईबाळकृष्ण पाटील स्म.कु.दे.गौ.ब्रा.निराश्रित महिला साहाय्यकारी कोष:** ज्ञातीतील निराधार, गरीब, निराश्रित महिलांना आर्थिक साहाय्य.
- **स्व. श्री. लक्ष्मणअनंत पाटील पाटकर स्म.कु.दे.गौ.ब्रा.निराश्रित महिला/पुरुष साहाय्यकारी कोष:** ज्ञातीतील निराधार, गरीब, निराश्रित महिला/पुरुषांना आर्थिक साहाय्य.
- **स्व. श्रीमती अन्नपूर्णा लक्ष्मणपाटील पाटकर स्म.कु.दे.गौ.ब्रा.विद्यार्थी/विद्यार्थिनीविद्यावृद्धी कोष:** ज्ञातीतील होतकरू, गरजू, गरीब विद्यार्थी/विद्यार्थिनींना शैक्षणिक शिष्यवृत्ती.
- **स्व. श्रीमती गौरीव स्व. श्री. मंगेश पाटील स्म.कु. दे. गौ.ब्रा. विद्यार्थीविद्यावृद्धी कोष:** शहराव्यतिरिक्त फक्त ग्रामीण भागातील ज्ञातीतील होतकरू, गरजू, गरीब विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती.
- **स्व. श्रीमती लीला व स्व. श्री. दामोदर सामंत स्म. कु. दे. गौ.ब्रा. विद्यार्थीविद्यावृद्धी कोष:** शहराव्यतिरिक्त फक्त ग्रामीण भागातील ज्ञातीतील होतकरू, गरजू, गरीब विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती.
- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाईबाळकृष्ण पाटील स्म.कु.दे.गौ.ब्रा.मतिमंद साहाय्य कोष:** ज्ञातीतील मतिमंदांना विशेषत: मतिमंद मुलीं व स्त्रियांना औषधोपचारांसाठी आर्थिक साहाय्य.
- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाईबाळकृष्ण पाटील स्म. कु.दे.गौ.ब्रा.रुग्णसेवाकोष:** ज्ञातीतील रुग्णांना विशेषत: स्त्री रुग्णांना औषधोपचारांसाठी आर्थिक साहाय्य.
- **स्व. श्री. एकनाथ केशव ठाकूर स्म.कर्करोग वैद्यकीयउपचार फंड:** ज्ञातीतील निराश्रित, निराधार, गरीब कर्करोगग्रस्त रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक साहाय्य.
- **वैद्यकीयफंड :** ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरजू, गरीब व्यक्तींना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक साहाय्य.
- **वृद्धाश्रम फंड :** ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरीब, गरजू आजारी वयोवृद्धांना (७० वर्षांवरील) वर्षातून एकदा आर्थिक साहाय्य. मात्र यासाठी अशा व्यक्तींनी संस्थेकडे लेखी अर्ज (वय/उत्पन्न/आजार/आजारावर होणारा खर्च आदि माहितीसह) करावेत. अर्जदारांनी आपला दूरध्वनी/मोबाईल क्र. लिहिणे आवश्यक आहे.
- **कन्यादानफंड :** ज्ञातीतील गरीब, गरजू मुलींच्या विवाहाप्रीत्यर्थ आर्थिक साहाय्य. लग्नपत्रिका अर्जासोबत जोडवी.

ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरीब, गरजू व्यक्तींनी आर्थिक मदतीसाठी रितसर लेखी अर्ज करावयाचे आहेत. संस्थेचे छापील अर्ज संस्थेच्या गिरगाव येथील कार्यालयात उपलब्ध आहेत. मुंबईसह अन्य बाहेरगावच्या तसेच ग्रामीण भागातील ज्ञातीबांधवांनी अर्जाची मागणी केल्यास टपालाद्वारे अर्ज पाठविला जाईल. मात्र त्यासाठी आपल्या लेखी अर्जात कुठल्या फंडातून मदत हवी आहे याचा जरूर उल्लेख करावा. अर्धवट तपशील असलेल्या कोणत्याही अर्जावर संस्थेकडून विचार केला जाणार नाही.

स्थापना : १८९७ दूरध्वनी : २३८५००१५

# गौड ब्राह्मण सभा

॥ उत्तिष्ठ यशो लभस्व ॥ गौड ब्राह्मण

## सभेची अन्य सेवा दालने

- **शैक्षणिक पारितोषिक फंड :** आपल्या ज्ञातीतील दानशूर व्यक्तींच्या स्मृतिप्रीत्यर्थ संस्थेच्या विविध पारितोषिक फंडांच्या व्याजातून दरवर्षी माध्यमिक शालान्त (एस.एस.सी.) प्रमाणपत्र परीक्षा, उच्च माध्यमिक शालान्त (एच.एस.सी.) प्रमाणपत्र परीक्षा तसेच अन्य परीक्षांमध्ये विशेष गुणवत्ता संपादन केलेल्या ज्ञातीतील हुशार व होतकरू मुलां/मुलींना संस्थेतर्फे पारितोषिके व प्रशास्तीपत्रे देऊन विशेष कार्यक्रमात गौरविण्यात येते. तसेच ''गौड ब्राह्मण'' ह्या त्रैमासिकांतून गुणवत्ता प्राप्त मुलांची माहिती फोटोंसह प्रसिद्ध केली जाते.
- **गौड ब्राह्मण त्रैमासिक प्रकाशन फंड :** ''गौड ब्राह्मण'' त्रैमासिक हे आपल्या ज्ञातीचे मुखपत्र आहे. या त्रैमासिकाला ८० वर्षे पूर्ण झाली आहेत हे नमूद करायला आम्हाला विशेष आनंद होतो आहे. सदर त्रैमासिकाच्या माध्यमातून ज्ञातीमध्ये होणाऱ्या बदलांचा, तरुण पिढीच्या नव्या विचार प्रणालीचा तसेच इतर घडामोडींचा परामर्ष घेतला जातो शिवाय ज्ञातीबांधवांना संघटित करून समाज प्रबोधनाचे कार्य केले जाते. गौड ब्राह्मण सभेतर्फे प्रकाशित केले जाणारे हे त्रैमासिक संस्थेचे परंपरेने चालत आलेले वैभव आहे.
  संस्थेचे हे त्रैमासिक संस्थेच्या आजीव सभासदांना टपालाद्वारे विनामूल्य घरपोच पाठविले जाते. त्यासाठी संस्थेचे आजीव सभासदत्व स्वीकारण्यासाठी ज्ञातीबांधवांना आम्ही विशेष आवाहन करीत आहोत.
- **सामुदायिक मौजीबंधनसोहळा फंड :** संस्थेतर्फे नाममात्र नोंदणी शुल्क आकारून सामुदायिक मौजीबंधन सोहळा आयोजित केला जातो. संपूर्ण तपशीलासाठी कृपया सायं. ३.०० ते ६.०० या वेळेत कार्यालयात संपर्क साधावा.
- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर/स्व. श्री. दिनकर खानोलकर सभागृह कोष :** स्व. श्रीमती लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर/स्व. श्री. दिनकर खानोलकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संथेने नव्याने कायम निधी फंड गठीत केला असून भविष्यात भव्य सभागृह उभारण्यात येणार आहे. यासाठी जागा, जमीनजुमला, निवासी घर किंवा रु.१,००,०००/- किंवा त्याहून अधिक देणगी देणाऱ्या ज्ञातीतील दानशूरांची नावे कायम स्वरूपात त्रैमासिकात छापण्यात येतील. तसेच रु.५,००,००० व त्याहून अधिक रक्कम देणाऱ्या देणगीदारांची नावे व फोटो सभागृहात लावण्यात येतील. तसेच सदर देणगीदारांच्या नावांना त्रैमासिकात प्रसिद्धी देण्यात येईल. ज्ञातीतील दानशूरांनी सढळ हस्ते देणग्या देऊन ह्या प्रकल्पाला हातभार लावावा ही विनंती.
- **वधू–वर पालक मेळावा :** ज्ञातीतील वधू-वरांसाठी संस्थेतर्फे 'वधू-वर पालक मेळावा' आयोजित करून मान्यवरांच्या उपस्थितीत मार्गदर्शन केले जाते. ज्ञातीतील वधू -वरांची माहिती सभेच्या ''गौड ब्राह्मण'' त्रैमासिकात प्रकाशित केली जाते. वधू-वर नोंदणीसाठी वार्षिक शुल्क रु.२५०/- आकारले जाते. वधू-वर नोंदणी अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. आपल्या विनंतीनुसार नोंदणी अर्ज टपालाद्वारेदेखील पाठविले जातात. संस्थेच्या आजीव सभासदत्वाची वर्गणी रु.१०००/- भरल्यास आजीवन संस्थेचे त्रैमासिक आपल्या पत्त्यावर विनामूल्य घरपोच पाठविले जाते. त्यासाठी आपण संस्थेचे आजीव सभासद होणे गरजेचे आहे. आजीव सभासदत्वाचे अर्ज कार्यालयात उपलब्ध आहेत. वधू-वरांनी आपली नावे संपूर्ण तपशीलांसह संस्थेच्या कार्यालयात नोंदवावीत.
- **गौडब्राह्मण सभा वार्षिक स्नेह–संमेलन व पारितोषिक वितरण सोहळा :** संस्थेच्या वार्षिक स्नेह-संमेलनाचे औचित्य साधून सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक, औद्योगिक, क्रीडा आदि क्षेत्रांत कार्य करणाऱ्या ज्ञातीतील कर्तबगार, निपुण अशा मान्यवर व्यक्तींचा संस्थेतर्फे सत्कार, सन्मान केला जातो.
- **रुग्णसेवा** ज्ञातीतील तसेच अन्य समाजातील रुग्ण व्यक्तींना वैद्यकीय उपचारासाठी परत करण्याच्या बोलीवर संस्थेतर्फे विनामूल्य वैद्यकीय उपकरणे पुरविली जातात. गरजूंनी यांचा अवश्य लाभ घ्यावा.

**वरील सर्व उद्दिष्टांना हातभार लावण्यासाठी ज्ञातीतील दानशूरांनी सढळ हस्ते आर्थिक साहाय्य करावे. कृपया चेक/डीडी ''गौड ब्राह्मण सभा'' या नावे पाठवावा. संस्थेचे सारस्वत को–ऑप. बँक A/c No. 02200100027556 IFSC Code SRCB 0000002, गिरगाव. अधिक माहितीसाठी श्री. उमाकांत गणपत महाजन–कार्याध्यक्ष-(९६८९७८१७५०) श्री. मनीष गुरुदास दाभोलकर खजिनदार (९८२१२५८०४७) यांच्याशी संपर्क साधावा.**

# हार्दिक अभिनंदन !

सन २०१९ सालामध्ये पार पडलेल्या माध्यमिक शालान्त परीक्षा एस्.एस्.सी. (S.S.C.) उच्च माध्यमिक एच्.एस्.सी (H.S.C.) परीक्षेत तसेच अन्य शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपल्या ज्ञातीतील खालील विद्यार्थ्यांनी स्पृहणीय यश संपादन केले आहे. 'गौड ब्राह्मण सभे' तर्फे या सर्वांचे हार्दिक अभिनंदन ! विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या गुणांची टक्केवारी खालीलप्रमाणे :

## १० वी (S.S.C.)

### कुमार विश्वजित किरण सामंत (रत्नागिरी)



कुमार विश्वजित किरण सामंत ह्याने शालांत परीक्षेत ९९ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. त्याला संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले असून त्याने पुढील शिक्षणासाठी तंत्रनिकेतन मध्ये प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. किरण रविंद्र सामंत हे व्यवसायीक असून त्याची आई सौ. वर्षा किरण सामंत ह्या गृहिणी आहेत.

### कुमारी चिन्मयी रामकृष्ण प्रभुआजगावकर (वेतोरे)



कुमारी चिन्मयी रामकृष्ण प्रभुआजगावकर हिने शालांत परीक्षेत ९७ टक्के गुण मिळवत स्पृहणीय यश संपादन केले असून तिने शालेय जीवनात होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत रौप्य पदक व एन.टी.एस. ही परीक्षा उत्तीर्ण केली तिने तबला प्रवेशिका पूर्ण केली आहे. तिने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. रामकृष्ण चंद्रकांत प्रभुआजगावकर हे डॉक्टर असून तिची आई सौ. रसिका रामकृष्ण प्रभुआजगावकर ह्या गृहिणी आहेत.

### कुमार अभिषेक आनंद देसाई (पार्ले)



कुमार अभिषेक आनंद देसाई ह्याने आय.सी.एस्.ई. बोर्डाच्या १०वी च्या परिक्षेत ९६.१७ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याला बॅडमिंटन खेळात प्राविण्य मिळाले असून त्यानी पुढील शिक्षणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. आनंद अरुण देसाई हे चार्टर्ड अकौटंन्ट असून त्यांची स्वत:ची मे. आनंद देसाई आणि असोसिएट नावाची फर्म आहे. ते आपल्या ज्ञाती संस्थांचे आयकर सल्लागार आहेत. त्याची आई सौ. आरती आनंद देसाई ह्या इन्कम टॅक्स बाबतची कामे पहातात. गिरगावातील ज्ञातीच्या सर्व संस्थांचे ऑडिटर, चार्टड अकाऊटंन्ट श्री. अरुण दिनकर देसाईंचा कुमार अभिषेक हा नातू आहे.

### कुमारी रुपल निलेश परुळेकर

श्री. निलेश पुरुषोत्तम परुळेकर (B.E., L. & T. Joint gen. man.) व सौ.ऋतुजा निलेश परुळेकर (Msc. Micro. Bio. Recon man.) ह्यांची मुलगी कुमारी रुपल निलेश परुळेकर हिने शालांत परीक्षा आय. सी. एस. ई. बोर्ड मध्ये ९६.२ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. तिला केमिस्ट्री व कॉम्प्युटर ह्या विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले असून तिने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. तिला पुढे आपले करिअर अभियांत्रीकीत करायचे आहे. ती जशी अभ्यासात हुशार आहे तशीच तिला अनेक गोष्टींची आवड आहे. तिचे लिखाण मुद्देसुद व टापटिप आहे. कोणत्याही विषयावर ती जशी लिहू शकते तसे आपले विचार स्पष्टपणे मांडूही शकते.



चित्रकला, पेंटिंग, क्विलिंग, कॉलिग्राफी, हस्तकला ह्याची तिला खुप आवड आहे. वाचनाचीही आवड आहे.

ती मित्र परिवारात रमणारी, बोलकी, दुसऱ्याला मदत करणारी आहे. तिच्या बडबड्या स्वभावाने शिक्षकांनाही ती आवडते. तिने सारा अभ्यास हसत-खेळत मजा-मस्तितच केला.

## कुमार पार्थ समीर कोचरेकर (कांदिवली)



कुमार पार्थ समीर कोचरेकर ह्याने १०वी शालांत परीक्षा आय.सी.एस.ई. बोर्ड मध्ये ९५ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले असून शालेय जीवनात त्याने निबंध स्पर्धा, नाटक, एकांकीका वकृत्व स्पर्धेत बक्षीसे मिळविली आहेत. त्याने पुढील शिक्षणासाठी JEE Advance for IIT साठी प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. समीर सुरेश कोचरेकर हे उद्योजक असून त्याची आई सौ. अंजली समीर कोचरेकर ह्या व्हानवटी कंन्सलन्टंस प्राव्हेट लिमिटेड मध्ये नोकरी करीत आहेत.

## कुमारी दुर्गा मोहित आडेलकर (मुलूंड)



कुमारी दुर्गा मोहित आडेलकर हिने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९४.६० टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले असून तिला इयत्ता ४ थी व ८वी ची शिष्यवृत्ती मिळाली होती. तिने इयत्ता ६ वी व ९वी मध्ये डॉ. होमी भाभा परीक्षा, चित्रकलेची ऐलीमेंटरी व इंटरमिजेट परीक्षा व अखिल भारतीय गांर्धव महाविद्यालयाच्या परीक्षेत ही विशेष यश संपादन केले आहे. तिने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. मोहित प्रभाकर आडेलकर हे रहेजा कॉर्पोरेशन मध्ये नोकरी करीत असून तिची आई सौ. पल्लवी मोहित आडेलकर ह्या गृहिणी आहेत.

## कुमार हर्ष आनंद सामंत (कांदिवली)



कुमार हर्ष आनंद सामंत ह्याने आय.सी. एस्.ई. बोर्डाच्या १० वी च्या परीक्षेत ९४.३३ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. त्याला गणितामध्ये १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. त्यांनी पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. आनंद यशवंत सामंत हे एअर इंडीया मध्ये उप-मुख्य अभियंता असून त्याची आई सौ. ऋचा आनंद सामंत ह्या शिक्षिका आहेत.

## कुमारी तन्वी यशवंत परुळेकर (वेताळ बांबार्डे)



कुमारी तन्वी यशवंत परुळेकर हिने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९४.२० टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिने पुढील शिक्षणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. यशवंत महादेव परुळेकर हे शेतकरी असून तिची आई सौ. यशश्री यशवंत परुळेकर ह्या गृहिणी आहेत.

## कुमार अनंथा रामचंद्र नायक (टिळकनगर)



कुमार अनंथा रामचंद्र नायक ह्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९४ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. त्याचा शिष्यवृत्ती परीक्षेत १० वा नंबर आला होता. त्याने नॅशनल टॅलेंट सर्च परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविले असुन त्याने व्हायोलीनच्या ही दोन परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. त्याने पुढील शिक्षणासाठी स्पेस जुनियर कॉलेज मध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. रामचंद्र नायक हे सिप्ला कंपनीत नोकरी करीत असून त्याची आई सौ. सिवलेखा रामचंद्र नायक ह्या गृहिणी आहेत.

## कुमारी शलाका महेश प्रभु (डोंबिवली)



कुमारी शलाका महेश प्रभु हिने शालांत परीक्षेत ९४ टक्के गुण मिळवत स्पृहणीय यश संपादन केले आहे. तिने इयत्ता ५वी व ८वीत महाराष्ट्र राज्याची शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. तिने 'इंटरमिज्येट' ह्या चित्रकलेच्या परीक्षेत 'बी' ग्रेड प्राप्त केली आहे. तिने पुढील शिक्षणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री.महेश मधुकर प्रभु हे एच. डी. एफ. सी. बँकेत व्हाईस प्रेसिडेंट असून तिची आई सौ. हर्षा महेश प्रभु ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी मृणाल सुधाकर ठाकूर (कुडाळ)**



कुमारी मृणाल सुधाकर ठाकूर हिने शालांत परीक्षेत ९३.८० टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिने इयत्ता ४ थी व ७ वी ची शिष्यवृत्तीही मिळवली आहे. तिने पुढील शिक्षणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. सुधाकर बाबाजी ठाकूर हे सावंतवाडी पंचायत समिती मध्ये नोकरी करीत असून तिची आई सौ. मीरा सुधाकर ठाकूर ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी मृण्मयी रविंद्र वालावलकर (कुडाळ)**




कु. मृण्मयी रविंद्र वालावलकर हिने मार्च २०१९ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाण पत्र परीक्षा इ. १० वी मध्ये ९३.४० टक्के गुण मिळविले असून ती शिष्यवृत्तीधारक आहे. तसेच राज्य विज्ञान शिक्षणसंस्था रविनगर, नागपूर आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या संयुक्त विध्यमाने आयोजित केलेल्या राज्य विज्ञान प्रदर्शनामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे तसेच नेहरु विज्ञान केंद्र, वरळी, मुंबई याठिकाणी संपन्न झालेल्या पश्चिम भारत विज्ञान जत्रेमध्ये आठ राज्यांसमवेत (महाराष्ट्र, दादरा नगर हवेली, दिव-दमण, छतीसगड, मध्य प्रदेश, राज्यस्थान व गुजरात) झालेल्या Western India Science Fair स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करीत प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. तिने नेहरु विज्ञान केंद्र-वरळी मुंबई या ठिकाणी संपन्न झालेल्या नवप्रवर्तन उत्सव Innovation Festival मध्ये नेत्र दिपक यश संपादन केले आहे.

**कुमार सलिल प्रसाद प्रभू-बांबर्डेकर (वांद्रे)**



कुमार सलिल प्रसाद प्रभू-बांबर्डेक ह्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९३.२० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले असून त्याने इयत्ता ४ थी व ८ वी ची शिष्यवृत्ती संपादन केली होती. त्याने गणित प्रज्ञा परीक्षा इयत्ता ५ वी रौप्यपदक, इयत्ता ८वीत सुवर्णपदक, संपादन केले असुन त्याने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्यांचे वडील श्री. प्रसाद जोगदेव प्रभू-बांबर्डेकर हे भारतीय जीवन वीमा मध्ये विकास अधिकारी असून त्याची आई सौ. माधवी प्रसाद प्रभू-बांबर्डेकर ह्याचा स्वयंरोजगार आहे.

**कुमार स्वप्निल संदीप देसाई (ठाणे)**




कुमार स्वप्निल संदीप देसाई ह्याने इयत्ता १० वी सीबीएससी बोर्डाच्या परीक्षेत ९३.१६ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. संदीप चंद्रकात देसाई असून त्याची आई सौ. शिल्पा संदीप देसाई ह्या रिझर्व्ह बँकेत सहायक प्रबंधक आहेत.

**कुमार तेजस सदानंद सामंत (आंदुर्ले)**




कुमार तेजस सदानंद सामंत ह्याने शालांत परीक्षेत ९२.६० टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याने अभ्यासा व्यतीरीक्त पखवाज वादन व हार्मोनियम वादनाच्या दोन परीक्षा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण केल्या आहेत. त्याने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. सदानंद बळीराम सामत हे शेतकरी असून त्याची आई सौ. स्नेहा सदानंद सामंत ह्या गृहिणी आहेत.

**कुमार प्रणव गोपाळ दाभोलकर (दाभोली)**



श्री. गोपाळ पंढरीनाथ दाभोलकर व सौ. मिरा गोपाळ दाभोलकर यांचा मुलगा प्रणव गोपाळ दाभोलकर ह्याने शालांत परीक्षेत ९२.४२ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याचा रा. कृ. पाटकर हायस्कूल, वेंगुर्ले शाळेतून प्रथम क्रमांक आला आहे. त्याला मॅकॅनिकल टेक्नॉलॉजी विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. त्याने चित्रकला विषयात प्राविण्य, कबड्डी व ॲथलैटीक या खेळात जिल्हास्तरावर विशेष प्राविण्य मिळविले असून त्याला शाळेचा बेस्ट स्टुडन्ट ऑफ दी ईयर हा किताब मिळाला आहे. त्याने भारतीय नौदलाचे १० दिवसीय शिबिर 'ए' श्रेणीत पूर्ण केले आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे.

**कुमार आदित्य प्रशांत झारापकर (मुंबई)**



कुमार आदित्य प्रशांत झारापकर ह्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९२.२० टक्के गुण मिळवत प्रशंसनीय यश संपादन केले आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. प्रशांत झारापकर हे नोकरी करीत असून त्याची आई सौ.प्रिया प्रशांत झारापकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी राजश्री संजय खानोलकर (अंधेरी)**




कुमारी राजश्री संजय खानोलकर हिने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९२ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. शालेय जीवनात तिला मनाचे श्लोक पाठांतर परीक्षेत दोन वेळा बक्षीस मिळाले. तिने पुढील शिक्षणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. संजय गुरुनाथ खानोलकर हे एम.टी.एन.एल. मध्ये नोकरी करीत असून तिची आई सौ. संध्या संजय खानोलकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमार मनीष महेश बावकर (मालवण जि. सिंधुदूर्ग)**



कुमार मनीष महेश बावकर ह्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९१.८० टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले आहे. त्याने पुढील अभ्यासक्रमासाठी अनंत शिवाजी देसाई टोपीवाला ज्यु. कौलेज मध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे.


**कुमारी त्रिगुणा विनायक देसाई (बोरिवली)**



कुमारी त्रिगुणा विनायक देसाई हिने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९१.६० टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिने अभ्यासा व्यतीरीक्त कथ्थक नृत्याचाही कोर्स पूर्ण केला आहे. तिने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. विनायक रोहित देसाई हे डॉक्टर असून तिची आई सौ. प्रिती विनायक देसाई ह्या Ycube Tech. मध्ये नोकरी करीत आहे.

**कुमार वरुण चंद्रशेखर प्रभू (विक्रोळी)**

कुमार वरूण चंद्रशेखर प्रभू ह्याने माध्यमिक शालान्त



प्रमाणापत्र परीक्षेत ९१.०० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन के केले आहे. त्याला इयत्ता ४थी व ८वी ची शिष्यवृत्ती मिळाली आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला असुन त्याचे वडील श्री. चंद्रशेखर मुरलीधर प्रभू हे व्यवसायीक असून त्याची आई सौ. निलीमा चंद्रशेखर प्रभू ह्या गृहिणी आहेत.

**कुमार सुजन केतन प्रभुखानोलकर (दाभोली)**



कुमार सुजन केतन प्रभुखानोलकर ह्याने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेत ९०.८० टक्के गुणासह उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याला शालेय जीवनात चौथी व आठवीत शिष्यवृत्ती मिळाली होती. त्याने संगीताच्या तिन परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. त्यानी पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. केतन द्वारकानाथ प्रभूखानोलकर हे व्यापारी असुन त्याची आई सौ. स्वप्नजा केतन प्रभूखानोलकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी चिन्मयी भूषण प्रभुदेसाई (रत्नागिरी)**




कुमारी चिन्मयी भूषण प्रभुदेसाई हिने शालांत परीक्षेत ९० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिने शालेय जीवनात चित्रकलेच्या एलिमेंटरी व इंटरमिजीएट ह्या परीक्षा 'ए' श्रेणीत उत्तीर्ण केल्या आहेत. तिने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. भूषण जगदिश प्रभुदेसाई हे तरुण भारत, रत्नागिरी येथे नोकरी करत असून तिची आई सौ.रुपाली भूषण प्रभुदेसाई ह्या एस.बी.आय. लाईफ ईन्शुरन्स, रत्नागिरी येथे विमा सल्लागार आहेत.

**कुमारी सायली शशिकांत तिरोडकर (कणकवली)**



कुमारी सायली शशिकांत तिरोडकर हिने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ८९.८० टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिने पुढील शिक्षणासाठी ११वी मध्ये प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. शशिकांत नारायण तिरोडकर हे शेतकरी असून तिची आई सौ.संगिता शशिकांत तिरोडकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमार संकेत विजय परुळेकर (डोंबिवली)**



कुमार संकेत विजय परुळेकर ह्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ८९.६० टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याने शालेय जीवनात वक्तृत्व स्पर्धेत विशेष यश संपादन केले असून त्यानी पुढील अभ्यासक्रमासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. विजय सुधाकर परुळेकर हे जनकल्याण सहकारी बँकेत नोकरी करीत असून त्याची आई सौ.संपदा विजय परुळेकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमार गौरांग प्रशांत सामंत (वसई)**



कुमार गौरांग प्रशांत सामंत ह्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ८९.२० टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी कॉम्प्युटर सायन्स मध्ये प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. प्रशांत प्रमोद सामंत ह्यांचा व्यवसाय असून त्याची आई सौ. प्राजक्ता प्रशांत सामंत ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी दिप्ती नागेश सामंत (कुडाळ)**




कुमारी दिप्ती नागेश सामंत हिने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ८९ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादक केले आहे. तिला शालेय जीवनात इयत्ता ४थी व ८वीची शिष्यवृत्ती व NMMS शिष्यवृत्ती ही मिळाली आहे. तिने पुढील शिक्षणासाठी कणकवलीच्या महाविद्यालयात प्रवेश घेतला असून तिची आई श्रीमती निता नागेश पाटील ह्या डॉ. वालावलकर क्लिनीक, कुडाळ येथे नोकरी करीत आहेत.

**कुमारी ऋतुजा हनुमंत पाटील (आदुर्ले)**

कुमारी ऋतुजा हनुमंत पाटील हिने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ८९ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिने शालेय जीवनात चित्रकलेच्या परीक्षा 'बी' व 'सी' श्रेणीत उत्तीर्ण केल्या असून पुढील शिक्षणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. हनुमंत पद्मनाभ पाटील हे शेतकरी असून तिची आई सौ. रश्मी हनुमंत पाटील ह्या गृहिणी आहेत.

**कुमार राहुल अरुण प्रभू (आंदुर्ले)**




कुमार राहुल अरुण प्रभू ह्याने शालांत परीक्षेत ८८.८० टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याला इयता ८ वीची शिष्यवृत्ती प्राप्त झाली होती. त्याने पुढील शिक्षणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. अरुण श्रीकृष्ण प्रभु हे शेतकरी असून त्याची आई सौ. अक्षता अरुण प्रभु ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी साक्षी शिरीष धामापुरकर (मिरज)**



कुमारी साक्षी शिरीष धामापुरकर हिने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ८८.८० टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिचे वडील श्री. शिरीष शशिकांत धामापुरकर हे मोहीते ॲण्ड सन्स मध्ये नोकरी करीत असुन तिची आई सौ. दीपा शिरीष धामापुरकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमार कौस्तुभ रविंद्र प्रभू (सावंतवाडी)**



कुमार कौस्तुभ रविंद्र प्रभू ह्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ८६.४० टक्के गुणासह उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. रविंद्र तुकाराम प्रभु हे नवनीत पब्लीकेशनचे निवृत्त विक्री अधिकारी असून त्याची आई सौ. संगीता रविन्द्र प्रभू ह्या स्नेह नागरी पत संस्था सावंतवाडी मध्ये व्यवस्थापिका पदावर कार्यरत आहेत.

**कुमार श्रीहन मनिष वालावलकर (गोरेगाव)**



कुमार श्रीहन मनिष वालावलकर ह्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ८६.३३ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याने सन २०१८-१९ या वर्षात शाळेत व शाळेबाहेर झालेल्या सर्व खेळ-स्पर्धात प्राविण्य मिळविले असून त्याला ह्या वर्षाचा सर्वोत्तम खेळाडू


म्हणून शाळेने गौरविले आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. मनिष शशिकांत वालावलकर हे एच.डी. एफ. सी बँकेत ज्येष्ठ व्यवस्थापक असून त्याची आई सौ. तेजश्री मनिष वालावलकर ह्या शिधावाटप निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत.

**कुमारी अनुष्का सुनील देसाई (सावंतवाडी)**




कुमारी अनुष्का सुनील देसाई हि शालांत परीक्षेत ८६.२० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. तिने इयत्ता ५ वी व ८ वी ची शिष्यवृत्ती मिळवली आहे. तिने संस्कृतच्या प्रज्ञा-संबोध आणि प्राविण्य ह्या परीक्षा ही उत्तीर्ण केल्या आहेत. तिने ब्रेन डेव्हलपमेंट आणि ऑलींपियाड ह्या परीक्षा ही पास केल्या असून पुढील शिक्षणासाठी तिने वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. सुनील जगन्नाथ देसाई हे सिंधुदूर्ग निर्सगोपचार केंद्र, सावंतवाडी येथे निर्सगोपचार तज्ञ म्हणून कार्यरत असून तिची आई सौ. अनिता सुनील देसाई ह्या जिल्हा रुग्णालय ओरस येथे अधिपरिचारिका आहेत.

**कुमार पार्थ पुरुषोत्तम मातोंडकर (कोल्हापूर)**



कुमार पार्थ पुरुषोत्तम मातोंडकर ह्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ८६ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपंदन केले आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. पुरुषोत्तम रामचंद्र मातोंडकर हे बँकेत नोकरी करीत असून त्याची आई सौ.प्रिया पुरुषोत्तम मातोंडकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमार प्रथमेश प्रविण परुळेकर (कसाल)**



कुमार प्रथमेश प्रविण परुळेकर ह्याने शालांत परीक्षेत ८२.८० टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याला इयत्ता ४थी ची शिष्यवृत्ती मिळाली होती. तो तबला वादनाची प्रवेशिका ही परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. प्रविण प्रभाकर परुळेकर ह्यांचे इलेक्ट्रीकचे दुकान असून त्याची आई सौ. प्राची प्रविण परुळेकर ह्या गृहिणी आहेत.

**कु. पवन उमेश प्रभू**

कु. पवन उमेश प्रभू हा एस. एल. देसाई विद्यालय पाट येथे इयत्ता सातवी मध्ये शिकत असून त्याने हार्मोनियम व गायन यांच्या प्रत्येक दोन-दोन परिक्षा दिल्या. तसेच २ जून २०१९ मध्ये झालेल्या श्री शंकरा दादर मुंबई या संस्थेने कोकणातील कलाकारांचे कौतुक करण्यासाठी त्यांना गायनाची संधी मिळावी म्हणून 'स्वरसिंधुरत्न' स्पर्धा आयोजीत केली. त्यात पवन प्रभू याने शालेय गटांतुन प्रथम क्रमांक मिळवुन 'स्वरसिंधुरत्न' पुरस्कराचा पहिला मानकरी ठरला. त्याला सिनेकलाकार शंतनु मोघे यांच्या हस्ते ट्रॉफी, सर्टिफिकेट व रोख रक्कम १०,०००/- देण्यात आले. या विजेत्यांचा कार्यक्रम १८ ऑगस्ट २०१९ रोजी शिवाजी मंदिर दादर येथे आयोजीत करण्यात आला.

पवन हा शाळेतील विविध कार्यक्रमांत भाग घेतो. तसेच विधि स्पर्धेमध्ये भाग घेतो.



*With Best Compliments From*

**UNIQUE**


**Unique Photo Offset Services**

**Ashok Nerkar**

132, Adhyaru Industrial Estate,
Sun Mill Compound, Lower Parel,
Mumbai 400 013.
☎ : 2496 4632, 2496 4633, 5660 6881
Fax : 5660 6882

## १२ वी (H.S.C.)

### कुमार सुमेध कौस्तुभ खानोलकर (दादर)



कुमार सुमेध कौस्तुभ खानोलकर ह्याने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान शाखेत ९४.६२ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. त्याला शालेय जीवनात इयत्ता ५वी व ८वीची शिष्यवृत्ती मिळाली होती. त्याने नॅशनल टॅलेन्ट सर्च परीक्षा व टाईम्स स्पार्क परीक्षेत ही शिष्यवृत्ती मिळवली आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी बॅचलर ऑफ सायन्स करण्यासाठी Emory University, Atlanta, G.A., U.S.A. येथे प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. कौस्तुभ आनंद खानोलकर हे Magesco येथे कार्यरत असून त्याची आई सौ. सुप्रिया कौस्तुभ खानोलकर ह्या चायनीज भाषा शिकवीतात.

### कुमारी ईशा देवेंद्र पाटील (पिंगुळी)



कुमारी ईशा देवेंद्र पाटील हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ९१.३८ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. तिने शालेय जीवनात इयत्ता ४ थी व ७ वी ची शिष्यवृत्ती, गायन व कथ्थक नृत्याच्या ३ परीक्षा उत्तीर्ण केल्या असुन तिला इयत्ता १०वीच्या परीक्षेत ९९.२० टक्के गुण मिळाले होते. तिचे वडील श्री. देवेंद्र शंकर पाटील हे भारतीय स्टेट बँकेत नोकरी करीत असून तिची आई सौ.दिप्ती देवेंद्र पाटील ह्या एल.आय.सी. मध्ये नोकरी करीत आहेत.

### कुमारी श्वेता सतीश सामंत (कणकवली)



कुमारी श्वेता सतीश सामंत हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ९०.६२ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तीने पुढील शिक्षणासाठी प्रथम वर्ष बी. कॉम मध्ये प्रवेश घेतला आहे. तीचे वडील श्री. सतीश कल्याण सामंत हे व्यावसायीक असून तीची आई सौ.स्नेहा सतीश सामंत ह्या शिक्षिका आहेत.

### कुमारी श्रीया प्रकाश सामंत (मळगांव)



कुमारी श्रीया प्रकाश सामंत हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ८९.५४ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. तिने अखिल भारतीय संस्कृत परीक्षा, संस्कृत संवाद परीक्षा व संस्कार परीक्षेत उत्तम यश संपादन केले आहे. तिने पुढील शिक्षणासाठी बी.कॉम ह्या अभ्यासक्रमात प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. प्रकाश एकनाथ सामंत हे शेतकरी असून तिची आई सौ. योजना प्रकाश सामंत ह्या गृहिणी आहेत.

### कुमारी प्रतिक्षा श्रीकांत परुळेकर (मिरा रोड)



कुमारी प्रतिक्षा श्रीकांत परुळेकर हिने उच्चमाध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ८९.२३ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. पुढील शिक्षणासाठी तिने बी.कॉम सह ICAI Institute of C.A. करण्यासाठी प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. श्रीकांत गजानन परुळेकर हे साई कन्स्ट्रक्शन मध्ये नोकरी करीत असून तिची आई सौ. चित्रा श्रीकांत परुळेकर ह्या गृहिणी आहेत.

### कुमारी वैदेही दिपक ठाकूर (पाट)



कुमारी वैदेही दिपक ठाकूर हिने उच्च माध्यमिक शालांत परीक्षा विज्ञान शाखेत ८८.९२ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिने शालेय जीवनात शिष्यवृत्ती परीक्षा, एम.टी. एस. परीक्षा तसेच इतिहास प्रज्ञा शोध परीक्षेत ही उत्तम यश संपादन केले होते. तिला शालांत परीक्षेत ही ९८ टक्के गुण मिळालेले असून तिला सी.ई.टी. परीक्षेत ९९.७५ टक्के गुण मिळाले आहेत. तिने पुढील अभ्यासक्रमात बी. फॉर्म करण्यासाठी फॉर्मसी विद्यालयात प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. दिपक बाळकृष्ण ठाकूर हे डॉक्टर असून तिची आई सौ. किर्ती दिपक ठाकूर ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी मनस्वी महेश सामंत (गोरेगाव)**




कुमारी मनस्वी महेश सामंत हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ८७.५४ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिने पुढील शिक्षणासाठी प्रथम वर्ष बी.कॉम. मध्ये प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. महेश रमाकांत सामंत हे शिंडलर्स इंडिया, पवई येथे नोकरी करीत असून तिची आई सौ. मनिषा महेश सामंत ह्या गृहिणी आहेत.

**कुमार शिवम जनार्दन ठाकूर (पाट)**




कुमार शिवम जनार्दन ठाकूर ह्याने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान शाखेत ८६.७७ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याने शालेय जीवनात चित्रकलेच्या एलिमेंटर व इंटरमिजीएट परीक्षा उत्तीण केल्या आहेत. त्याने पुढील शिक्षणासाठी मॅकेनिकल इंजिनिअरींग मध्ये प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. जनार्दन वसंत ठाकूर हे शेतकरी असून त्याची आई सौ. नीला जर्नादन ठाकूर ह्या गृहिणी आहेत.

**कुमार ओंकार दत्ताराम तेंडोलकर (कुडाळ)**



कुमार ओंकार दत्ताराम तेंडोलकर ह्याने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान शाखेत ८६.३१ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी बी.एस्सी करण्याचे ठरविले आहे. त्याचे वडील श्री. दत्ताराम परशुराम तेंडोलकर हे कुडाळ डेपो मध्ये लिपीक पदावर कार्यरत असून त्याची आई सौ. दर्शना दत्ताराम तेंडोलकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमार मधुसुदन आनंद नाईक**



कुमार मधुसुदन आनंद नाईक ह्याने उच्च माध्यमिक प्रमाण पत्र परीक्षा विज्ञान शाखेत ८४.६२ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याला इयत्ता १०वी च्या परिक्षेत सुद्धा ९०.८० टक्के गुण मिळाले होते.

**कुमारी रजुता संजय सामंत (गोरेगाव)**



कुमारी रुजुता संजय सामंत हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा कला शाखेत ८२.३१ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिने पुढील शिक्षणासाठी प्रथम वर्ष कला शाखेत प्रवेश घेतला आहे. तिची आई श्रीमती श्यामला संजय सामंत ह्या गृहिणी आहेत.

**कुमार चिन्मय सूर्यकांत नाईक (म्हापण)**



कुमार चिन्मय सूर्यकांत नाईक ह्याने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान शाखेत ८१.६९ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. पुढील अभ्यास-क्रमासाठी त्याने बी.ई. मेकॅनिकल मध्ये प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. सूर्यकांत लक्ष्मण नाईक हे नोकरी करीत असून त्याची आई सौ. सुमेया सूर्यकांत नाईक ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी धनश्री शिरीश धामापुरकर (मिरज)**



मिरजेतील कन्या महाविद्यालयात शिकणारी कु. धनश्री शिरीष धामापूरकर हिने उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रु. २०१९ मध्ये घेतलेल्या १२वीच्या परीक्षेत ८१.२३ टक्के गुण मिळवले आहेत. दहावीत ही तिला ९०% गुण मिळाले होते व तिने विद्यामंदीर प्रशाला मिरज येथे २ रा क्रमांक पटकावला होता. कन्या महाविद्यालय मिरज येथून सामान्य परिस्थितीतून तिने हे यश मिळवले आहे. वैद्यकिय किंवा फार्मसीचे उच्च शिक्षण घेण्याचा तिचा मनोदय आहे. तिचे वडील श्री. शिरीष श. धामापूकर हे नोकरदार असून तिची आई सौ. दिपाश्री शि. धामापुरकर ही गृहीणी आहे.

**कुमारी सिद्धी सूर्यकांत प्रभुदेसाई (भुदरगड)**



कुमारी सिद्धी सूर्यकांत प्रभुदेसाई हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ८०.४६ टक्के गुण मिळवत प्रशंसनीय यश संपादन केले आहे. तिने पुढील अभ्यासक्रमासाठी बी.कॉम मध्ये प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. सूर्यकांत गणेश प्रभुदेसाई हे एम.आय.डी.सी. कागल येथे नोकरी करीत असून तिची आई सौ. स्नेहा सूर्यकांत प्रभुदेसाई ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी मनाली संतोष रामदास (डोंबिवली)**



कुमारी मनाली संतोष रामदास हिने बारावी विज्ञान शाखेत ८०.९२ टक्के गुण मिळवले आहेत. त्यासोबतच MHT-CET परीक्षेत ९९.१६ (PCM) व (PCB) ९८.३१ पर्सेंटाईल मिळाले आहेत. तिला इयत्ता ४थी व ७वी ची शिष्यवृत्ती मिळाली असून तिने शास्त्रीय संगीताच्या चार परीक्षा ही दिल्या आहेत. तिने सुगम संगीताच्या सर्व परीक्षा दिलेल्या असून 'संगीत रत्न' ही पदवी विशेष प्राविण्यासह मिळवली आहे. पुढील शिक्षणासाठी तीला केमिकल इंजिनीअरींग करण्याची इच्छा आहे. तिचे वडील श्री. संतोष वसंत रामदास ह्यांचा स्वत:चा व्यवसाय असून तिची आई सौ. श्रृती संतोष रामदास ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी महेश्वरी दत्तात्रेय माईणकर (कणकवली)**



कुमारी महेश्वरी दत्तात्रेय माईणकर हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ८०.१५ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिने पुढील शिक्षणासाठी बी.कॉम. मध्ये प्रवेश घेतला आहे. तिची आई श्रीमती मंजिरी दत्तात्रेय माईणकर ह्या तहसीलदार कार्यालय, कणकवली येथे तलाठी म्हणून कार्यरत आहेत.

**कुमार महेंद्र दत्तात्रेय माईणकर (कणकवली)**



कुमार महेंद्र दत्तात्रेय माईणकर ह्याने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान शाखेत ७८.९२ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी प्रथम वर्ष बी.एस्सी. मध्ये प्रवेश घेतला आहे. त्याची आई श्रीमती मंजिरी दत्तात्रेय माईणकर ह्या तहसीलदार कार्यालय कणकवली येथे तलाठी म्हणून कार्यरत आहेत.

**कुमारी मृगया महेंद्र सामंत (आंबेरी)**

कुमारी मृगया महेंद्र सामंत हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ७६.३१ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिने पुढील शिक्षणासाठी प्रथम वर्ष बी.कॉम. मध्ये प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. महेंद्र पांडुरंग सामंत हे शेतकरी असून तीची आई सौ. मिनल महेंद्र सामंत ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी सोनाली चिदांबर प्रभु (खानोली)**



कुमारी सोनाली चिदांबर प्रभू हिने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ७५.३८ टक्के गुण मिळवत स्पृहणीय यश संपादन केले आहे. तिने पुढील अभ्यासक्रमासाठी बी. कॉम करण्याचे ठरविले आहे. तिचे वडील श्री. चिदांबर रामचंद्र प्रभु हे शेतकरी असून तिची आई सौ. रुपा चिदांबर प्रभु ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी विशाखा शेखर पोतदार (कडगांव)**



कडगांव ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील कु. विशाखा शेखर पोतदार या ग्रामीण भागातील विद्यार्थीनीने अशंत: अंधत्वावर मात करून इ. १२ वी कला शाखेत कडगांव हायस्कूल व श्री समर्थ क.महा. विद्यालय कडगांव या विद्यालयातून ७५% गुण प्राप्त करून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावत तिने इतर विद्यार्थ्यांच्या समोर एक आदर्श निर्माण केला आहे.

अगदी लहान पणापासून अशंत: अंध असलेल्या विशाखास तिच्या सर्वसामान्य कुटुंबातील आई/वडीलांनी मेहनत करून मार्गदर्शन केले. तिनेही आपल्या जिद्दीच्या जोरावर हे यश प्राप्त केले व आपण पुढील शिक्षण कमला कॉलेज कोल्हापूर मधून घेणार असून भविष्यात स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अधिकारी होण्याची इच्छा तिने व्यक्त केली आहे.

**कुमार गंगाराम अच्युत प्रभुराळकर (सावंतवाडी)**




कुमार गंगाराम अच्युत प्रभुराळकर ह्याने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ७२ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याने शालेय जीवनात राष्ट्रभाषा सुबोध परीक्षा प्रथम श्रेणी, हार्मोनियम वादन द्वितीय श्रेणी व चित्रकलेची परीक्षा सी श्रेणीत उत्तीर्ण केली आहे. त्याने पुढील शिक्षणासाठी बी.कॉम च्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. अच्युत गंगाराम प्रभुराळकर हे शेतकरी असून त्याची आई सौ. अपर्णा अच्युत प्रभुराळकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी सरस्वती बाळकृष्ण गवाणकर (तिरोडा)**

कुमारी सरस्वती बाळकृष्ण गवाणकर हीने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ७१.५४ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिला शालेय जीवनात खेळाची तसेच गायनाची आवड होती. तिचे वडील श्री. बाळकृष्ण रा. गवाणकर हे शेतकरी असून तिची आई. सौ. लक्ष्मी बाळकृष्ण गवाणकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमार अनंत शांताराम सामंत (मालवण)**



कुमार अनंत शांताराम सामंत ह्याने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वाणिज्य शाखेत ६९.८५ टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले आहे. त्याला सन २०१७-१८ सालचा प्रा. न.ल. मिठबांवकर ''आदर्श विद्यार्थी पुरस्काराने'' सन्मानीत करण्यात आले होते. त्याने पुढील अभ्यासक्रमासाठी बी.कॉम. ला प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री.शांताराम अनंत सामंत हे मालवण आगरात एस्.टी. वाहक असून त्याची आई सौ. सुलभा शांताराम सामंत ह्या गृहिणी आहेत.

## अन्य यशस्वी विद्यार्थी

**कुमारी अर्पिता अमेय सामंत (परुळे)**




कुमारी अर्पिता अमेय सामंत हिने पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ७५ टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले आहे. तिने इयता २री मध्ये महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत सिंधुदूर्ग जिल्ह्यात प्रथम क्रमांक, इयत्ता ३री मध्ये Brain Development Scholarship मध्ये रौप्यपदक व इयत्ता ५वी मध्ये गणिताची प्राविण्य परीक्षा उत्तीर्ण केली आहे. तिचे वडील श्री. अमेय रामकृष्ण सामंत हे शिक्षक असून तिची आई सौ. प्रजक्ता रामकृष्ण सामंत ह्या गृहिणी आहेत.

**कुमार सर्वेश प्रकाश परुळेकर (इळये)**



कुमार सर्वेश प्रकाश परुळेकर याने पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ७३ टक्के गुण मिळवत यश संपादन केले आहे. त्याने शालेय जीवनात गणिताच्या सुबोध व प्राविण्य परीक्षा उत्तीर्ण केल्या असून प्रज्ञापरीक्षेसाठी त्याची निवड झाली आहे. त्याचे वडील श्री. प्रकाश राजाराम परुळेकर हे शेतकरी असून त्याची आई सौ. प्राजक्ता प्रकाश परुळेकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमार वरद राजेश ठाकूर (वेताळबांबर्डे)**




कुमार वरद राजेश ठाकूर ह्याने पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ७०.२७ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याने शालेय जीवनात ३री MTS (मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत) केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याचे वडील श्री. राजेश मोहन ठाकूर हे प्राथमिक शिक्षक असून त्याची आई सौ. रश्मी राजेश ठाकूर ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी ऋतुजा अमित ठाकूर (अर्नाळा)**



कुमारी ऋतुजा अमित ठाकूर हिने पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ५ वीत १६४ गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिने हिंदी राष्ट्रभाषा, इंग्रजी ज्ञानपीठ व गणिताच्या ज्ञानपीठ परीक्षेत महाराष्ट्रातून २ ऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे.

**कुमार पार्थ शंतनु तेंडुलकर (सावंतवाडी)**




कुमार पार्थ शंतनु तेंडुलकर ह्याने पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८वी) ८६.११ टक्के गुण मिळवत उत्तीर्ण केली आहे. तो इयत्ता ४ थीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवंत्ता यादित आठवा आला होता. इयत्ता ५ वी मध्ये गणिताच्या प्रज्ञा परिक्षेत त्याला सुवर्ण पदक मिळाले होते तर इयत्ता ८वी मध्ये तो प्रज्ञा धारक ठरला आहे. त्याचे वडील डॉ. श्री. शंतनु तेंडुलकर हे मधुमेह व हृदय रोग तज्ञ असून त्याची आई सौ. मानसी शंतनू तेंडुलकर ह्या गृहिणी आहेत.

**कुमारी अखिला नंदकिशोर प्रभूकेळूसकर (कांदिवली)**



कुमारी अखिल नंदकिशोर प्रभूकेळूसकर हि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इयत्ता ८वी) ८१.८१ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. तिचे वडील श्री. नंदकिशोर वा. प्रभुकेळूसकर हे नोकरी करीत असून तिची आई सौ. योगिता नंदकिशोर प्रभुकेळूसकर ह्या गृहिणी आहेत.

### कुमार रवीन्द्र दत्तप्रसाद पाटकर (मालवण)



कुमार रवीन्द्र दत्तप्रसाद पाटकर ह्याने पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ८०.५५ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याने गणिताच्या संबोध आणि प्राविण्य परीक्षा उत्तीर्ण केल्या असून प्रज्ञा परीक्षेसाठी त्याची निवड झाली आहे. त्याने चित्रकलेची एलिमेंटरी परीक्षा उत्तीर्ण केली असून त्याने जिल्हा व तालुका स्तरावर गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याचे वडील श्री. दत्तप्रसाद रवीन्द्र पाटकर हे मालवण नगर परिषदेत नोकरी करीत असून त्याची आई सौ. पूजा दत्तप्रसाद पाटकर ह्या गृहिणी आहेत.

### कुमारी सायली हेमंत खानोलकर (बोरीवली)



कुमारी सायली हेमंत खानोलकर हिने पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ७९ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिने इयत्ता ४ थीची शिष्यवृत्ती परीक्षा व इयत्ता ५वी व ८वीत गणिताच्या प्राविण्य परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. तिचे वडील श्री. हेमंत माधव खानोलकर हे रसायन शास्त्राचे प्राध्यापक असून तिची आई सौ. वैशाली हेमंत खानोलकर ह्या स्टेट बँकेत नोकरी करीत आहेत.

### कुमारी श्रीया प्रकाश परुळेकर



कुमारी श्रीया प्रकाश परुळेकर हिने पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ६७ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिचे वडील श्री. प्रकाश राजाराम परुळेकर हे शेतकरी असून तिची आई सौ. प्राजक्ता प्रकाश परुळेकर ह्या गृहिणी आहेत.

### कुमारी दिक्षा गणेश परुळेकर (टिळकनगर)



कुमारी दिक्षा गणेश परुळेकर हिने पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ६४ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिला इयत्ता ४थी ची शिष्यवृत्ती मिळाली असून तिने अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या कथ्थक नृत्याची तिसरी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. तीचे वडील श्री. गणेश परुळेकर हे सारस्वत बँकेत नोकरी करीत असून तिची आई सौ. पल्लवी गणेश परुळेकर ह्या गृहिणी आहेत.

### कुमार राजाराम विनोद वालावलकर (सावंतवाडी)



कुमार राजाराम विनोद वालावलकर ह्याने मुंबई विद्यापीठाच्या बी.एस.सी. स्टॅस्टेस्टीक परीक्षेत ९.७३ % गुण मिळवीले आहेत. त्याचा S.Y. व T.Y. ला रुपालेल महाविद्यालयात प्रथम क्रमांक आला होता. त्यला गोवा येथे झालेल्या टेबलटेनिस स्पर्धेत सुवर्ण पदक मिळाले होते. त्यानी पुढील अभ्यासक्रमासाठी एम.एस.सी. स्टॅस्टेस्टीकसाठी प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. विनोद पांडुरंग वालावलकर हे सावंतवाडी आगारात वाहतूक निरिक्षक असून त्याची आई सौ. विद्या विनोद वालावलकर ह्या प्राथमिक शिक्षिका आहेत.



### कुमारी वैभवी अनंत सामंत (विरार)

कुमारी वैभवी अनंत सामंत हिने मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष बी.एसूसी परीक्षेत ९.५ टक्के परसेंटाईल मार्क मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिने महाविद्यालयीन जीवनात ग्रॅव्हीटी क्वीझ २०१९ मध्ये प्रथम क्रमांक प्लॅनेट क्वीझ २०१९ मध्ये द्वितीय क्रमांक, सातरंग पोईट्री मध्ये द्वितीय क्रमांक, प्लॅनेट पोईट्री मध्ये प्रथम क्रमांक, पटकवला असून अंतर महाविद्यालयीन चॅम्पीयन स्पर्धेत प्रथम क्रमांक व ती कॉलेज क्रॉऊन २०१९ वीनर आहे. तिने पुढील शिक्षणासाठी एम.एस्.सी. (ऑर्गेनेक केमीस्ट्री) मध्ये प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. अनंत शिवराम सामंत हे वी. वा. महाविद्यालयात नोकरी करीत असून तिची आई सौ. अमिता अनंत सामंत ह्या गृहिणी आहेत.

### कुमार दर्शन भालचंद्र प्रभूखानोलकर (सावंतवाडी)



कुमार दर्शन भालचंद्र प्रभूखानोलकर ह्याला मुंबई विद्यापीठाच्या बी.कॉम पदवी परीक्षेत ७९.२८ टक्के गुण मिळाले आहेत. त्याचा पंचम खेमराज महाविद्यालयात प्रथम क्रमांक आला आहे. पुढील शिक्षणासाठी त्याने एम.कॉम.साठी प्रवेश घेतला असून तो CA चार्टड अकौंटंन्टचा ही अभ्यास करीत आहे. त्याचे वडील श्री. भालचंद्र कृ. प्रभूखानोलकर हे ऑडीटर असून त्याची आई सौ.अद्विता भालचंद्र प्रभूखानोलकर

### कुमारी विनिता विजय वालावलकर (कुडाळ)



कुमारी विनिता विजय वालावलकर हिने मुंबई विद्यापीठाच्या तृतिय वर्ष बी.एस.सी. परीक्षेत ९०.७५ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले असून तिची महाविद्यालयीन जीवनात NIVS Physics NGPE साठी निवड, तसेच परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण! तिने पुढील शिक्षणासाठी फीजीक्स विषयात एम्.एससी. करण्यासाठी प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. विजय यशवंत वालावलकर हे महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळ मध्ये नोकरी करीत असून तिची आई सौ. साधना विजय वालावलकर ह्या आयुर्वेदिक महाविद्यालय, सावंतवाडी येथे नोकरी करीत आहेत.

### कुमारी प्राची प्रताप पाटकर (मालवण)



कुमारी प्राची प्रताप पाटकर हीने मुंबई विद्यापिठाच्या तृतिय वर्ष बी.एसूसी. मॅथेमॅटीक्स ह्या विषयात ७५.७५ टक्के गुणासह उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिचे वडील श्री. प्रताप रामचंद्र पाटकर हे सेवानिवृत्त असून तिची आई सौ.प्रज्ञा प्रताप पाटकर ह्या गृहिणी आहेत.

### कु. निकिता उर्फ सुलोचना अनिल प्रभु (तेंडोली)



कु. निकिता उर्फ सुलोचना अनिल प्रभु हिने बी.एस्सी पदवी परीक्षा (भौतिकशास्त्र), मे २०१९ साली श्री. पंचम खेमराज महाविद्यालय सावंतवाडी येथे अंतिम सहाव्या सेमिसस्टरमध्ये ८०० कैकी ६०९ गुण म्हणजे ७६.१२ टक्के गुण मिळवून स्पृहणिय यश संपादन केले आहे. एम. एस. सी. इलेक्ट्रॉनिक्ससाठी तिने आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालय (स्वायत्त) देवरुख, रत्नागिरी येथे प्रवेश घेतला आहे. अभ्यासाव्यतिरिक्त तिने कथ्थक नृत्य, गायन, अभिनय इत्यादी कलांमध्ये विशेष नैपुण्य मिळवले आहे.

### कुमार श्रीधर उमेश पाटील (मुलुंड)



कुमार श्रीधर उमेश पाटील ह्याने मुंबई विद्यापीठाच्या बी. कॉम (वाणिज्य पदवीका) ह्या परीक्षेत ७५.३३ टक्के गुण मिळवत यश संपादन केले मुंबई विद्यापीठ आयोजीत आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत कास्य पदक व करंड पटकावला असून ४ × १०० रिले स्पर्धेत सुर्वण पदक, लांब उडीत सुर्वण पदक, ३०० मीटर धावणे स्पर्धेत सुर्वण पदक, २०० मिटर व ४०० मिटर धावणे रौप्य पदक, १५०० मिटर धावण्याच्या स्पर्धेत कास्य पदक मिळविले आहे. त्याला २०१८-१९ चा सर्वोत्तम धावपटू म्हणून करंडक ही मिळाला आहे. पुढील अभ्यासक्रमात त्याने सी.ए. करण्यासाठी प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. उमेश पंढरीनाथ पाटील हे महानगर पालिकेत अपअधीक्षक म्हणून नोकरी करीत असून त्याची आई सौ. उर्मिला उमेश पाटील ह्या बँक ऑफ बरोडा मध्ये नोकरी करीत आहेत.

### कुमारी यशश्री हनुमंत खानोलकर (कुडाळ)



कुमारी यशश्री हनुमंत खानोलकर हिने मुंबई विद्यापीठाची बी.एस्.सी. कॉम्प्युटर सायन्स ही परीक्षा ७.५५ पाईन्टर गणासह उत्तीर्ण केली आहे. तिचा मुंबई युनिवर्सिटी युवा मोहोत्सव मधे फोटो ग्राफी व गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक आला आहे. तिने पुढील शिक्षणासाठी एम्.एस.सी. माहिती व तंत्रज्ञान ह्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. हनुमंत मधुकर खानोलकर हे शेतकरी असून तिची आई सौ. राखी हनुमंत खानोलकर ह्या गृहिणी आहेत.

### कु. कैवल्य उमाकांत महाजन (अर्नाळा)



कुमार कैवल्य उमाकांत महाजन ह्याने मुंबई विद्यापीठाच्या बी. कॉम अकांट आणि फायनान्स ह्या स्पेशलायजेशनसह वाणिज्य पदविका ७०.७५ टक्के गुणासह उत्तीर्ण केली आहे. त्याची एच.डी.एफ.सी. बँकेत शेअर गुंतवणूक व म्यॅच्युअल फंडासाठी नेमणुक झाली आहे. त्याचे वडील श्री.उमाकांत गणपत महाजन व आई सौ.शलाका उमाकांत महाजन हे सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी आहेत. त्याचेवडील ज्ञाती कार्यकर्ते असून गौड ब्राह्मण सभेचे कार्याध्यक्ष व ''गौड ब्राह्मण'' ह्या ज्ञातीच्या मुखपत्राचे संपादक आहेत.

### कुमारी अनुजा दत्तात्रय तेंडुलकर (कांदिवली)



कुमारी अनुजा दत्तात्रय तेंडुलकर हिने मुंबई विद्यापिठाच्या बी.एस.सी. आयटी परीक्षेत ६७.८८ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. तिने पुढील शिक्षणासाठी MCA Master of Computer Application साठी प्रवेश घेतला आहे. तिचे वडील श्री. दत्तात्रय जगन्नाथ तेंडुलकर हे मुंबई पोर्ट ट्रस्ट मध्ये नोकरी करीत असून तीची आई सौ. दिक्षा दत्तात्रय तेंडुलकर ह्या वर्तक महाविद्यालय, वसई येथे प्राध्यापिका आहेत.

### कुमारी अक्षता प्रकाश ठाकुर (डोंबिवली)



कुमारी अक्षता प्रकाश ठाकूर हिने मुंबई विद्यापीठाच्या एम.ए.ई.एम.ए. ही परीक्षा ६० टक्के गुणाने उत्तीर्ण केली असून तिचे वडील श्री. प्रकाश श. ठाकूर हे बी.ए.आर.सी. मध्ये नोकरी करीत असून तिची आई सौ. प्रिती प्रकाश ठाकूर ह्या टी.एम.टी. मध्ये नोकरी करीत आहेत.

### कुमारी ऐश्वर्या गजानन खानोलकर (विरार)

कुमारी ऐश्वर्या गजानन खानोलकर हिने मुंबई विद्यापीठाच्या एम.ए. ही परीक्षा कम्युनिकेशन आणि जर्नलीझम ह्या विषयासह ८.६२ पाईंटरने उत्तीर्ण केली आहे. तिला वकृत्व स्पर्धेत जिल्हास्तरीय पारितोषिक व नृत्य स्पर्धेत राज्यस्तरिय पारितोषिक मिळाले आहे. तिने मुंबई विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावला आहे. सध्या ती Zee Marathi ह्या वाहिनीवर कार्यरत असून तिला पुढे Mass Communication मध्ये Ph.D. करायची आहे. तिचे वडील श्री. गजानन रामचंद्र खानोलकर हे वरिष्ठ आरोग्य विस्तार अधिकारी आहेत व तिची आई सौ. चित्रा गजानन खानोलकर ह्या प्रिंसीपाल आहेत.

### कुमारी रश्मी रविंद्रनाथ देसाई (कुडाळ)




कुमारी रश्मी रविंद्रनाथ देसाई हिने औषधनिर्माणाास्त्र पदवी परीक्षेत ७३.१४ टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले आहे. तिने पदवी अभ्यासक्रमासोबतच गायन प्रश्न मंजुषा, वादविवाद स्पर्धामध्ये प्राविण्य मिळविले आहे. तिचे वडील श्री. रविंद्रनाथ दिंगबर देसाई हे सेवानिवृत्त असून तीची आई सौ. राजश्री रविंद्रनाथ देसाई ह्या गृहिणी आहेत.

### कुमारी प्रतिक्षा परेश तेंडुलकर (मुंबई)



कुमारी प्रतिक्षा परेश तेंडुलकर हिने मुंबई विद्यापीठाच्या एम कॉम परीक्षेत ७६ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिचे वडील श्री. परेश भास्कर तेंडूलकर हे कोटक महिद्रा बँकेत नोकरी करीत असून तिची आई सौ.प्रज्ञा परेश तेंडुलकर ह्या गृहिणी आहेत.

### कुमार प्रणव अभिजीत सामंत (विले पार्ले)




कुमार प्रणव अभिजीत सामंत ह्याने डीप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनीअरींग मध्ये ९३-९३ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. त्याचा जिल्हा स्तरीय फुटबॉल स्पर्धेत द्वितीय क्रमांक आला असून त्याने पुढील शिक्षणासाठी इलक्ट्रीकल इंजिनीयरींगची पदविका संपादन करण्यासाठी प्रवेश घेतला आहे. त्याचे वडील श्री. अभिजीत सामंत हे व्यवसायीक असून त्याची आई डॉ. सौ. योगिता अभिजीत सामंत ह्या होमियो पॅथीक डॉक्टर आहेत.

### कुमार उत्सव केतन प्रभूखानोलकर (दाभोली)



कुमार उत्सव केतन प्रभूखानोलकर ह्याने डिप्लोमा इंजिनिअरींगमध्ये इलेक्ट्रॉनिक्स शाखेतून ७२.७६ टक्के गुणासह उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तसेच त्याने तबला वादनाच्या तिन परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. पुढील शिक्षणासाठी त्याने डीग्री कॉलेज मध्ये प्रेवश घेतला आहे. त्याचे वडील श्री. केतन द्वारकानाथ प्रभू खानोलकर हे व्यापारी असून त्याची आई सौ. स्वप्नजा केतन प्रभू खानोलकर ह्या गृहिणी आहेत.

### कुमार उपेंद्र संजय दाभोलकर (डोंबिवली)



कुमार उपेंद्र संजय दाभोलकर ह्यानी मुंबई विद्यापीठातून केमिकल इंजिनिअरींग ही परीक्षा ८.५४ टक्के पॉईन्टर सह उत्तीर्ण केली आहे. त्याचे वडील श्री. संजय त्रिंबक दाभोलकर हे भारत गिअर्स लिमिटेड मध्ये नोकरी करीत असून त्याची आई सौ. सुमन संजय दाभोलकर ह्या गृहिणी आहेत.

# श्रद्धांजली

गौड ब्राह्मण ज्ञातीतील खालील महनीय व्यक्तींचे दु:खद निधन झाले आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल गौड ब्राह्मण सभेला अतीव दु:ख होत आहे. गौड ब्राह्मण सभा त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो हीच प्रार्थना !

**अनिल ग. सामंत**



डोंबिवली येथील आपले ज्ञातीबांधव शिवराम उर्फ अनिल गजानन सामंत यांचे दीर्घ आजारपणाने निधन झाले.

१ जानेवारी १९५५ रोजी यांचा मुंबई येथे जन्म झाला. अनिल यांचे मूळ गाव मांजर्डे वाडी, परुळे हे होते.

त्यांचे शालेय शिक्षण चिकित्सक विद्यालय गिरगाव येथे झाले व महाविद्यालयीन शिक्षण भवन्स कॉलेज, गिरगाव येथे झाले. यानंतर त्यांनी पुढिल ४० वर्षे आपल्या भावांसोबत मेसर्स गजानन आप्पाजी सामंत आणि कंपनी ही पेढी चालवली.

त्यांना संगीत व धार्मिक कार्याची आवड होती. १९७८ नंतर ते डोंबिवली, रामनगर येथे वास्तव्यास आले. २००९ मध्ये त्यांना MND नावाचा असाध्य आजार झाला. पुढील दहा वर्षे त्यांनी हसतमुखाने आजाराशी लढा दिला परंतु दिनांक ३० मे २०१९ रोजी डोंबिवली येथे त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांचे सहयोगशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते.

त्यांच्या पश्चात पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे.


**श्रीमती स्मिता किशोर महाजन**



श्रीमती स्मिता किशोर महाजन यांचे दिनांक ३० जून २०१९ रोजी ठाणे येथे त्यांच्या राहत्या घरी दु:खद निधन झाले. श्रीमती महाजन या पूर्वाश्रमीच्या सुधा सामंत, गिरगावातील मातृमंदिर हॉटेलच्या वामनराव सामंतांची कन्या. त्यांचे पती श्री. किशोर बळवंत महाजन हे ठाण्यातील प्रसिद्ध डॉक्टर त्यांचेही अलिकडेच निधन झाले. कै. डॉ. महाजनांच्या बरोबरीने सामाजिक कामात त्यांचा नेहमीच सहभाग असे. ठाण्यातील कुडाळदेशकर गौडब्राह्मण ज्ञातीच्या नोंदणीकृत महिला मंडळाच्या त्या प्रमुख पदाधिकाऱ्यांपैकी एक होत्या. ठाण्यासह गिरगांवातील आपल्या सर्व मध्यवर्ती ज्ञाती संस्थांबद्दल त्यांना विशेष आस्था होती. विद्यावृद्धी समाज, निराश्रित सहाय्यकारी फंड या संस्थांना त्यांनी कै. महाजनांच्या बरोबरीने स्वत:ही लाखो रुपयाच्या देणग्या दिल्या होत्या व आपल्या मुलांनाही त्या संस्थाना मदत करण्यासाठी प्रवृत्त केले होते.

---

**श्री. यशवंत सदाशिव सामंत (कोसबाड)**



**निर्मळ प्रेमाचा जिवन्त झरा**

मंगळवार दि. २ जुलै रोजी कोसबाड ता. मनोरमध्ये रहाणार व पंचक्रोशीत भाईशेठ म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या श्री. यशवंत सदाशिव सामंत यांना देवाज्ञा झाली. श्री.यशवंत सामंत हे कोसबाडच्या सुप्रसिद्ध आक्का (पार्वती सदाशिव सामंत) यांचे थोरले चिरंजीव आक्कांचा प्रेमाचा, कर्तव्यपूर्ततेचा आणि दानाचा वारसा त्यानी अव्याहत पुढे चालवला. त्यात त्यांना त्यांच्या पत्नीची योग्य साथ लाभली. वयाच्या ८६ व्या वर्षीही गायी-म्हशीची देखभाल, दुधदुभते पहाणे, आसपासच्या परिसरातील गावकऱ्यांना शेतीभातीच्या कामात मार्गदर्शन करणे हा त्यांचा दिनक्रम होता. कोसबाड या आडगावी रहात असूनसुद्धा ठाणे, मुंबई, विरार, वसई परिसरातील आपल्या सर्व आप्तेष्टांच्या, मित्रपरिवाराच्या सर्व शुभकार्याना ते न चुकता हजर रहात. कोणाच्याही सुख दु:खात निस्वार्थ वृत्तीने समरस होण्याच्या त्यांच्या वृतीमुळे ते लहानथोर सर्वांनाच अत्यंत प्रिय होते. २ जुलै रोजीही आपले नित्याचे म्हशीचे दूध काढण्याचे काम करून ते घराच्या ओटीवर येऊन बसले होते. गावातील एक दोन गडी त्यांचा पेरणी-लावणी संदर्भात सल्ला घेत असतानाच हृदयाच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाले. कर्मयोग्याचे आयुष्य जगणाऱ्यांनाच असा मृत्यु येण्याचे भाग्य लाभते: त्यांच्या मागे त्यांची पत्नी, मोठी मुलगी-जावई, दोन मुलगे-सुना व नातवंडे असा परिवार आहे.

**श्री. विद्याधर वासुदेव सामंत**



श्री. विद्याधर वासुदेव सामंत (मुख्य कार्यकारी अधिकारी अंबरनाथ जयहिंद सहकारी बँक) यांचे दिनांक ९ जुलै २०१९ रोजी डोंबिवली येथे वयाच्या ५४ व्या वर्षी अकस्मात निधन झाले. श्री. विद्याधर सामंत यांना सन २०१७ साली उत्कृष्ठ मुख्याधिकारी-सहकारी बँक हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आले होते. श्री. विद्याधर सामंत यांना हा पुरस्कार महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा. पृथ्वीराज चव्हाण आणि लोकसत्ताचे संपादक मा. गिरीश कुबेर यांच्या हस्ते देण्यात आला होता. श्री. सामंत हे मुळचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील परुळे-दुतोंड या गांवचे. कोकणात आपले पदवी पर्यंतचे शिक्षणपूर्ण करून ते इतराप्रमाणे नोकरीधंद्यासाठी डोंबिवलीत आपल्या काकांकडे आले. अंबरनाथ जयहिंद सहकारी बँकेत आपल्या करियरची सुरुवात केल्या नंतर आपल्या ज्ञातीतील मुलांना सर्वतोपरी मदत करण्याचा जणू वसाच त्यांनी घेतला होता. आपण ही प्रेरणा कै. बाबल देसाई व माननीय राजाभाऊ पाटकर यांच्याकडून घेतली असे ते नेहमी अभिमानाने सांगत असत. श्री. विद्याधर सामंत हे कार्टुन क्षेत्रातील भिष्माचार्य मा. व्ही. जी. सामंत यांचे पुतेणे होत. ते सुरुवातीपासूनच कुडाळदेशकर सहयोग या डोंबिवलीतील ज्ञाती संस्थेचे निष्ठावान कार्यकर्ते/ पदाधिकारी होते. सद्या ते सहयोगचे विश्वस्त होते. अलिकडेचे संपन्न झालेल्या विद्यावृद्धी समाजाच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी कार्यक्रमाच्या निमित्ताने संगठीत करण्यात आलेल्या निधीसंकलन समितीचे ते डोंबिवलीतून सदस्य होते.

## हार्दिक अभिनंदन !

**कुमारी तज्ञा संतोष देसाई (डोंबिवली)**

कुमारी तज्ञा संतोष देसाई हिने बॅचलर ऑफ होमीयो पॅथस B.H.M.S. ही पदवी ५७ टक्के गुणासह उत्तीर्ण केली आहे. सध्या ती कोकण एज्युकेशन सोसायटीचे लोकनेते एडव्होकेट दत्ता पाटील होमीयोपथीक मेडीकल कॉलेज मध्ये इंटेनशीप करीत आहे.

**श्री. मुकुंद गोविंद नेरकर**



श्री. मुकुंद गोविंद नेरकर राहणार डोंबिवली (पश्चिम) यांचे दिनांक १० जुलै २०१९ रोजी त्यांच्या राहत्या घरी दुख:द निधन झाले. मुळचे त्यांचे घराणे कोकणातील कुडाळ जवळ नेरुर पण गेली अनेक वर्षे ते मुंबईत सुरूवातीला मुलुंड व नंतर डोंबिवलीत राहात होते. कै. वामनराव परुळेकरांच घराण हे त्यांच सासर होत. श्री. नेरकर हे डोंबिवली सहयोग या संस्थेचे सभासद, हितचिंतक होते. गिरगांवातील सर्व मध्यवर्ती संस्थांचेही ते सभासद होते. आपल्या ज्ञातीसंस्थाना ज्ञातीबांधवानी मदत केली पाहीजे असा त्यांचा आग्रह असे. याच भावनेतुन त्यांनी गौडब्राह्मण त्रैमासिकासाठी कांही काळ जाहीरातही दिली होती. त्यांच्या पच्छात पत्नी श्रीमती अपूर्वा नेरकर, दोन मुलगे, सुना नातवंडे असा परिवार आहे.

## हार्दिक अभिनंदन !

**कुमारी निकिता नितिन पंडित (मालाड)**

कुमारी निकिता नितिन पंडित हीने मुंबई विद्यापीठाची



बी.एल.एस.एल.एल.बी. ही परीक्षा ६४.६० टक्के गुणासह उत्तीर्ण केली आहे. तिने अंजटा प्रकाशनाच्या अंकात ''क्रिमिनल जुरिसं प्रुहेन्स'' ह्या विषयावर ९ पानांचा रिर्सच पेपर सादर केला होता. शालेय जिवनात तिने 'एलिमेंटरी' आणि ''इंटरमिजीएट'' ह्या चित्रकलेच्या परीक्षा उत्तीर्ण केल्याच्या ती भरतनाट्यम पूर्ण विशारद आहे. कुमारी निकिताचे वडील श्री. नितिन रमेश पंडीत हे कर आणि वित्त सल्लागार असून तिची आई सौ. निता नितिन पंडित ह्या हरबल हिल्स प्रा. लि. मध्ये पर्चेस व्यवस्थापक आहेत.

## वरांची यादी

| क्र. | फोन-वास्तव्य | नाव | जन्मतारीख उंची | शिक्षण | गोत्र-दैवत | रा./न./चरण | व्य./मा.उत्पन्न | अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | 8605502249<br>मडगाव | गौरांग उमेश मळकर्णेकर | १०/०५/१९८३<br>५' ६'' | B. A. | कौडिण्य/<br>वेतोबा | मीन/<br>रेवती/3रे | प्रेस मेडिया, गोवा,<br>३०,००० | पदवीधर, वय 35 पर्यंत. |
| २ | 8605502249<br>मडगाव | शारंग उमेश मळकर्णेकर | ०३/१०/१९८७<br>५' ६'' | B. A. Agri Diploma | कौडिण्य/<br>वेतोबा | मकर/<br>धनिष्ठ/1 रे | डिसने क्रूझ, यु. एस.<br>३,५०,००० | पदवीधर, वय 31 पर्यंत. |
| ३ | 9833076077<br>9769123622<br>चेंबूर | गुंजन बाजीराव सामंत | ०६-०२-१९८९<br>५'९'' | B.E. (EXTC)<br>MBA Marketing | सांख्यान/<br>वेतोबा | मकर | PAS Multinational<br>Co. Gujarat<br>18,00,000 P. A. | उच्चशिक्षित |
| ४ | 8097021640<br>022-29276066<br>गोरेगाव | नील नयन सामंत | ०७-०८-१९९०<br>५'९'' | B Tech, MBA | धनंजय/<br>आदिनारायण | कुंभ/<br>धनिष्ट/४ थे३ | एशियन पेंट, अंधेरी<br>२ लाख वार्षिक | उच्चशिक्षित<br>वयात अंतर २ ते ३ वर्ष |
| ५ | 9819618925<br>9824672170<br>बोरिवली | आनंद नंदकुमार परुळेकर | १३-०९-१९९१<br>५'११'' | B. E. (IT) | धनंजय/<br>आदिनारायण | तुळ/<br>विशाखा/३ रे४ | इन्फोसिस. पुणेग<br>४,००० | ॅज्युएट/<br>पोस्ट ग्रॅज्युएट |
| ६ | 9421233411<br>पुणे५ | हर्षल दत्तात्रय पाटील | १२-०९-१९९३<br>'९'' | B. E. (Mechanical) | सांख्यान/ देवी<br>चामुंडेश्वरी | कर्क/<br>पुनर्वसु/४ थे | Accenture, Pune<br>10 Lakh yearly | शक्यतो बीई.<br>वय २२ ते २५ |
| ७ | 9969448464<br>९१५२४८३५३६<br>कळवा | मोहन रामचंद्र ठाकूर | ०७-०७-१९८९<br>५'९'' | B. Sc IT | वत्स/सिद्धेश्वर | सिंह/मघा/<br>४ थे | UPL, BKC<br>7.5 Lakh yearly | शक्यतो बी.एस.सी. आयटी<br>वयात अंतर २ ते ३ वर्ष |
| ८ | ९७६९६४९१५६<br>०२२ २५६१५१९६<br>मुलुंड | परेश सुभाष गवाणकर | ०३-१०-१९८६<br>५'४'' | B.Sc. CAIIB | भारद्वाज/<br>पुरूषोत्तम | कन्या/हस्त/<br>१ ले | Yes Bank Ltd,<br>Powai 65,500 | अनुरूप, पदवीधर |
| ९ | ९८१९८१३००४<br>९८१९८१३०७४ | नयन अनंदविलास पाटकर | २०-११-१९७९<br>५'८'' | S.S.C. | धनंजय/मंगेश<br>महालक्ष्मी | वृश्चिक/<br>अनुराधा/१ले२ | हॉरिझन पॅक, वरळी<br>०,००० | एस्.एस्.सी. किंवा<br>अधिक वय ३४ वर्षे. |

## वधुंची यादी

| क्र. | फोन-वास्तव्य | नाव | जन्मतारीख उंची | शिक्षण | गोत्र-दैवत | रा./न./चरण | व्य./मा.उत्पन्न | अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | 9702877054<br>9819910325<br>जोगेश्वरी | राधिका रघुनाथ पाटील | ०२-१२-१९९१<br>५'९'' | M. Com. C. S. | सांख्यान/ देवी<br>चामुंडेश्वरी | तुळ/<br>चित्रा/४ थे | DSP Investment<br>Nariman Point,<br>25,000 | उच्चशिक्षित<br>वय २८ ते २९ |

| क्र. | फोन-वास्तव्य | नाव | जन्मतारीख उंची | शिक्षण | गोत्र-दैवत | रा./न./चरण | व्य./मा.उत्पन्न | अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ९४२३८७९७८२<br>९४२३३०२९४०<br>सिंधुदूर्ग | रिया रामचंद्र खानोलकर | २२-०५-१९९०<br>५'५'' | B Sc NSG with MBA | वत्स/<br>सिद्धेश्वर | मीन/<br>रेवती/४थे | DBD Petit Parsi Hospital<br>Cumbala Hill 25,000 | ग्रॅज्युएट/पोस्ट ग्रॅज्युएट<br>वय ३२ पर्यंत. |
| ३ | ९३२४८०४१२०<br>८७६२९०५०६२<br>बोरीवली | मयुरी बाळेश पुजारी<br>घटस्फोटित | ०१-०३-१९९१<br>५' | BE, M Tech | काश्यप/<br>खंडोबा | सिंह/पूर्वा<br>फाल्गुनी | Aptify, Pune<br>6 lakh yearly | उच्चशिक्षित वय वर्ष<br>१९८८ ते १९९० |
| | | | | | | | | |


हार्दिक शुभेच्छा !

**स्वर-योग**

विविध संकल्पनांवर आधारित मराठी/हिंदी गाण्यांची मैफल
''मला भावलेले कलावंत'' एकपात्री कार्यक्रम
लग्नसमारंभासाठी आणि
मंगलकार्यासाठी शहनाई जुगलबंदी




**प्रस्तुतकर्ता : निवेदक, मुलाखतकार- प्रदीप देसाई**



***प्रदीप देसाई***

**टेलि. : ०२२-२३८७ ३०६७, मो. : ९८६७०६५७३८**

१४, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.



NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
022 28602000
www.nkgsb-bank.com
ATTRACTIVE INTEREST RATES ACROSS ALL OUR LOANS!
Our CAR LOAN bring SMILES
Building Your Bright Future...
Education Loan
India & Abroad
Turn your Dreams to Reality with our Home Loan
NKGSB Bank's TRAVEL FINA
(TRAVEL LOANS UP TO ₹5 LAKHS FOR INDIA & ABROAD)

**PERIODICAL PRINTED MATTER**

**"GAUD BRAHMAN"**
30, Kudaldeshkar Brahman Nivas
147 B, J. S. S. Road, Girgoan, Mumbai-4.

Registered with the Registrar of
Newspaper for India Under No. 37555/61



उन्नती

व्यवसाय कर्ज

महिला उद्योजकांना व्याजदरात ०.१०% सवलत

अधिक माहितीसाठी ९०२९०५००३२ या नंबरवर मिस्ड कॉल द्या.

सारस्वत बँक

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

(शेड्यूल्ड बँक)

www.saraswatbank.com

JmS ~m÷U g^m `mÀ`m _mcH$sM h Ì_m{gH$ gnmXH$, _ÐH$ d àH$meH$ C_mH$mV JUnV _hmOZ `mZr à{VH$ Am\$gQ-180-gr, Jm`dmSr, {JaJmd, _~B-400 004 `W NmnZ 30, H$Sm i XeH$a ~m÷U {Zdmg, 147 ~, OJÞmW eH$a eQ _mJ, _~B - 400 004 `W à{gÕ H$c.